म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.
१९६४



REFBK-0014050
REFBK-0014050

# महाराष्ट्र लक्ष्मी

[विनायकांच्या निवडक कवितांचा संग्रह]

संपादक :
प्रा. म. ना. अदवंत
एम्. ए.

REFBK-0014050
REFBK-0014050

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणे २.

प्रकाशक :
अ. ज. प्रभू
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणे २.

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ति १९६३

मूल्य रु. ३·५०

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार पेठ, पुणे २.

'महाराष्ट्रलक्ष्मी माते जगी धन्य वाटे'

ही विनायकांची उक्ति कृतीने

सार्थ करणारे महाराष्ट्र

राज्याचे पहिले

मुख्यमंत्री

माननीय श्रीयुत

**यशवंतराव चव्हाण**

*यांस सादर अर्पण*

# निवेदन

विनायक कवींच्या निवडक कवितांचा संग्रह रसिकांच्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. राष्ट्रीय भावनांचे पहिले उद्गाते म्हणून विनायकांचे आधुनिक मराठी काव्यातील स्थान सर्वमान्य आहे. त्यांच्या या निवडक कविता रसिकांना निश्चित आवडतील.

या संग्रहाच्या संपादनाच्या कामी प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. भगवंत देशमुख, डॉ. वि. म. कुलकर्णी इत्यादि मित्रमंडळींचे मला विशेष सहाय्य झाले याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावयास हवा. माझे विद्यार्थी मित्र प्रा. राजा महाजन यांच्याही सहाय्याचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे.

कवितेत कवीचेच मूळ शुद्धलेखन ठेवलेले आहे. इतर सर्व ठिकाणी महामंडळाच्या शुद्धलेखनाच्या नियमांचा अवलंब केला आहे.

— संपादक

# अनुक्रम

आधुनिक मराठी काव्यातील राष्ट्रीय भावनेचे पहिले उद्गाते : पृष्ठे ७ ते ३०

विनायकांचे चरित्र : पृष्ठे ३१ ते ३५

१. महाराष्ट्रलक्ष्मी १
२. गणेशपूजन ३
३. शिवराजदर्शन ४
४. इतिहासाचें मर्म ६
५. हतभागिनी ८
६. यापुढें १०
७. शिवसंदेश १२
८. दसरा १४
९. प्रोफेसर छत्र्यांचा केसरी १६
१०. पद्मिनी १८
११. राणी दुर्गावती २२
१२. संयोगिता २६
१३. कृष्णाकुमारी ३१
१४. वीरमती ३६
१५. ध्यास तो भास ४०
१६. गाणिकोद्धार ५१
१७. सत्य, दिव्य आणि शांत! ६३
१८. गाण्याचें गाणें ६५
१९. चिमणी ६७
२०. प्रीति निमाली तर — ७०
२१. सुवास ७१
२२. स्त्री आणि पुरुष ७४
२३. दोन मार्ग ७५
२४. नदी आणि कवि ८१
२५. विरही ८३
२६. प्रत ८५
२७. चिमा ८६
२८. स्वप्न ८७
२९. कवि आणि पोपट ८९
३०. नागपंचमी ९१
३१. कवि ९३
३२. दोन प्रासंगिक पदें ९४

चार स्फुट कविता

१. सृष्टिविवाहमंडप ९५
२. प्रीति ९५
३. अलंकार ९६
४. प्रेमलुब्धता ९६

टीपा ९७

परिशिष्ट १२९

क्रमांक ......२८२७५.... नों दि. ....२५।८।६

आधुनिक मराठी काव्यातील

# राष्ट्रीय भावनेचे पहिले उद्गाते

आधुनिक मराठी कवितेतील राष्ट्रीय कवितेचे पहिले व श्रेष्ठ उद्गाते म्हणून विनायक कवींचा गौरव केला जातो. विनायकांच्या या गौरवातच त्यांच्या कवितेची सारी वैशिष्ट्ये सामावली आहेत. ज्या काळात विनायक कवींनी काव्यरचनेला सुरवात केली त्या कालाचे स्वरूप व त्यांच्या मनोभावनेची घडण या दोहोंच्या संवादी सुरातून त्यांच्या काव्याची निर्मिती झाली आहे. आणि म्हणून त्यांच्या काव्याचे स्वरूप समजावून घ्यावयाचे असेल तर ज्या कालात विनायकांनी कविता लिहिली त्या कालातील भावनाप्रवाह व विचार-प्रवाह समजावून घेतले पाहिजेत व त्यांचा विनायकांच्या मनावर झालेल्या क्रिया-प्रतिक्रियांचा विचार केला पाहिजे.

१४०५७

**काल :**

इ. स. १८९५ ते १९०८ या कालखंडात विनायकांनी आपल्या कविता प्रामुख्याने लिहिल्या. हा कालखंड महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात अनेक दृष्टींनी संस्मरणीय होता. सर्व दृष्टींनी थंड गोळा झालेला महाराष्ट्र हळूहळू जागृत होत होता. त्याला स्वत्वाची जाणीव होऊ लागली होती. परतंत्र जीवनाबद्दल चीड निर्माण होऊ लागली होती. पूर्वजांच्या पराक्रमाची नव्याने जाणीव होऊ लागली होती व नव्या विचारांचे वारे सर्वत्र वाहू लागले होते. महाराष्ट्रात लोकमान्य टिळक व आगरकर या दोन महा-पुरुषांनी महाराष्ट्रीय जीवन ढवळून काढले होते. नवे चैतन्य सर्वत्र खेळू लागले होते. राजकीय क्षेत्रात लोकमान्य टिळकांनी व सामाजिक क्षेत्रात प्रिन्सिपॉल आगरकर यांनी नवी क्रांती घडवून आणली होती. त्याचा परिणाम सर्वत्र राष्ट्रीय जीवनावर झालेला स्पष्ट दिसत होता.

आगरकरांनी सामाजिक क्षेत्रात बुद्धिप्रामाण्य आणले व व्यक्तिवादाच्या व्यापक भूमिकेवरून समता व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा हिरिरीने पुरस्कार केला. जुन्या अन्याय्य रूढींवर व त्यांतून निर्माण झालेल्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषमतेवर त्यांनी जोराचा हल्ला चढविला. आगरकरांनी जे हे बंडाचे निशाण उभारले त्याचे प्रतिबिंब तत्कालीन वाङ्मयातच नव्हे तर त्यानंतरच्या वाङ्मयातसुद्धा प्रभावी रीतीने पडू लागले. केशवसुतांची 'तुतारी' त्यातूनच जन्माला आली. हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांना त्या तत्त्वज्ञानातूनच प्रेरणा मिळाली. जीर्ण रूढी व आचारविचार यांच्याविरुद्ध व विषमतेविरुद्ध या कालात जी प्रतिक्रिया सुरू झाली त्यातूनच सामाजिक विचारसरणीचा एक मोठा प्रवाह मराठी काव्यात सुरू झाला. 'स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुत्व' यांचा पुरस्कार केशवसुतांचा 'नवा शिपाई' करू लागला व 'जुने जाउ द्या मरणा लागुनि। जाळुनि किंवा पुरुनी टाका। सावध ऐका पुढल्या हाका' असा नवा संदेश केशवसुतांची 'तुतारी' देऊ लागली.

सामाजिक क्षेत्रात ज्याप्रमाणे आगरकरांनी कार्य केले व महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवी जागृती घडवून आणली त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात नवे चैतन्य निर्माण करण्याचे कार्य लोकमान्य टिळकांनी केले. पारतंत्र्याच्या शृंखलांनी अगतिक व दुबळ्या झालेल्या व किंकर्तव्यमूढ बनलेल्या जनतेला स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देऊन पारतंत्र्याविरुद्ध लढा देण्याचे पहिले धडे लोकमान्य टिळकांनी दिले. इंग्रजांच्या अन्याय्य व जुलमी कारभाराविरुद्ध सतत टीकास्त्र पाजळत ठेवून लोकांना जागृत करावयाचे, त्यांना आपल्या हक्कांसाठी लढा देण्याला प्रवृत्त करावयाचे आणि पारतंत्र्याबद्दल त्यांच्या मनात चीड निर्माण करावयाची हे कार्य टिकळांनी केले व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा महामंत्र जनतेच्या मनावर त्यांनी ठसविला. १८९० ते १९०८ हा काळ तर अनेक प्रक्षोभक घटनांनी भरलेला होता. दुष्काळ, प्लेग व त्यानंतरची कर्झनशाही यांमुळे साऱ्या भारतात स्फोटक वातावरण निर्माण झाले होते. लोकमान्य टिळकांनी या काळात केलेले लोकजागृतीचे कार्य अभूतपूर्व

होते. त्यांच्या लढाऊ व्यक्तिमत्वाने महाराष्ट्रच नव्हे तर सारा भारत भारावून गेला होता.

याच सुमारास महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने गोळा करण्याची व महाराष्ट्राचा सोपपत्तिक इतिहास लिहिण्याची इतिहाससंशोधकांची चळवळही सुरू झाली होती. मराठ्यांच्या राजवटीबद्दल व शिवाजीमहाराजांच्या कर्तृत्वाबद्दल जे गैरसमज पाश्चात्य इतिहासकारांकडून प्रसृत केले जात होते त्यांचे इतिहास-संशोधक साधार खंडण करू लागले. पूर्वजांच्या पराक्रमाबद्दलच्या अभिमानाची नवी लाट महाराष्ट्रात आली. शिवाजी-उत्सव त्याच प्रेरणेतून सुरू झाला. आपल्या पूर्वेतिहासाच्या जाणिवेने महाराष्ट्रात नवे चैतन्य संचारू लागले. नव्या भूमिकेतून सुरू झालेला गणेशोत्सव याच चैतन्याची साक्ष देऊ लागला.

या नव्या प्रेरणेचे व चैतन्याचे दर्शन तत्कालीन साहित्यातूनही होऊ लागले. हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्या या पूर्वेतिहासाच्या अभिमानातून स्फुरल्या. विनायकांची सर्व राष्ट्रीय कविता या प्रेरणेतून निर्माण झाली व 'पूर्व दिव्या'चे प्रभावी दर्शन ती घडवू लागली. पारतंत्र्याबद्दल वाटणारी खंतही ती उत्कटतेने प्रकट करू लागली व इतिहासाची साक्ष काढून 'रम्य भावी काळा'चा दिलासा देऊ लागली.

महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात ज्याप्रमाणे क्रान्ती होत होती त्याचप्रमाणे साहित्याच्या सर्व क्षेत्रांतूनही नवे काहीतरी घडत होते. ललित साहित्याच्या सर्वच क्षेत्रांतून नव्या युगाची पहाट होत होती. नाटकाच्या क्षेत्रात अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाटकांपासून मराठी नाट्यसृष्टीला नवे वळण मिळाले. कादंबरीच्या क्षेत्रात हरिभाऊ मराठी कादंबरीला अद्‌भुतरम्यतेच्या कोंडीतून बाहेर काढीत होते तर काव्याच्या क्षेत्रात केशवसुतांनी मराठी कवितेत नवीन युग निर्माण करण्यास सुरवात केली होती. जुन्या परंपरागत पंडिती वळणाच्या कवितेहून केशवसुतांनी मराठी कवितेत आणलेले वळण निःसंशय नवे होते. मराठी कविता अधिकाधिक आत्मनिष्ठ होऊ लागली होती. वर्डस्वर्थ, शेली इत्यादि रोमँटिक कवींच्या वाचनाचा ठसा तिच्यावर पडल्याने ती अंतर्मुख होऊ

लागली. वैयक्तिक अनुभूतीचे चित्रण त्यात येऊ लागल्याने साध्याही विषयात कवीला मोठा आशय आढळू लागला. स्वतःच्या जीवनातील सुखदुःखाचे व उत्कट अनुभूतीचे चित्रण कवी काव्यातून करू लागल्याने कवीचे व्यक्तिमत्व त्याच्या काव्यातून प्रकट व्हावयास लागले. शृंगाराची किंवा निसर्गाची जुन्या काव्यात येणारी पारंपारिक व सांकेतिक वर्णने जाऊन कवी एका निराळ्याच वृत्तीने प्रेमभावनेकडे व निसर्गाकडे पाहू लागला. प्रेमवर्णनात शारीरिक आसक्तीचा भाग जाऊन त्या जागी मानसिक ओढ आली. प्रेमाच्या दिव्यत्वाची ज्याप्रमाणे त्यांना प्रचीती आली त्याप्रमाणे त्या भावनेच्या विविध, गूढ व तरल छटाही काव्यातून उत्कटत्वाने व्यक्त होऊ लागल्या. निसर्ग हा केवळ वर्णनाचा विषय राहिला नाही. कवी निसर्गाशी समरस होऊ लागला. निसर्गाच्या दिव्य शक्तीचे, त्यातील अलौकिक सौंदर्याचे व चैतन्याचे त्याला वेड लागले. निसर्गाशी तो एकरूप होऊ लागला व त्यात मानवी जीवनातील अपूर्ण स्वप्ने पूर्ण झालेली पाहू लागला. 'कवीच झाला सृष्टी, सारी सृष्टी झाली कवी' अशी त्याची स्थिती झाली.

सामाजिक व राजकीय भावनांचे उन्मेषही या नव्या काव्यातून व्यक्त होऊ लागले. सामाजिक व आर्थिक विषमतेचे चित्र त्यातून अतिशय प्रभावी रीतीने प्रकट होऊ लागले. अन्यायाविरुद्ध चीड, दलितांबद्दल अनुकंपा, पारतंत्र्याबद्दल खंत इत्यादि भावना उत्कट स्वरूपात काव्यातून व्यक्त होऊ लागल्या. 'मानवते'चे हे अभिनव दर्शन प्रथमच मराठी काव्यातून प्रकट होऊ लागले. बंडाचा झेंडा उभारून जिकडे तिकडे धामधूम उडवून देण्याचा व जुलमाचे तुकडे तुकडे करण्याचा कवींचा निर्धार त्यांच्या काव्यांतून जोमाने व आवेशाने स्पष्ट होऊ लागला.

थोडक्यात म्हणजे आत्मप्रत्ययातून आधुनिक कविता स्फुरल्यामुळे तिला अविषय असा कोणताच राहिला नाही. भक्तीपासून वैयक्तिक जीवनातील सुख-दुःखाच्या अनुभवापर्यंत अनेक रंग मराठी कवितेत दिसू लागले. त्यात अन्तर्मनातील गूढ व अनाकलनीय भाव होते, राजकीय व सामाजिक भावना होत्या,

वैयक्तिक प्रेमभावना होती, निसर्गाविषयी वाटणारे आकर्षण होते, अकारण वाटणारी हुरहूर होती, भूतकालाबद्दल वाटणारी ओढ होती, दिक्कालातून आरपार पाहण्याची दृष्टी होती. बहुरंगी व बहुढंगी जीवनाचे विलोभनीय दर्शन हाच आधुनिक मराठी कवितेचा नावीन्यपूर्ण विशेष म्हणावयास हवा.

कवितेचे अंतरंग जसे बदलले तसे बहिरंगही बदलले. पूर्वीची संस्कृतप्रचुर समासयुक्त शब्दरचना गेली व भाषेची व अलंकारांची कसरत गेली. अन्तःकरणातील उत्कट भाव कविता साध्या पण परिणामकारक शब्दांत व्यक्त करू लागली. अक्षर-गणवृत्तांच्या बंधनातून मुक्त होण्याचा ती प्रयत्न करू लागली व मात्रावृत्ते व जाती यांचा ती अधिकाधिक आश्रय करू लागली. इंग्रजी काव्याच्या अभ्यासाने सुनीत, चिंतनिका, उद्देशिका यांसारखे नवे नवे प्रकारही त्यांत येऊ लागले. मराठी कवितेचे स्वरूप असे अन्तर्बाह्य बदलू लागले. भावनांचे व विचारांचे नवे नवे प्रवाह ज्याप्रमाणे कवितेत येऊ लागले त्याप्रमाणे ते अभिव्यक्त करण्याच्या पद्धतीमध्येसुद्धा बदल होऊ लागला. काव्याच्या क्षेत्रात अशी क्रान्ती घडत होती व त्या क्रान्तीचे जनक होते केशवसुत.

केशवसुत व विनायक हे समकालीन. केशवसुतांचा काही काळ खानदेशाच्या परिसरात गेला होता व विनायक कवींचे कार्यक्षेत्र खानदेशच होते. अशा स्थितीत केशवसुतांनी केलेल्या क्रान्तीचा, त्यांनी काव्यामध्ये आणलेल्या नव्या विचारप्रवाहांचा व भावनाप्रवाहांचा विनायकांवर कितपत परिणाम झाला ? मराठी कवितेत आशय व अभिव्यक्ती यांत जो नवेपणा केशवसुतांनी आणला त्याचा परिणाम विनायकांच्या कवितेवर झाला हे निश्चित. विशेषतः कवीचा आत्माविष्कार जो काव्यातून प्रकट होऊ लागला व कवीचे प्रतिबिंब जे काव्यामध्ये दिसू लागले त्याचा स्वीकार विनायकांनीही केलेला आढळतो. पण तो केशवसुतांचा परिणाम होता की तात्कालीन परिस्थितीचा परिणाम होता हे सांगणे कठिण आहे. केशवसुत व विनायक यांच्या कवितांचा तुलनात्मक अभ्यास करताना एक गोष्ट स्पष्ट दिसून येते. ती म्हणजे केशवसुत आगरकरांच्या सुधारणावादी व बुद्धिवादी दृष्टिकोणाने भारून गेले होते. त्यामुळे त्यांच्या

कवितेत सामाजिक विचारसरणीचे प्रतिबिंब अधिक पडलेले आढळते. ‘ तुतारी ’, ‘ स्फूर्ती ’, ‘ नवा शिपाई ’ इत्यादि त्यांच्या कवितांतून जुन्या अन्याय्य रूढींवर त्यांनी त्वेषाने हल्ला चढविला आहे व समतेचा ध्वज उभारला आहे. ‘ जुने जाउ द्या मरणा लागुनि । जाळुनि किंवा पुरुनी टाका । सावध ऐका पुढल्या हाका । ’ हा त्यांचा संदेश आहे. ‘ अडवतील जरि देव तरी । झुंजू त्यांच्याशी निकरी । हार न जाऊ रतीभरी । ’ ही त्यांची जिद्द आहे व ‘ मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे ’ अशी त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. परवशतेबद्दल त्यांना खंत वाटते — ती ‘ मित्राची खोली लागलेली पाहून ’ किंवा ‘ गोष्टी घराकडिल मी वदता गड्या रे ’ यांसारख्या कवितांतून प्रकट होतेही. पण त्यात उत्कटता नाही, चीड नाही.

ती उत्कटता व ती चीड विनायकांच्या कवितेतून आपणांला आढळते. किंबहुना तोच त्यांच्या कवितेचा स्थायी भाव आहे. परवशतेबद्दल वाटणारी खंत त्यांच्या रोमारोमात भिनलेली दिसते व शब्दाशब्दातून ती प्रकट झालेली आढळते. परवशतेमुळे येणारी सत्वहीनता, स्वाभिमानशून्यता व दुबळेपणा त्यांना सतत जाणवतो. स्वार्थाकरिता मातृभूमीच्या शोणिताने लाल होणाऱ्या तिच्या पुत्रांचा अधःपात त्यांना दिसतो. परकीयांनी चालविलेली अरेरावी व जुलूम पाहून त्यांचा संताप अनावर होतो. पारतंत्र्य व पारतंत्र्याने आपल्या देशाची केलेली दुर्दशा पाहून त्यांचे अन्तःकरण तिळतीळ तुटू लागते आणि न कळतच त्यांचे मन इतिहासाकडे वळू लागते. आपल्या पूर्वजांचा पराक्रम, स्वातंत्र्यप्राप्तीकरिता त्यांनी केलेले प्रयत्न, त्या काळचे वैभव त्यांच्या मनाला आकृष्ट करू लागते व आपोआपच ते ऐतिहासिक काळात वावरू लागतात. केशवसुतांच्या काव्यात ‘ जुने जाउ द्या मरणा लागुनि ’ ही भाषा आहे तर विनायकांच्या काव्यात इतिहासकालीन पराक्रमाची व वैभवाची स्वप्ने आहेत.

त्यामुळेच विनायकांच्या राष्ट्रीय काव्यामध्ये दोन महत्त्वाचे भावनाप्रवाह आलेले आढळतात. एक पूर्व वैभवाचे स्मरण व दुसरा ते हरविल्याबद्दल व सद्यःपरिस्थितीबद्दल वाटणारी खंत. हे दोन्ही भावनाप्रवाह परस्परांना पूरक

आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. कारण सद्यःपरिस्थितीमुळे त्यांना पूर्व वैभवाची तीव्रतेने आठवण झाली व पूर्व वैभवाच्या या स्मृतींमुळे सद्यःपरिस्थितीबद्दल वाटणारी खंत अधिक उत्कट झाली. इतिहासकालातही शिवकालाबद्दल त्यांना विशेष आकर्षण वाटते व ते स्वाभाविकही आहे. पारतंत्र्यातून महाराष्ट्रलक्ष्मीची सुटका करणारा वीर म्हणून ते शिवाजीमहाराजांकडे पाहतात. त्यामुळेच रायगडावर जाऊन शिवदर्शन घेण्याची व त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याची त्यांना इच्छा होते. 'इतिहासाचे मर्म' पाहत असतानाही शिवचरिताचे चिंतन त्यांच्या मनात नवीन आशेची बीजे निर्माण करते आणि त्यांच्या आठवणीनेच 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काळ' हा दिलासा त्यांना मिळतो. पण त्याबरोबरच आजच्या स्वत्वहीन व देशाभिमानशून्य पारतंत्र्याच्या जिण्याचीही त्यांना खंत वाटते व नैराश्याचा पगडा त्यांच्या मनावर बसू लागतो. 'कोठचा शिवाजी राजा। निजधर्माचा अभिमानी। यापुढे॥ असे त्यांना वाटू लागते. सर्व ऐश्वर्य लयाला गेले, कपाळीं दारिद्र्य जडले, संकटामध्ये कुणीही वाली उरला नाही म्हणून त्यांना खंत वाटू लागते. शिवाजीच्या तोंडी संदेश घालून मनामध्ये देशप्रीती नसणाऱ्या, परस्परांशी स्वार्थबुद्धीने भांडणाऱ्या व मनात कोणताच भाव नसताना स्वातंत्र्यास्तव उगीच आरडाओरडा करणाऱ्या आपल्या बांधवांचीही ते चांगलीच कानउघाडणी करतात.

पूर्व वैभवाच्या स्मृतीने सद्यःपरिस्थितीबद्दल वाटणारा विषाद व त्यातून निर्माण झालेले नैराश्य त्यांच्या अनेक कवितांतून दिसते. 'हतभागिनी' या कवितेतील रूपकात्मक चित्र तर प्रसिद्धच आहे. 'एकाश्रु बिंदुकारणे, । तियेच्या रणे, । झुंजले मने। असे सुत व्याली — जयकाली माउली' अशा भारतमातेचे पुत्र आज मात्र करंटे आहेत, स्वार्थासाठी तिच्याच रक्ताने स्वतःला लाली आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. स्वतःचे कल्याण त्यांना समजत नाही व सत्व विसरून स्वार्थासाठी परकीयाला वश झाले आहेत. अशा स्थितीत पारतंत्र्याच्या चिखलात रुतत चाललेली भारतभू वर कशी येणार ?—'दसरा,' 'प्रोफेसर छत्र्यांचा केसरी' इत्यादि काव्यांतून हेच नैराश्य प्रकट झालेले आढळेल.

विनायकांचे हे नैराश्य व ही चीड आपल्याच देशाभिमानशून्य, स्वार्थी व कोरडे शब्दजाल विणणाऱ्या कृतिशून्य बांधवांच्या वृत्तीतून निर्माण झाले आहे. पण कवी विनायक त्या नैराश्याच्या संपूर्णपणे आहारी गेले नाहीत हे लक्षात ठेवावयास हवे. सद्यःस्थितीतील भीषणतेची व अगतिकतेची त्यांना जाणीव झाली आहे. पारतंत्र्यातील या अवस्थेला आपणच जबाबदार आहोत याचीही त्यांना कल्पना आहे. ज्या दोषांमुळे व वृत्तीमुळे आपणाभोवती पारतंत्र्याचे पाश आवळले गेले त्या आपल्या दोषांचा व वृत्तीचाही त्यांना विसर पडलेला नाही. आणि तरीही त्यांच्या आशावादी मनाने धीर सोडला नाही. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काळ' ही इतिहासाची साक्ष ते काढतात व आपणा सर्वांना दिलासा देतात. शिवराजदर्शनाने नव्या प्रेरणा व नवा उत्साह मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. पूर्वजांच्या पराक्रमाचे सतत स्मरण करून देऊन समाजात नवे चैतन्य आणण्याचा ते प्रयत्न करतात. या दृष्टीने त्यांचे पूर्व वैभवस्मरण हे केवळ स्वप्नरंजन नव्हे तर ते स्फूर्तीचा जिवंत झरा आहे. त्यातून आपण स्फूर्ती घेतली पाहिजे असेच जणू त्यांना सुचवायचे आहे.

त्या दृष्टीने विनायकांच्या या कविता म्हणजे प्रि. वा. ब. पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणे तत्कालीन महाराष्ट्राचे प्रतिबिंब आहे. लो. टिळकांचे राजकारण, शिवाजीउत्सव, मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करण्याचे उद्योग इत्यादि अनेक प्रयत्नांतून महाराष्ट्राची अस्मिता व त्यांचा देशाभिमान जागृत करण्याचा जो प्रयत्न होत होता त्याचेच हे प्रतिबिंब विनायकांच्या कवितेत पडले आहे असे म्हणावेसे वाटते. जागृत महाराष्ट्राच्या भावनांना तोंड फोडण्याचे कार्य विनायकांच्या कवितांनी केले हे या कवितांचे महत्त्व.

विनायकांच्या कवितांचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांची ऐतिहासिक कथागीते. त्यांत इतिहासातील पराक्रमी स्त्रियांवर जी आठ गाणी रचलेली आहेत ती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहेत. विनायकांचे स्त्रीदाक्षिण्य तर त्यात आढळतेच पण ऐतिहासिक कालाबद्दल वाटणारे गूढ आकर्षणही त्यांत प्रतीत होते. या स्त्रियांची निवडही एका विशिष्ट दृष्टिकोणातून केलेली

आहे. या सर्वच स्त्रियांनी देशाकरिता मोठा त्याग केला आहे, स्वातंत्र्य-रक्षणासाठी मोठा पराक्रम केला आहे व प्रसंगी देशासाठी आत्मसमर्पणही केले आहे. त्यांच्या चरित्रांत दिसून येणाऱ्या या अलौकिक गुणांनी व त्यांच्या पराक्रमांनी विनायकांना वेड लावले, व त्यांच्या चरिताम्रतरूवर विनायक कूजन करू लागले. या आठ स्त्रियांपैकी संयोगिता, पद्मिनी, पन्ना व कुष्णाकुमारी या राजस्थानच्या इतिहासातील आहेत; दुर्गावती ही मध्यप्रदेशाच्या इतिहासातील आहे व तारा ही काल्पनिक आहे. हिरकणीची कथा दंतकथेच्या रूपाने प्रसिद्धच आहे. अहल्याबाई तर मराठ्यांच्या इतिहासात प्रसिद्धच आहे. ही चरित्रे काव्यात रंगविण्याच्या पाठीमागे विनायकांची भूमिका बोधप्रधान होती. 'आपल्या देशास भूषणभूत झालेल्या या स्त्रीरत्नांचा इतिहास आपल्या मुलाबाळांच्याही तोंडी बसावा' या हेतूने त्यांनी ही गाणी रचली. प्रत्यक्ष बोध या काव्यांतून कवीने अनेकदा केला आहे. 'कृष्णाकुमारी'च्या शेवटी

'जसे करावे, तसे भरावे; बीज तसे दाणे !
'विनायका'ला करी बोध हा कृष्णेचे गाणे ।।

असा निष्कर्ष काढला आहे. 'संयोगिता'मध्ये ते

'कोपाची संगति जन हो ! बरवी नसे,
सूज्ञही नरा तो करितो वेडे पिसे,
किति अनर्थ घडती जगती याच्या वशे'

असा उपदेश वाचकांना ते करतात. 'राणी दुर्गावती' मध्येही

'स्त्रीच्या ठायी दलपतसम जो होतो लंपट मती
जीवित्वाला – सर्वस्वाला – मुकतो तो शेवटी'

असा इशारा ते वाचकांना देतात. ही सर्व चरित्रे त्यांतील बोध स्पष्ट व्हावा व वाचकाच्या अंतःकरणात तो ठसावा या दृष्टीनेच त्यांनी लिहिली आहेत. पण चरित्रांतील प्रसंगांचे सरळ निवेदन, त्यांत मधून मधून येणारे नाट्यपूर्ण संवाद आणि मनाची पकड घेणारे व्यक्तिचित्रण यांमुळे बोधप्रधान दृष्टिकोण

असूनही ही गीते अतिशय रसपूर्ण झाली आहेत. त्यांत ठिकठिकाणी अलंकारांच्या रूपाने आलेला कल्पनाविलास आपले मन आकृष्ट करतो तर जागोजागी पेरलेली सुंदर सुभाषिते आपल्या मनाची पकड घेतात. मात्र प्रसंगांचे चित्रण अत्यंत संयमित रीतीने करण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे या गीतांतून पाल्हाळ ज्याप्रमाणे कोठेच आला नाही त्याप्रमाणे रसोत्कटताही कोठे येऊ शकली नाही. चरित्रवर्णनात नाट्यपूर्ण प्रसंगातील नाट्य काही वेळा सरळ निवेदनाच्या ओघात निसटून जाते. काही ठिकाणी व्यक्तिदर्शनातील अपुरेपणा जाणवतो. पण हे दोष विनायकांच्या या कविता लिहिण्याच्या पाठीमागे असलेल्या भूमिकेमुळे निर्माण झाले आहेत. ती भूमिका समजावून घेतली म्हणजे हे दोष तितकेसे जाणवत नाहीत. कारण ही चरित्रे लिहिताना त्यांनी आपले लक्ष नायिकेवर केंद्रित केलेले आहे व तिच्या गुणांचा व पराक्रमांचा उत्कर्ष ज्या ठिकाणी आढळतो अशाच प्रसंगांवर त्यांनी प्रकाशझोत टाकला आहे. त्यामुळे इतर आगंतुक विषयांना व वर्णनांना त्यात वाव नाही. शिवाय कथानक धावत्या गतीने आपणासमोर उभे करण्याचा त्यांचा उद्देश होता. त्यामुळे प्रसंगांची मालिका चलच्चित्रपटाप्रमाणे एकामागून एक आपणापुढून सरकत जाते व त्याचा एक विशिष्ट परिणाम मनावर होतो.

अतिशय प्रसादपूर्ण व प्रवाही भाषा, वेचक प्रसंग, कलापूर्ण संयम आणि पकड घेणारे व्यक्तिचित्रण यांमुळे त्यांची ही चरित्रात्मक कथाकाव्ये आकर्षक वाटतात यात शंका नाही.

विनायकांच्या प्रदीर्घ कथाकाव्याचा दुसरा भाग म्हणजे 'ध्यास तो भास,' 'गणिकोद्धार,' 'वीरमती' अशासारखी छोटी खंडकाव्ये. या कथाकाव्यांतून विनायकांच्या प्रतिभेचे अनेक गुण उजळून येतात. मध्यवर्ती कथानक जरी दुसरीकडून घेतले असले तरी या कथाकाव्यांचा विकास ते अतिशय कलापूर्ण रीतीने करतात. त्यांतूनही त्यांचा बोधप्रधान दृष्टिकोण प्रकट होतोच. पण वातावरणनिर्मिती, रसोत्कटता व नाट्यपूर्ण निवेदनशैली यांमुळे ही कथाकाव्ये कलादृष्ट्या अत्यंत श्रेष्ठ प्रतीची ठरली आहेत यात शंका नाही.

'ध्यास तो भास' या छोट्या खंडकाव्याची मध्यवर्ती कल्पना बायरनच्या 'आल्प दि रेनिजेड' या काव्यावरून घेतलेली आहे. पण तिचा विकास त्यांनी अगदी स्वतंत्रपणे केला आहे. स्वकीयांवर चिडून मुसलमानी धर्म स्वीकारलेल्या व सूडबुद्धीने मुसलमानांस जाऊन मिळालेल्या एका तरुणाला आपली प्रेयसी दिसल्याचा भास होतो. ती प्रेयसी नाना रीतींनी त्याला उपदेश करते, त्याचे उपालंभन करते व पुन्हा स्वधर्मात येण्याबद्दल त्याला विनविते. पण सूड घेण्याच्या निश्चयापासून तो परावृत्त होत नाही. या सर्व घटनांचे चित्रण करताना निर्माण केलेले वातावरण अतिशय परिणामकारक वाटते. त्याबरोबरच त्या तरुणाचे व त्याच्या प्रेयसीचे संभाषणही नाट्यमय झाले आहे. ज्याचा मनाला ध्यास लागलेला असतो त्याचाच भास आपणाला होतो. अशा एका भासाचे अत्यंत काव्यपूर्ण व नाट्यमय चित्रण यात आढळेल. 'गणिकोद्धार' हे छोटे खंडकाव्य तर विनायकांच्या प्रतिभेचा अत्युच्च विलास असेच मानावे लागेल. वा. गो. आपटे यांच्या 'अशोक चरित्रा'तून हे कथानक घेतलेले आहे. सुरवातीलाच स्मशानाचे केलेले वर्णन कथेची पार्श्वभूमी निर्माण करते. त्या पार्श्वभूमीवर मथुरा-पूरची वासवदत्ता नावाची वारयोपिता 'स्तनयुगल नासिका खंड' होऊन धुळीमध्ये विलाप करीत पडलेली आपणांला दिसते. तिचे पूर्वीचे वैभव व तिची त्या वेळची स्थिती यांतील विरोध कवीने अतिशय नाट्यपूर्ण रीतीने रंगविला आहे. तिच्या विलापाला कारुण्याची धार आहे. अशा स्थितीत ती पडलेली असताना बुद्ध भिक्षूचे तिला झालेले दर्शन, त्याने तिला केलेला उपदेश व दिलेला दिलासा आणि त्यामुळे गणिकेचा झालेला उद्धार हे प्रसंग एखाद्या चलच्चित्रपटाप्रमाणे आपल्या डोळ्यांपुढून सरकत जातात. त्यांतील कारुण्य व नाट्य आपल्या अन्तःकरणाला भिडते. त्यात निर्माण केलेली स्मशानाची पार्श्वभूमी कथेतील भाव उत्कट करण्यास व त्यातील नाट्य परिणामकारक करण्यास मदत करतेच; पण त्यातील आशयाला एक गंभीर अर्थ प्राप्त करून देते. वेचक शब्द, अर्थपूर्ण सुभाषिते, अलंकारांची मधून मधून परिणाम-कारक रीतीने केलेली पेरणी व विरोधाचा उपयोग यांमुळे हे छोटे खंडकाव्य मराठीत वैशिष्ट्यपूर्ण ठरेल यात शंका नाही. बोधप्रधान दृष्टिकोण 'ध्यास तो

भास ' व ' गणिकोद्धार ' या दोन्ही कथाकाव्यांतून व्यक्त झाला आहे. पण तो आशयाशी इतका एकजीव झालेला आहे की त्याचे निराळे अस्तित्व आपणांला जाणवत नाही.

' वीरमती 'चे कथानक ' रूपनगरची राजकन्या ' व ' वीरबाला ' हे गुजराथी नाटक यांवरून घेतलेले आहे व त्याचा विकास चरित्रात्मक कथा-काव्याच्या पद्धतीनेच केलेला आहे. समरभूमीवरून शत्रूला पाठ दाखवून परत आलेल्या आपल्या पतीची वीरमती तीव्र शब्दांत निर्भर्त्सना करते व त्यामुळे जसवंतसिंग पुन्हा त्वेषाने शत्रूवर तुटून पडतो व विजय मिळवितो ही कथा त्यांनी दोन कवितांतून रंगविली आहे. ' साकी ' वृत्तात रंगविलेल्या कथेचे स्वरूप पुष्कळच पाल्हाळिक झालेले आहे. जसवंतसिंगाची लंपट वृत्ती, त्याची भीरुता व रणावर जाण्याची त्याची अनिच्छा यांचे सुरवातीचे वर्णन काव्यमय असले तरी उत्कट नाही. त्याचप्रमाणे रणविमुख होऊन परत आलेल्या जसवंत-सिंगाचा धिक्कार करताना वीरमती जे भाषण करते तेही फार पाल्हाळिक वाटते. शेवटचा भाग मात्र नाट्यपूर्ण आहे. त्या मानाने ' वीरमती ' हे जे छोटे कथागीत आहे ते अधिक उत्कट व परिणामकारक वाटते. यात सुरवातीचा सर्व भाग गाळला असून पती रणविमुख होऊन आल्यानंतरचाच नाट्यपूर्ण भाग घेतलेला आहे व तो अतिशय परिणामकारक रीतीने वर्णन केलेला आहे.

ही सर्व चरित्रात्मक कथाकाव्ये व खंडकाव्ये वाचत असताना एक गोष्ट आपणांला जाणवते व ती म्हणजे विनायकांचा स्त्रीविषयक उदार दृष्टिकोण. त्यांनी आपल्या काव्यासाठी ज्या नायिकांची निवड केली त्या सर्व अलौकिक आहेत. पतिभक्ती, देशभक्ती, शीलाची चाड, प्रसंगी रणावर शौर्य दाखवून आत्मबलिदान करण्याची तयारी इत्यादि अनेक गुणांनी संपन्न असलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विनायकांना विशेष आकर्षण वाटले. विनायकांनी पुरुषांच्या पराक्रमाचे फारसे कुठे वर्णन केले नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. वा. ब. पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणे 'कदाचित महाराष्ट्रातील पुरुषांपेक्षा स्त्रियांवरच त्यांच्या आशेची भिस्त अधिक असेल. कदाचित पुरुष चुकले,

भुलले तर भुलेत वेटे ! त्यांना ताळ्यावर आणायला, त्यांचे डोळे उघडायला, महाराष्ट्रातील स्त्रिया तरी स्वतःचे तेज, स्वतःचे ओज, स्वतःचे शील आणि स्वतःचे स्वत्व सांभाळून राहोत, ही त्यांची उत्कट इच्छा असेल, काहीही असो. काव्यात स्त्रियांसंबंधी त्यांची वृत्ती अतिशय उदार दिसते व त्यांच्याविषयी पूज्यभावच ते जागोजागी व्यक्त करतात हे मुद्दाम लक्षात घ्यावयास हवे.

दुसरी एक गोष्ट सहज लक्षात येते. ती म्हणजे विनायकांच्या प्रतिभेला कथनात्मक निवेदनाचे माध्यम विशेष मानवते. आत्मनिष्ठ काव्यातून ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रीय भावना व्यक्त झालेली आहे त्याच ठिकाणी विनायकांच्या प्रतिभेला विशेष तेज चढते. इतर ठिकाणी आत्मनिष्ठ काव्यात त्यांची प्रतिभा विशेष रमलेली नाही. कथाकाव्यातील वस्तुनिष्ठ वृत्ती त्याला विशेष मानवते. त्यांची सहज शैली व बोधप्रधान दृष्टिकोण या प्रकारच्या काव्याला विशेष अनुकूल आहे. त्यांच्या शैलीतील नाट्यालाही याच प्रकारच्या काव्यात विशेष अवसर मिळतो व कल्पनाविलासालाही अधिक वाव मिळतो. अर्थात त्यांनी निवडलेल्या कथानकांतूनही त्यांची राष्ट्रीय वृत्ती प्रकट झाल्यावाचून राहत नाही. स्त्रियांचे स्वत्व, त्यांचा देशाभिमान, देशाकरिता त्यांनी केलेले बलिदान याच त्यांच्या गुणांवर विनायकांनी विशेष भर दिलेला आहे. एका दृष्टीने ही कथा-काव्ये म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय वृत्तीचा वस्तुनिष्ठ आविष्कारच आहेत.

विनायकांच्या स्फुट कवितांचा आणखी एक वर्ग आहे. राष्ट्रीय भावने-व्यतिरिक्त इतर विविध भावनांचा आविष्कार त्यातून झालेला आढळेल. काही कवितांतून प्रणयभावनेचे चित्रण आढळेल, काही कवितांतून स्त्रीविषयक विचार व्यक्त केलेले आढळतील, काही कवितांतून कवी व काव्य यांविषयींचे विचार ग्रथित केलेले आहेत तर काही कवितांतून तात्त्विक व बोधपर विचार कल्पनारम्य स्वरूपात आविष्कृत झालेले दिसतील. या सर्व गीतांचे स्वरूप भावगीत वा नाट्यगीत रचनेसारखे आहे व केशवसुतांच्या रचनेची व प्रयोगांची छाप यांपैकी बऱ्याच कवितांवर पडलेली आढळेल.

विनायकांची प्रेमकाव्ये संख्येने फार थोडी आहेत व त्यात आत्मलेखनही फारसे नाही. 'प्रीती निमाली तर–' ही त्यांपैकी अतिशय महत्त्वाची कविता. प्रेमाचे माहात्म्य वर्णन करीत असताना विनायकांनी 'प्रीती निमाली तर–' काय होईल याचे चित्र रंगविले आहे.

'माझी कोण करील उत्सुक मने मार्गप्रतीक्षा घरी !
प्रेमे बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करी ?'

यामधील दररोज अनुभवाला येणाऱ्या प्रीतीचे चित्र जितके उत्कट आहे तितकेच

'सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर,
भीतीने मरतील मानवकुले, प्रीती निमाली तर !'

यातील कल्पनाही मनाला सहज पटणारी आहे. 'प्रीती' या छोट्या गीतात अप्पलपोटी प्रीती ही खोटी आहे असे ते म्हणतात. प्रेमाच्या मिषाने जगात स्वार्थ मिरवितो व त्यामुळे जगात कपटी पुरुषांमुळे भोळ्या स्त्रिया नाडल्या जातात हा विनायकांचा एक आवडता विचार आहे. पुरुषांच्या चंचल वृत्तीचे वर्णन त्यांनी अन्यत्रही केलेले आढळेल. 'विरही' व 'स्वप्न' या दोन कविता विरहाचे चित्रण करतात. भावनेच्या उत्कटतेपेक्षा कल्पनाचमत्कृती-वरच या काव्यांत विशेष भर आहे. त्यापेक्षा 'अवंतिके !' या कवितेतील प्रेमभावनेचे चित्रण अधिक उत्कट वाटते.

'रूप तुझे दिनरजनी, वसते हृदयी नयनी,
दिसते स्वप्नी, शयनी, एकसारखे !
रूप तुझे निरखावे, तव वचनामृत प्यावे,
तव गुण गावे ध्यावे, लालसा सखे !'

या त्यातील उद्गारांची उत्कटता लक्षात घेतली तर ही कविता कुणा एखाद्या विवक्षित व्यक्तीला उद्देशून लिहिलेली असावी असे वाटल्याशिवाय राहत नाही.

विनायकांची प्रणयासक्त वृत्ती वरील नाट्यात्मक प्रेमगीतांतून जशी दिसते तसेच 'प्रत' या कवितेतून त्यांचा आत्माविष्कारही दिसून येतो. स्वतःच्या पत्नीला लिहिलेल्या या गीतात कवीला स्वतःला जडलेल्या व्यसनांची चांगली जाणीव असावी असे दिसते. आपल्या पत्नीचे समाधान करण्याचा या कवितेत केलेला प्रयत्न आपल्या व्यसनांबद्दल त्यांना किती खंत वाटत असावी ते स्पष्ट दाखविते.

विनायकांचे खाजगी चरित्र कसेही असले तरी त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण अतिशय उदार आहे हे मान्यच केले पाहिजे. त्यांच्या कथागीतांतून तो दृष्टिकोण प्रत्यक्ष प्रकट झालाच आहे. पण त्यांच्या स्फुट कवितांतूनसुद्धा तो ठिकठिकाणी प्रकट झाला आहे. पुरुष हा चंचल वृत्तीचा, लंपट आणि स्वार्थी असतो तर स्त्री ही एकनिष्ठ, त्यागी व भाबडी असते. 'स्त्रिया भाबड्या जगती कपटी पुरुषांची जाती' यासारखे उद्‌गार त्यांच्या काव्यांतून सतत येतात. 'सुवास' या कवितेमध्ये पुरुषाच्या चंचल वृत्तीचे व स्त्रीहृदयाला त्यामुळे होणाऱ्या वेदनांचे चित्र अतिशय चांगले काढले आहे. निर्जन रानातून हिंडत असताना कवीला सुंदर वास येतो पण कोठून येतो ते काही त्याला कळत नाही. त्यामुळे त्या सुवासाचे कारण कल्पनेने हुडकून काढीत असताना एका रमणीचे चित्र त्यांच्या पुढे उभे राहते. आपल्या रमणाची मूर्ती तिने आपल्या हृदयाशी वागवून त्याला प्रेमाच्या पुष्पांची माला अर्पण केली आहे. पण

'काय होय ते परि पुरुषाला
नव पुष्पावरच्या भ्रमराला?'

त्यामुळे भग्नमनोरथ झालेली ती रमणी एकांती स्फुंदत असताना त्याचाच गंध या ठिकाणी दरवळला असेल काय अशी कवी कल्पना करतो. या कल्पनेत निर्माण केलेले भ्रमरवृत्ती पुरुषाचे चित्र 'स्त्री आणि पुरुष' या कवितेत त्यांनी अधिक स्पष्ट केले आहे. हे एक उत्कृष्ट ध्वनिकाव्य आहे व स्त्रीविषयक विनायकांचा दृष्टिकोण या कवितेत अधिक स्पष्ट होतो. एका फुललेल्या उद्यानात एक पुरुष जातो. त्या उद्यानातील एक सुंदर फूल त्याला आकृष्ट करते. तो ते

फूल तोडतो. त्याचा वास घेतो, ते मस्तकावर ठेवतो, ते हृदयाशी धरतो. पण थोड्या वेळाने त्या फुलाचा कंटाळा येऊन तो ते फूल कुसकरून टाकून देतो. पुरुषाच्या या सर्व लीला तेथे आलेली स्त्री पाहत होती. पुरुषाची ती वृत्ती पाहून तिला गहिवरून येते व तिच्या नयनांत अश्रू दाटतात. अतिशय मोजक्या शब्दांत विनायकांनी हे जे चित्र वाचकांच्या पुढे उभे केले आहे ते मनाची पकड घेतेच, पण त्या चित्रणामागील ध्वनीही अन्तःकरणाला जाणवतो. विनायकांची ही कविता आशय व अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी उत्कृष्ट समजावी लागेल.

कवी आणि काव्य यांबद्दलही विनायकांनी आपले विचार प्रकट केले आहेत. केशवसुतांच्या संप्रदायाचा तो एक विशेष आहे. त्यामुळे केशवसुतांच्या विचारांची छापच त्यांच्या या काव्यांवर पडलेली आढळेल. 'नदी आणि कवी' या कवितेत या दोघांची त्यांनी तुलना केली आहे व कवी हा नदीप्रमाणेच कसा असतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यातही त्यांची विनीत वृत्ती दिसून येते.

'महाकवी थोर नदीप्रमाणे,  
मी बापडा ओघळ अल्प जाणे.  
धाके न ओढा झुळझुळ वाहे  
माझी तशी ही गुणगूण आहे.'

ही त्यामधील भावना अतिशय हृद्य वाटेल. 'कवी' या छोट्याशा कवितेत त्यांनी कवीचा मोठेपणा वर्णन केला आहे. त्यावर केशवसुतांच्या 'कवी' व 'आम्ही कोण' या कवितांची छाप पडलेली स्पष्ट दिसते. पण काव्याविषयीचा एक अभिनव विचार त्यांनी 'सुवास' या कवितेत मांडला आहे.

'स्वानुभूत वासांचे दान  
करावयाला जोवर ये न  
तोवर कवितालतिकेवरती  
कर्णिकार सुमनांची भरती.'

या ओळींत अनुभूतीशिवाय काव्य हे खरे काव्य होऊ शकत नाही हा मौलिक विचार रम्यपणे मांडला आहे. अनुभूतीशिवाय काव्य म्हणजे वास नसलेली कण्हेरीची फुले; आणि केवळ शब्दांची कसरत करणारे कवी अशा कण्हेरीच्या फुलांचीच निर्मिती अधिक करतात हे त्यांचे मत विशेष विचारात घेण्यासारखे आहे.

कल्पनाविलासाने नटलेल्या त्यांच्या काही बोधप्रधान कवितांचाही उल्लेख करावयास हवा. 'चिमणी' ही त्यांपैकीच एक कविता. त्यामधील कल्पनांवर केशवसुतांच्या 'भृंग' कवितेची छाप पडली असावी असे वाटते. पण त्यामधील सुरवातीचे पहाटेचे वर्णन बालकवींच्या निसर्गवर्णनाची आपणांला आठवण करून देते. चिमणीची स्वच्छंद तान ऐकून त्यांना आपल्यामधील अपूर्णतेची जाणीव होते.

> 'एक कराया लागावे, दुज्याकडे तो मन धावे;
> साधेना एकही परी, अपूर्णता मनुजता खरी !'

या शब्दांत व्यक्त केलेली हुरहूर पुढे बालकवींच्या काव्यातून अधिक स्पष्टपणे प्रकट झालेली आढळेल. आरशातील आपल्या प्रतिबिंबावर चोचीचे घाव मारणाऱ्या व नंतर सखीभावाने त्या प्रतिबिंबाचेच चुंबन घेणाऱ्या चिमणीवरून

> 'हासू आम्ही जगा, तसे, करील जग आमुचे हसे;
> करिता जगताची कीव, देइल ते जीवा जीव !'

हा त्यांनी काढलेला निष्कर्षही मोठा मार्मिक वाटतो.

'दोन मार्ग' या प्रदीर्घ कवितेत त्यांची स्वातंत्र्यप्रीती प्रकट झालेली दिसते. वैभवाचा व सत्तेचा राजमार्ग सोडून कवी स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या देश-भक्ताचा कंटकमय मार्ग स्वीकारतो ही यामधील कल्पना. पण या दोन मार्गांचे वर्णन करीत असता त्यात आलेली टीका मोठी मार्मिक व भेदक झाली आहे.

'गणेशपूजन' सारख्या कवितेतूनही तत्कालीन राजकीय परिस्थितीचे उत्कट चित्र त्यात रूपकाद्वारे उभे केले आहे. त्यातही राज्यकर्त्यांच्या जुलमाचे व त्यामुळे पिळवटून निघालेल्या जनतेचे चित्र विनायकांनी रंगविले आहे.

विनायकांनी शिवजयंती, गणेशोत्सव या निमित्तांनी बरीच स्फुट रचना केली. ही सर्व रचना छोट्या छोट्या पदांच्या स्वरूपाची आहे व त्या सर्वांतून शिवाजी-महाराजांची स्तुती, पारतंत्र्याबद्दल वाटणारी खंत, स्वकीयांच्या देशाभिमान-शून्यतेचा धिक्कार अशांसारखे ठराविक विषयच आढळतात. या पदरचनेत शब्दसौष्ठव दिसत असले तरी काव्य या दृष्टीने ती सामान्यच आहेत. भावनेचा उत्कट परिपोष त्यांमधून कुठेच झाला नाही. चमत्कृती मात्र मधून मधून आढळते. अर्थात ही पदे नैमित्तिक स्वरूपाची असल्याने विनायकांच्या काव्यात त्यांचे फारसे महत्त्वही नाही.

विनायकांच्या कवितांचा संपूर्णपणे विचार करू लागलो म्हणजे एक गोष्ट स्पष्ट होते. ती सारखी राष्ट्रीय भावनेभोवतीच फिरत असते. त्यातही पूर्व वैभवाचे स्तवन व ते हरपल्याबद्दल वाटणारी खंत या भावना प्रामुख्याने येतात. पूर्व वैभवाचे स्तवन करताना शिवप्रभूचे स्मरण त्यांना वारंवार होते. इतिहासातील स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या व बलिदान करणाऱ्या पराक्रमी युवतींचीही त्यांना आठवण होते, पण कवी त्यापुढे जात नाही. सत्तावनचे बंड त्यांना आठवत नाही, मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमाचे अनेक रोमहर्षक प्रसंगही ते दृष्टीआड करतात. त्यामुळे पूर्व वैभवाच्या त्यांच्या कक्षाही मर्यादित झालेल्या दिसतात. मराठे व रजपूत यांच्या इतिहासातील जी चित्रे कवीने रंगविली आहेत तीही अतिरंजित व भडक आहेत. पण त्यांतून प्रकट होणारी कवीची स्वातंत्र्यलालसा जिवंत वाटते. सद्यःपरिस्थितीबद्दल – पारतंत्र्याबद्दल – वाटणारी खंत मात्र उत्कट शब्दांत प्रकट होते. कवीची चीड व तडफड त्यांत दिसते, पण त्याबरोबरच नैराश्यही त्यांतून प्रतिबिंबित झालेले आढळते. कदाचित तत्कालीन परिस्थितीचा तो परिपाक असेल.

'गेले दिन यावे कसे,
वर्तने असे, एकदा फसे—
गाय जी गाळी — चेपत ती चालली '

ही कवीची भावना आपणांला सतत त्यांच्या कवितेतून आढळते. 'महाराष्ट्र-लक्ष्मी 'तील आशावाद हा त्याला अपवाद.

त्यामुळे त्यांचे काव्याचे विश्व हे मर्यादित झाले आहे. सामाजिक आशय त्यांच्या कवितेतून प्रकट होत नाही. किंबहुना कवी हा भूतकाळात रमून गेल्या-मुळे पूर्वपरंपरेचा अभिमानच त्यांच्या कवितांतून व्यक्त होतो. त्यांनी रंग-विलेल्या कथा-नायिकांची चित्रे आपणांला तेच दाखवितात. त्या पराक्रमी आहेत, त्यागी आहेत; पण त्याचबरोबर त्या सती पण आहेत व सतीत्वासाठी कसलेही बलिदान करण्याची त्यांची तयारी आहे. एका दृष्टीने त्या 'देवी' आहेत, पण त्यांचे चित्रण करण्यात आर्य स्त्रियांनी हाच आदर्श डोळ्यांपुढे ठेवावा अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळे रूढिभंजन हा विनायकांच्या कवितांचा विषयच होऊ शकला नाही.

आत्मलेखन हा जो आधुनिक मराठी कवितेचा केशवसुतांपासून सुरू झालेला विशेष त्याचेही स्वरूप विनायकांच्या बाबतीत मर्यादित राहिले. ज्वलंत राष्ट्रीय भावनांचे चित्रण हे एकमेव त्यांच्या काव्यातील आत्मलेखनाचे स्वरूप ठरले. 'प्रत' सारखी एखादी कविता त्यांच्या जीवनावर प्रकाश पाडते. पण एरवी विनायकांच्या कवितेत आत्मलेखन फारसे दिसून येत नाही. 'स्वानुभूत वासाचे दान' विनायकांच्या बाबतीत राष्ट्रीय भावनेपुरते मर्यादित ठरले. त्यामुळे वैयक्तिक अनुभूतीला त्यांची कविता स्पर्श करू शकली नाही.

सृष्टिवर्णनपर कविता किंवा प्रेम कविता यांचा त्याचमुळे त्यांच्या काव्यातून अभाव दिसतो. 'गणिकोद्धार,' 'ध्यास तो भास' यांसारख्या कथाकाव्यांतून कथनाच्या ओघात आलेले सृष्टिवर्णन सोडले तर कवी कुठेच निसर्गाकडे वळला नाही. 'गाण्याचे गाणे' या कवितेत मात्र शहराच्या कृत्रिम वातावरणा-

तून निसर्गाच्या मोकळ्या वातावरणात राहण्याची कवी इच्छा करतो. पण तसे निसर्गाचे आकर्षण कवीला नव्हते. प्रेमभावनेचे उत्कट चित्रणही विनायकांच्या कवितेत कुठे दिसत नाही. 'प्रीती' या भावनेची उदात्तता कवीने वर्णन केली आहे व विरही जनांची व्याकुळता दोन-तीन नाट्यगीतांतून रंगविली आहे. 'प्रत' या कवितेत प्रांजळ आत्माविष्कार आहे व 'अवन्तिके-' मध्येमुद्धा तो असावा असे वाटते. पण विनायकांचे खाजगी जीवन लक्षात घेता शृंगाराचा अतिरेक कुठेच नाही. प्रांजलपणा व संयम यांमुळे जी थोडीच प्रेमगीतं आहेत ती काहीशी हृद्य वाटतात. पण त्यापेक्षा अधिक काही नाही. प्रेमभावनेची उत्कटता, वेहोषी, धुंदपणा त्यांत कुठेच आढळणार नाही. असली तर चमत्कृतीच आढळेल.

बोधवादी दृष्टिकोणामुळेही विनायकांच्या कवितेला काही मर्यादा पडतात. एकदा हा दृष्टिकोण स्वीकारला म्हणजे विषयाची निवड करतानाही कवी त्याच भूमिकेतून विषयाकडे पाहू लागतो. त्याची प्रतिभा बोधवादाची कोंडी निर्माण करते व त्यातून बाहेर पडणे कठीण होते. पुष्कळदा उत्स्फूर्त सुचलेल्या विषयातही कवी बोध आणण्याचा आग्रह धरतो. विनायकांची भूमिका उघड-उघड बोधवादी कवीची आहे.

'चरितामृततरू बोधफलांनी दिसता ओथंबला
विनायक कूजाया लागला'

या किंवा

'जसे करावे, तसे भरावे; बीज तसे दाणे!
'विनायका'ला करी बोध हा कृष्णेचे गाणे'

यांसारख्या उद्गारांतून कवीची भूमिका सहज प्रकट होते. बोधासाठी विषयाची निवड व निवडलेल्या विषयातून बोध काढण्याचा आग्रह यांमुळे काव्याचे स्वरूप काहीसे उथळ होऊ लागते. विनायकांच्या पुष्कळशा काव्यांतून आढळणारा हा उथळपणा त्यांच्या या भूमिकेतून निर्माण झाला आहे असे वाटते. या वृत्तीमुळे कवीला अंतर्मुख होता येत नाही व अंतर्मुख झालाच तर

र्ती वृत्ती फार टिकत नाही. विनायकांची सर्व चरित्ररूप कथाकाव्ये या भूमिकेतून निर्माण झाली आहेत व त्यामुळे त्याला मर्यादा पडलेल्या आहेत. त्यातले त्यात समाधान एवढेच की बरीचशी नीतितत्त्वे विनायकांनी अर्थान्तरन्यासाच्या रूपाने कथाकाव्यात ग्रथित केलेली आहेत व त्यातील कथानकाशी ती एकजीव करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे उपदेशाची कंटाळवाणी लांबणही कोठे लावली नाही. त्यामुळे व वातावरणनिर्मिती, प्रसंगचित्रे व प्रसादपूर्ण मधुर अशी रचना यांमुळे ही कथाकाव्ये काव्यमय व आकर्षक झाली आहेत.

विनायकांच्या काव्यातील या मर्यादा लक्षात घेऊनही विनायकांचे काव्य रसिकांना प्रिय झाले आहे याची अनेक कारणे आहेत. प्रसादपूर्ण व मधुर अशी शैली हे त्यांपैकी प्रमुख कारण आहे. विनायकांची भाषाशैली सहज आहे. त्यात कुठेही कृत्रिमता नाही. परिमित अलंकारांनी ती नटलेली आहे. मनाची पकड घेणाऱ्या सुभाषितांची मधून मधून केलेली पेरणही भाषाशैलीची शोभा वाढवते. कथाकाव्यामध्ये तिचा ओघ धावता आहे. सुंदर शब्दचित्रे ती आपणांपुढे उभी करते; कथानकाला अनुकूल असे वातावरण ती निर्माण करते आणि कथेतील नाट्य आपणांपुढे ती साकार करते. कथाकाव्यांतील संवादांमध्येही त्या त्या पात्राचा भाव ती योग्य शब्दांत व्यक्त करते. राष्ट्रीय भावनांचा आविष्कार करताना तीच शैली ओजस्वी स्वरूप धारण करते. विनायकांच्या अंतःकरणातील खंत व व्यथाही ती यथायोग्य आविष्कृत करते. त्यामुळे विनायकांचे भाव तात्रडतोब रसिकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडतात.

भावनांचा प्रामाणिक आविष्कार हे विनायकांची कविता रसिकांना प्रिय होण्याचे दुसरे कारण. जे जाणवले ते कवीने उत्कटत्वाने लिहिले. जे जाणवले ते कदाचित मर्यादित असेल. विनायकांच्या व्यक्तिमत्वाच्या कक्षा विशाल नव्हत्या असे फार तर आपण म्हणू शकू. पण लोकप्रियतेच्या आहारी जाऊन न पटणाऱ्या व न जाणवणाऱ्या विषयांकडे विनायक वळले नाहीत. केशवसुतांच्या ' तुतारी 'मुळे सामाजिक सुधारणेवर कविता लिहिण्याची लाट त्या वेळी महाराष्ट्रात आली होती. मोठे मोठे कवी त्या लाटेत सापडले होते.

पण विनायक स्वतःच्या भावनेशी प्रामाणिक राहिले व त्याच भावनेची विविध अंगे त्यांनी आपल्या काव्यांतून आविष्कृत केली. विनायकांइतकी ती भावना कोणाच्याच काव्यांत इतक्या उत्कटत्वाने त्या काळी व्यक्त झाली नव्हती हे लक्षात घेतले तर विनायकांच्या लोकप्रियतेचे मर्म आपणांला कळू शकेल.

दीर्घ कथनपर काव्यांतून त्यांची जी कलात्मक दृष्टी व्यक्त होते तीही विनायकांच्या काव्याचे मूल्यमापन करताना आपण लक्षात घ्यावयास हवी. जरी एका विशिष्ट हेतूने बोधवादी दृष्टिकोणातून ही काव्ये लिहिली गेली असली तरी कथानकाचा विकास, शब्दचित्रांची पखरण, नाट्यपूर्ण निवेदन व कलात्मक संयम यांमुळे ही सर्व कथाकाव्ये आकर्षक झाली आहेत. 'गणिकोद्धार' हे काव्य तर मराठीतील उत्कृष्ट खंडकाव्याच्या रांगेत बसण्यासारखे आहे.

आधुनिक मराठी कवितेत विनायकांचे स्थान कोणते ? त्यांचा स्वतंत्र संप्रदाय निर्माण झाला काय ? केशवसुतांनी निर्माण केलेल्या संप्रदायात ते बसतात काय ? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. आधुनिक मराठी कवितेत राष्ट्रीय भावनांचा प्रभावी ओघ आणून सोडण्याचे श्रेय निःसंशय विनायकांकडे जाते आणि म्हणूनच आधुनिक मराठी काव्यातील राष्ट्रीय भावनेचे पहिले उद्गाते म्हणून मानाचे स्थान त्यांना द्यावयास हवे. महाराष्ट्राच्या नष्टदशेचे व दैन्याचे चित्रण त्यांच्या काव्यात जितके प्रखरपणे काढलेले आढळते तसे त्या काळातील इतर काव्यांत क्वचितच आढळेल. कधी पूर्व वैभवाचे दर्शन घडवून तर कधी तत्कालीन नष्टदशेचे चित्रण करून विनायकांनी देशाभिमानाची ज्योत महाराष्ट्रात प्रज्वलित करण्याचा प्रयत्न केला हे निर्विवाद आहे. त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन कवी माधव यांनी आपली ऐतिहासिक काव्ये रचली. कवी गोविंद, तिवारी, स्वातंत्र्यवीर सावरकर हे याच परंपरेमधील प्रमुख कवी. इतरही कवींनी देशभक्तीची ही ज्योत आपल्या काव्यांतून तेवत ठेवण्याचा प्रयत्न केला. विनायक हे या सर्वांचे स्फूर्तिकेंद्र होते हे विसरून चालावयाचे नाही.

केशवसुतांच्या संप्रदायात विनायक कवी कितपत बसतात ? स्वच्छंदवादी संप्रदायाची (Romanticism) जी चिन्हे केशवसुतांच्या काव्यात आढळतात

ती थोड्या फार प्रमाणात विनायकांच्या कवितेतून आढळतात असे दिसून येईल. विशेषतः भूतकालाचे आकर्षण हा स्वच्छंदवादी संप्रदायाचा महत्त्वाचा विशेष विनायकांच्या कवितेतून दिसून येतो. 'सुवास,' 'स्त्री आणि पुरुष,' 'प्रीती निमाली तर–,' 'नदी आणि कवी,' 'कवी' या काही कवितांवर तर केशवसुतांची छाप स्पष्ट दिसते. केशवसुतांप्रमाणे विनायकांनीही मात्रावृत्तांचा अधिकाधिक स्वीकार केला होता. विनायकांची राष्ट्रीय कविता तर त्यांचा आत्माविष्कारच आहे. त्या दृष्टीने केशवसुतप्रणीत नव्या संप्रदायाची अनेक चिन्हे विनायकांच्या कवितांतून दिसत होती. कदाचित जाणीवपूर्वक त्यांचा स्वीकार विनायकांनी केला नसेल. पण इंग्रजी कवितांच्या वाचनातून निर्माण होत असलेल्या नव्या प्रवाहात विनायकही न कळत सापडले होते हे निश्चित.

आणखी एक अवघड प्रश्न : विनायकांचे चरित्र व त्यांचे काव्य यांत संगती लागू शकते काय ? याचे उत्तर देणे कठिण आहे. विनायकांचे चरित्र अनेक व्यसनांनी दूषित झाले होते. विनायकांना स्वतःला त्याची जाणीव होती. अर्वाचीन कवितेच्या एका संग्रहासाठी दत्त कवींनी विनायकांकडे त्यांच्या काही कवितांची मागणी केली होती. ती नाकारताना विनायकांनी त्यांना लिहिले, "माझे चरित्र इतके विचित्र आहे की ते कोणी ऐकू नये. ऐकल्यास माझी कविता तो वाचणार नाही. तरी चरित्र हवे असेल तर कविता पाठविता येणार नाही." 'प्रत' या पत्नीला उद्देशून लिहिलेल्या कवितेतही स्वतःच्या व्यसनासक्त जीवनाची जाणीव कवीला पूर्णपणे होती असे दिसते. पण त्यांच्या या लौकिक चरित्राची झळ त्यांच्या काव्याला लागली नाही. कारण त्यांच्या लौकिक चरित्रापेक्षा त्यांचे चारित्र्य – अंतःस्थ चरित्र – भिन्न होते. जाज्वल्य देशाभिमान व स्त्रियांविषयी वाटणारी आदरबुद्धी सतत त्यांच्या अंतःकरणात जागृत होती. त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या काव्यांतून पडले. विनायकांचे चरित्र हे त्यांच्या शारीरिक दुबळेपणाचे व व्यसनाच्या गुलामगिरीचे प्रतीक आहे. शरीर त्या गुलामगिरीतून सुटू शकत नव्हते. पण त्यांचे मन मात्र निराळ्याच वातावरणात विहार करीत होते. तेच त्यांच्या काव्यातून

व्यक्त होत होते. त्यांच्या काव्यांतून प्रकट झालेले भाव हे विनायकांचे खरे चारित्र्य. खरे विनायक आपणांला त्यांच्या काव्यात दिसतात, त्यांच्या लौकिक चरित्रात नव्हे. महाराष्ट्र रसिकाने ते ओळखले आणि म्हणूनच लौकिक चारित्र डोळ्याआड करून विनायकांच्या कवितेला त्याने डोक्यावर घेतले व महाराष्ट्र कविपरंपरेत त्यांना मोठ्या मानाची जागा दिली.

'विनायकांचे तत्कालीन कवींत स्थान कोणते' याचा विचार करताना प्रा. वा. ब. पटवर्धन लिहितात: 'विनायकांसारखे कवी प्रसादचिन्ह म्हणून महत्त्वाचे आहेत. तबल्यावरची थाप आणि तंबोऱ्याच्या तारेचा शब्द म्हणजे गाणे नव्हे. गवयाच्या गाण्याचा भर आणि खरा रंग पुढेच असतो. पण तो यायला आणि त्याने रसिकवर्गाला डोलू लावायला त्या थापेची आणि त्या तारेच्या शब्दाची अत्यंत जरूर असते. त्यांच्यावाचून त्याचा उदयच व्हायचा नाही. केल्यापेक्षा करावयाची, झाल्यापेक्षा होणाराची, ज्ञानापेक्षा ज्ञेयाची मातब्बरी मोठी खरी. पण ती केव्हा? केलेले, झालेले आणि ज्ञात हातात असेल तेव्हा. कळीपेक्षा फुलाचा मान अधिक होईल. पण पुढच्या फुलासाठी कळीची जोपासना आणि कळीचे कौतुक केल्यावाचून मनुष्याला राहवेल काय? किंबहुना कळीची जादूच पुष्कळदा अधिक मोहक असते. तिच्या पोटी अनंत विश्व भरलेले असते. या दृष्टीने विनायकांसारख्या कवींची कविता वाचली असता महाराष्ट्राच्या व महाराष्ट्र वाङ्मयाच्या भवितव्यतेविषयी निराश होण्याचे कारण उरणार नाही." महाराष्ट्रात विनायकांनंतर विकसित झालेली राष्ट्रीय भावना व तिचा मराठी काव्यात झालेला आविष्कार लक्षात घेता कोणीही रसिक कवी वसंतांच्या वरील उद्गारांशी सहमत झाल्यावाचून राहणार नाही. म्हणूनच 'आधुनिक मराठी काव्यातील राष्ट्रीय भावनेचे पहिले व श्रेष्ठ उद्गाते म्हणून विनायकांचा केला गेलेला गौरव यथार्थ आहे असेच प्रत्येक रसिकाला वाटल्यावाचून राहणार नाही.

◎ ◎ ◎

# विनायकांचे चरित्र

विनायकांचे संपूर्ण नाव विनायक जनार्दन करंदीकर. त्यांचा जन्म धुळे मुक्कामी रविवार, दि. १५ सप्टेंबर १८७२ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जनार्दनपंत व आईचे नाव लक्ष्मीबाई. जनार्दनपंत हे कोर्टात लिलाव, फिर्याद वगैरे पुकारण्याचे काम करीत असत. त्यांना एकंदर पाच मुलगे व तीन मुली अशी आठ अपत्ये झाली. ज्येष्ठ चिरंजीव बळवंतराव हे पुष्कळ दिवस 'खानदेश-वैभव'चे संपादक होते. त्यांनी कविताही बरीच लिहिली व ती 'बलवंत,' 'रमाकांत नागावकर' व 'गंधर्व' या तीन नावांखाली प्रसिद्ध आहे. दुसरे चिरंजीव विश्वनाथपंत हे रेव्हेन्यू खात्यात नोकरीवर होते व कारकुनापासून हुजूर डेप्युटीपर्यंत त्यांची बढती झाली होती. जनार्दनपंतांचे तिसरे चिरंजीव विनायक.

विनायकांचा जन्म झाला त्या दिवशी पांजरा नदीला विलक्षण पूर येऊन जनतेचे खूप नुकसान झाले होते. जनार्दनपंत ज्या वाड्यात राहत त्या वाड्यात पुराचे पाणी शिरले होते व ते बाळंतिणीच्या बाजेपर्यंत येऊन पोहोचले होते. मोठ्या शिकस्तीने बाळबाळंतिणीला बाहेर काढण्यात आले. पण पुराने झालेले नुकसान भरून निघाले नाही. कुटुंबाचे या आपत्तीमुळे पुष्कळ हाल झाले.

विनायकांचे सर्व शिक्षण धुळ्याला गरुड हायस्कूलमध्ये झाले. त्या वेळी रा. ब. गणेश जनार्दन आगाशे हे मुख्याध्यापक होते व महादेव शिवराम आपटे हे दुय्यम शिक्षक होते. या दोघांच्या मार्गदर्शनाखाली विनायकांनी काव्याचे

धडे गिरविण्यास आरंभ केला. ग्रीनच्या जवळजवळ शंभर परिकथांचे त्यांनी कवितेत रूपांतर केले होते. ग्रेच्या ' Elegy 'चेही शाळेत असतानाच त्यांनी रूपांतर केले होते. त्याचप्रमाणे ' Principles of Morality ' या ग्रंथाचेही त्यांनी सरस गद्यात भाषांतर केले होते. शाळेमध्ये शीघ्र कवित्वाबद्दल विनायकांची प्रसिद्धी होती. त्यामुळे सर्व शिक्षकांची त्यांच्यावर अतिशय मर्जी होती. विशेषतः मराठीचे शिक्षक वांगीकर हे तर काही काही वेळा अध्यापनाचे कामही त्यांच्याकडून करवून घेत इतके मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व व प्रेम होते. शालेय जगात एक गणित विषय सोडला तर बाकी सर्व विषय त्यांना अतिशय आवडत. ते नेहमी म्हणत की मला गणिताखेरीज अगणित विषय आवडतात.

१८९१-९२ साली विनायक स्कूल फायनल परीक्षेला बसले. पण त्या परीक्षेत ते उत्तीर्ण मात्र होऊ शकले नाहीत. परीक्षा अनुत्तीर्ण होण्याचे कारण मात्र मजेदार आहे. स्कूल फायनल परीक्षेसाठी विनायक मुंबईला गेले होते. केशवसुत त्या वेळीं मुंबईलाच नोकरीला असत. विनायकांना भेटण्यासाठी म्हणून केशवसुत गोरेगावकर बिल्डिंगमध्ये गेले असताना गप्पांमध्ये ते दोघे इतके गुंगून गेले की विनायकांना परीक्षेला व केशवसुतांना नोकरीवर जाण्याचेही भान उरले नाही. एक पेपर अशा रीतीने सुटल्याने विनायकांना परीक्षेत अनुत्तीर्ण व्हावे लागले. त्यानंतर परीक्षेला ते पुन्हा बसले नाहीत.

१८९३ साली विनायकांचा विवाह झाला. त्यांचे सासरे रंगो वामन पटवर्धन हे एरंडोलला सर्कल इन्स्पेक्टरच्या कामावर होते. विनायकांचे वैवाहिक जीवन मात्र तितकेसे यशस्वी झाले नाही. यात दोषांचा वाटा सरस्वतीबाईकडे अधिक होता की विनायकांकडे अधिक होता हे सांगणे कठिण. विनायकांना काव्य-देवीच्या उपासनेपुढे इतर गोष्टी कदाचित तुच्छ वाटत असाव्यात. आणि म्हणून कदाचित आपल्या पत्नीची उपेक्षा त्यांच्याकडून झाली असेल. कदाचित त्यांच्या भावजीवनाशी सरस्वतीबाई समरस होऊ शकल्या नसतील. त्यातच पुढे त्यांना जडलेल्या व्यसनांची भर पडलेली असावी. काहीही कारण असो आणि

जबाबदारी कुणाचीही असो, विनायकांचे वैवाहिक जीवन फारसे सुखाचे होऊ शकले नाही हे मात्र खरे.

> ‘ मी हट्टी, मजहूनही अधिक तू आहेस हट्टी खरी
> केला हट्ट तुवाच, दोष मजला का लाविसी तू तरी ?
> राहोनी पतिसंगमी सुख जसे, ते का वियोगी असे ?
> नाही भ्रान्ति तुझी अजूनि फिटली, त्याला करू मी कसे ? ’

या विनायकांच्या उद्‌गारांमागे काहीतरी विदारक परिस्थिती असावी असे वाटल्यावाचून राहत नाही.

पोलीस खात्याबद्दल वास्तविक विनायकांना आत्यंतिक अनादर. ‘ एक पोलीस अम्मलदार ’ म्हणून त्यांनी जी अगदी पहिली कविता केली ती धुळे शहरातील एका पोलीस इन्स्पेक्टरवर व ती त्या वेळी चांगली गाजली होती. पण परिस्थितीमुळे विनायकांना प्रथम पोलीसमध्येच नोकरी करावी लागली. ती नोकरी त्यांच्या मनोवृत्तीस पोषक नसल्याने ती त्यांना लवकरच सोडावी लागली. या नोकरीत असतानाच विनायकांना ‘ वेश्या आणि वारुणी ’ची व्यसने लागली असावीत असे म्हणतात. एका असिस्टंट कलेक्टरकडे नोकरीला असताना तेथील शिरस्तेदाराने त्यांना हा मंत्र दिला असावा असेही काही म्हणतात. कोणाकडून त्यांनी ही दीक्षा घेतली असेल ती असो, पण जन्मभर ही व्यसने त्यांचा पाठपुरावा करीत राहिली. या व्यसनांच्या आहारी जरी विनायक गेले असले तरी त्याची जाणीव त्यांना सतत होत होती व त्याबद्दल त्यांना खंतही वाटत होती हे अनेक उल्लेखांवरून दिसून येते. दत्त कवींनी प्रातिनिधिक काव्यसंग्रहाकरिता ज्या वेळी त्यांचे चरित्र मागितले त्या वेळी ‘ माझे चरित्र इतके विचित्र आहे की कोणी ऐकल्यास माझी कविताच तो वाचणार नाही, तरी चरित्र हवे असल्यास कविता पाठविता येणार नाही ’ हे त्यांचे उत्तर त्यांना आपल्या व्यसनांबद्दल वाटत असणारी खंतच व्यक्त करते. स्वतःच्या पत्नीला उद्देशून लिहिलेल्या कवितेतही हाच सूर दिसून येतो.

पोलीस खात्यातील नोकरी सोडल्यानंतर काही काळ त्यांना अज्ञातवासात काढावा लागला. या काळात धार व देवास या संस्थानांचा त्यांनी आश्रय केला असावा असे म्हणतात. त्यानंतर सावदे येथील दानशूर सरदार देशमुख यांच्याकडे काही काळ त्यांनी नोकरी केली पण तीही त्यांना सोडावी लागली. धरणगावच्या मिशनरी बायकांस मराठी शिकवावयास पंडित म्हणून काही काळ ते राहिले. हीही नोकरी त्यांनी सोडून दिली व १९०७ साली नगरदेवळे येथील जहागिरदारांकडे कारभाऱ्याची जागा त्यांनी पतकरली. ही त्यांची शेवटचीच नोकरी. कारण १९०९ साली नाट्यकला संगीत प्रवर्तक मंडळीने त्यांचे 'प्रभावती' हे नाटक रंगभूमीवर आणण्याचे ठरवून त्यांना पुण्यात बोलावून घेतले. पुण्यात येऊन पाच-सहा दिवस होतात न होतात तोच तापाने त्यांना पछाडले. ते अत्यवस्थ असताना तारेने त्यांच्या पत्नीस त्यांच्या आप्तेष्टांनी बोलावून घेतले. विनायकांना मृत्यूने गाठण्याच्या आदल्याच दिवशी त्या तेथे येऊन पोहोचल्या. त्यांना पाहिल्यावर 'आपण आपल्या पत्नीला आयुष्यात सुखी करू शकलो नाही' या जाणिवेने विनायक लहान अर्भकाप्रमाणे रडू लागले. त्यांच्या भावनाप्रधान अंतःकरणाला पश्चात्तापाची अलोट भरती आली आणि त्यानेच जणू त्यांच्या कृतकर्मांचे पूर्णपणे क्षालन केले. दुसऱ्याच दिवशी दि. ३०-३-१९०९ रोजी पत्नीच्या मांडीवर त्यांनी सुखाने प्राण सोडला.

विनायकांच्या चरित्राची ही ढोबळ रूपरेषा पाहिली तरी एक गोष्ट स्पष्ट होईल. विनायक कितीही व्यसनांच्या आहारी गेले असले तरी त्याची त्यांना जाणीव होती व त्याबद्दल त्यांच्या मनाला खंतही वाटत असे. त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे नव्हते याचा दोष कदाचित त्यांच्याकडे असेल किंवा त्यांच्या पत्नींकडे – सरस्वतीबाईकडे – असेल. पण त्यामुळे स्त्रीवर्गाविषयी अनुदार भावनेचा स्पर्शही त्यांच्या मनाला झालेला नसावा. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या अनेक कवितांतून दिसते. पोलीस खात्यात नोकरी करूनही मनातील राष्ट्रीय भावनेची ज्योत त्यांनी सतत जागृत ठेवली. प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देत असतांनाही आपल्या स्वभावातील गोडवा त्यांनी कायम ठेवला. त्यामुळे विनायक

म्हणजे वरवर वाटणारे विसंगतीचे एक गाठोडेच होते. वरवर विनायकांच्या जीवनाकडे पाहणाऱ्यांना त्यांची व्यसने दिसतील, त्यांची संसाराविषयीची बेफिकिरी आढळेल, पण खरे विनायक त्यांना तेथे सापडायचे नाहीत. ते सापडतील त्यांच्या काव्यात. विनायक हे अंतःकरणाने कवीच होते. ' जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे ' ही त्यांची वृत्ती होती. सौंदर्याची ओढ, त्याबद्दल वाटणारी आसक्ती हा त्यांच्या स्वभावाचा महत्त्वाचा पैलू होता. त्यामुळे दैनंदिन जीवन व व्यवहाराची रुक्ष बंधने कदाचित त्यांना मानवली नसावीत. पण त्यांचे मन रमत होते काव्याच्या प्रांगणात. कल्पनेने भूतकालात विहार करून त्या जीवनाशी समरस होणे व त्यामधून देशाभिमानाच्या दिव्य भावनेची प्रेरणा घेणे हे विनायकांना विशेष मानवले.

आणि म्हणून विनायकांच्या व्यक्तिमत्वाची खरी ओळख करून घ्यावयाची असेल तर ती त्यांच्या काव्यातून करून घ्यावी लागेल, त्यांच्या खाजगी जीवनातून नाही. त्यांचे काव्य हेच त्यांचे भावमय जीवन. त्याचीच ओळख ' महाराष्ट्रलक्ष्मी ' करून देईल.

०  ०  ०

महाराष्ट्रलक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे,
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष दाटे. ध्रु०

पुनः पुन्हां परचक्रानें ताडिली बिचारी,
दीर्घकाल खचली होती पारतंत्र्यभारीं,
द्वादशाब्द दुष्काळानें जाहली भिकारी,
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथें. १

मावळांत वास, न ठावें जया बाह्य वारें,
नेमधर्म ज्यांचे लोकीं कृषीकर्म सारें,
विळा कोयतींच ज्यांचीं काय तीं हत्यारें,
तेच वीर बनले सरुयीं मावळे मराठे. २

नये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी,
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ? ३

साधुसंत झाले, असती, तयांची न वाण,
मात्र रामदासा लाधे समर्थाभिधान,
जो मनीं स्वदेशहिताचें धरोनी निशाण
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटें. ४

कढीभातखाऊ म्हणती ब्राह्मणा जगांत,
ढिली कांस ज्यांची म्हणुनी हांसती, हंसोत,
तयांनींच करणी केली प्रसंगीं अचाट,
खोल गढे परसत्ता ती ढासळली लाथें. ५

पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं मग जहाल,
रात्र सरे तेव्हां उगवे दिनहि पूर्ववाटे. ६

रोगें पीडित नगरें नसतीं योग्य वसायाला
म्हणुनि बांधिले पुण्याश्रम, निर्मला पर्णशाला. ध्रु०

गणरायाची मूर्ति मंगला स्थापूं त्या स्थानीं
नेत्रावाटें खळखळ वाहे दुःखानें पाणी
विघ्नहरातें प्रेमें न्हाणूं त्याच आंसवांनीं
वाहूं पट जो कर बसल्यानें जीर्ण असे झाला. १

अशा प्रसंगीं तिलक लाधणें महत्प्रयासाचें
दिसो दिसेल सुनें त्यावेगळें भाळ गणेशाचें
पुष्प एक वाहून टाकिलें आहे 'चांफ्या'चें
दुसरें मिळवावयास जाऊं—करूं उद्यमाला. २

कामांधकरीं पडती, रडती युवती दिनरात
दीर्घ उसासे त्यांचे येथें धूप—तुल्य होत
सर्वग्रासी दिसे पेटली परसत्ता—ज्योत
तिनेंच ओवाळूं देवाला, करूं मंगलाला. ३

सार वस्तुंचा लोट सारखा परदेशीं जातां
नैवेद्यास्तव कांहीं नुरलें, काय करूं आतां ?
किती आळवूं, गाऊं, ध्याऊं तुम्हा दीननाथा
रचिले, रचितों अपराधांचे शत पोटीं घाला. ४

• •

# शिवराजदर्शन                                                                 : ३

गडावर जाऊं। शिवराजदर्शना लाहूं. ध्रु०

भुललों पूर्व विसरलों सारें,
अंगीं भरलें नूतन वारें,
मूर्खत्वाचे तुटती तारे,
सत्य तें पाहूं. १

आली नयनांवर अंधारी,
न दिसे न कळे स्वकर दुपारीं,
सहजच भिस्त परांवर सारी,
स्वरूपा पावूं. २

खान पराचें, पान पराचें,
भान ज्ञान स्थान पराचें,
उरलें अंतीं काय स्वतांचें
शोधना धांवूं. ३

परतेचा दृढ घेरा पडला,
स्वभाव त्यायोगें अवघडला,
चिंताभृंग मनाला जडला,
घालवूं बाऊ. ४

सद्गुरुविना सोय न दुसरी,
व्यसनसागरीं ती एक तरी,
निर्णय पैल तडीला उतरी,
चला त्या ध्याऊं. ५

आमचा गुरु श्रीशिवराणा,
पुनरुज्जीवन हेतु पुराणा,
महाराष्ट्रवीर्यांचा बाणा,
संकटीं वाहूं. ६

देह तयाचा, जीव तयाचा,
नेत्र श्रवण तयाची वाचा,
सर्व तयाचें, ज्याचें त्याच्या,
कारणीं लावूं. ७

घालूं लोटांगण तच्चरणीं,
पाहूं रूप तयाचें नयनीं,
लावूं जीव तद्गुणश्रवणीं,
तद्यशा गाऊं. ८

## इतिहासाचें मर्म : ४

घटियंत्राचा कांटा घडोघडीं, अंक तेच ते दावी,
नियमच इतिहासाची आवृत्ति तशी पुनः पुन्हां व्हावी. १

वर्णांचा, रूपाचा, पोषाखाचा नसे नसो मेळ,
मन एक सर्व भूतीं खेळवितें एकसारखे खेळ. २

दुष्ट जसे, सुष्ट तसे, गांवोगांवीं घरोघरीं असती,
झाले, आहेत, पुढें होणार; समान कालचक्रगती. ३

नलगे कराल दंतहि दंष्ट्रा शत कर तशीं सहस्र मुखें,
दानव मानवरूपें दीनांवर मौज मारितात सुखें. ४

देव म्हणा, दैत्य म्हणा, सत्त्वतमोवृत्ति अन्य शब्दांत,
युद्ध नव्हे त्यांत नवें जें सांप्रत तेंच कीं पुराणांत. ५

झाले सत्त्वतमांचे अवतार असंख्य आजपर्यंत,
होवो आरंभ कसा, सत्त्वाचा गोड जाहला अंत. ६

केलें महा प्रयत्नें व्याप्त जरी सकल गगन मेघाहीं,
सूर्या लोपविण्याची पूर्णत्वें शक्ति त्याजला नाहीं. ७

सत्त्वांश प्रथम तसा दिसला दबला जरी तमाखालीं,
त्याचा प्रकाश भूवर पडावयाचाच कीं यथाकालीं. ८

सत्त्वीं गुण दुसरा, तें तमोगुणाच्या तमोगुणास हरी,
मिळवी निजरूपा त्या वन्हि जसा वन्हिमय समस्त करी. ९

कौरवपांडवरावणराघवबलिवामनप्रबंधांत,
हा बोध, हींच तत्त्वें, सर्वत्र भरून पूर्ण दिसतात. १०

अथवा जुन्या कथा ह्या कविलाघवनिर्मिता जयां गमती,
नूतन शिवचरिताचें पठण तयांची करी निरभ्र मती. ११

शिवचरिताचें चिंतन आशेचें रुजवितें मनीं बीज,
केल्या उद्योगाचें, कळवी, केव्हां तरी घडे चीज. १२

तळहातीं टेकुनी ही स्वशिरातें बैसली ! ध्रु०

मस्तकीं केश विखुरले,
श्वास चालले, अश्रु लोटले,
गळे जल गालीं—चिंतेनें पोळली ! १

वस्त्रें तीं अपुरीं जुनीं,
तेथ कोठुनी, असावा मणी,
दीनता ल्याली—दुःखानें कावली ! २

दारिद्र्य, घरीं जागतें,
अन्न काय तें, दिसेना कुठें,
वायुजलवाली—गगनाची सांउली. ३

होती ती सिंहासनीं,
भाग्यशालिनी, धनी विजयिनी,
परी तिज खालीं—दुर्दैवें ओढिली. ४

एकाश्रुबिंदुकारणें,
तियेच्या रणें, झुंजले मनें,
असे सुत व्याली—जयकालीं माउली. ५

कारटीं करंटीं तिथें,
निपजलीं भुतें ! मातृशोणितें—
स्वतांला लाली—आणाया धांवलीं ! ६

कल्याण काय नेणतीं,
नित्य भांडतीं, आपसांत तीं,
परां वश झालीं-स्वत्वाला विसरलीं ! ७

गेले दिन यावे कसे,
वर्तनें असे, एकदां फसे—
गाय जी गाळीं- चेपत ती चालली ! ८

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी—यापुढें !
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी—यापुढें !
मावळे, जयांनीं दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें ! १

निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं,
यवनांना धायी धायी—यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें राज्य आपलें, असें व्यापिलें जया यवनांहीं—
कोण असा प्रसवे आई—यापुढें ! २

फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें !

घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आला कोण--यापुढें !
जें शिवें, स्थापिलें नवें, राज्य त्या जवें वाढवी बाजी
सर करील त्याची कोण--यापुढें ! ३

अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी--यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्य-भरारी--यापुढें !
फडनवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी--यापुढें !
जी खनी, प्रसवली मणी, यापरी जनीं, बहुगुणी भारी
झाली ती हाय भिकारी--यापुढें ! ४

ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं--यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं--यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली--यापुढें !
यापरी, नाडलों तरी, लोचनांतरीं, नीज जी भरली--
ती निघेल करण्या काळीं--यापुढें ! ५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36660 दि: 9100—
क्रमांक 7675 नों दि: 25/8/60

राजा या पद्वीस पात्र जगतीं कोणी नसे मानवीं,
राजा ईश्वर; सृष्टिकार्य अवघें इच्छाबलें चालवी;
तो भूपाल कृपालदृष्टि करितो सर्वांस संगोपन,
स्वार्थी मानव राजता मिळविती व्हाया स्वतांची धन. १

साधे, देउनि पाय बांधवशिरीं, सिंहासनाची उडी,
होई, राजकिरीट, दीन दुबळे लावून देशोधडी;
पाडावें अबल प्रजेस उघडें, तैं राजवाडा उटे,
झाला एक धनी गिळून बसतो सर्वस्व कष्टार्जितें. २

साक्षी देव, न राज्यलोभ धरुनी मीं घोर केलीं रणें,
न व्यक्तीस्तव रक्तपात घडला, साऱ्या जनांकारणें;
मेले कोण म्हणेल बंधु पडले देशार्थ जे संगरीं ?
त्यांची कीर्ति जगांत गाजत असे; सुस्थान त्यांना वरी. ३

स्वर्गीं सर्व जन स्वतंत्र; न कुठें कारागृहें, शृंखला,
स्वर्गीं थार न, बांधवा तुडविती सत्तामदें, त्या खलां,
स्वर्गद्वार खुलें न वैरकलहा; प्रेमैक सर्वांतरें,
स्वर्गीं देव पिता; अभेद भजती त्याचीं तया लेंकरें. ४

साहेना परबंधनांत पडली माझी महाराष्ट्रभू,
केला यत्न, निमित्त केवळ तया मी; साह्य झाला प्रभू;
त्याचें कार्य तयें स्वयें घडविलें, स्वातंत्र्य पात्रां दिलें,
सोसाया परतंत्रता जगविलीं मागें तियेचीं मुलें. ५

स्वातंत्र्यास्तव कीं उगाच करितां हा आरडाओरडा,
देशाचा अभिमान सर्व तुमचा मातें दिसे कोरडा;
स्वर्गी लाजविले स्वपूर्वज तुम्ही, ते आंसवें ढाळिती,
कीं आले खर, भारवाहक असे पोटीं मनुष्याकृती. ६

कोठें मालुसरे, सहोदर, कुठें हे मावळे आजचे,
बाजीब्राह्मणवंशजांस बघतां उत्साह सारा खचे;
वीरांनीं पहिल्या स्वभूजननिला जीवंत केलें खरें,
आतां प्रेत तिचें चिरीत बसलीं त्यांचीं मुलें लेंकरें. ७

एकी जाय लया, परस्पर नसे विश्वास तो राहिला,
कोणाला न पुसे कुणी; निजहितीं जो तो दिसे गुंतला;
वाढे मत्सर, लोभदृष्टि अवघे; साहे परोत्कर्ष न,
झालें काय अशा गुणें स्वजनतास्वातंत्र्यसंपादन ? ८

कष्टाचें फळ वांच्छिलें न; नृपता मातें प्रभूनें दिली,
ती त्याची समजून मीं निजशिरीं अत्यादरें वाहिली;
प्रेमें वागविली प्रजा; मजसवें तीही तशी वागली,
होती भूषण तीच दूषण परी आतां दिसूं लागली ! ९

मी माझी म्हणवीतसें बघवतें आतां न ती लोचनीं,
कां हांका मज मारिते ? न कळतें, वर्षांत एका दिनीं;
माझी कां प्रतिमा वृथा बसविते बाहेर सिंहासनीं ?
देशप्रीति मनीं नसून, यश का येई अशा साधनीं ? १०

मीं केलें, करणार काय, अवघी सत्ता प्रभूच्या करीं,
त्याला आळविणें नको, वळखतो तो भक्ति खोटी-खरी,
स्वातंत्र्यक्षम होय सर्व जनता जाणेल जेव्हां प्रभू,
तेव्हां वेळ नको स्वतंत्र सुभगा व्हाया महाराष्ट्रभू. ११

# दसरा : ८

आला दसरा दिवस सुखाचा
आनंदाचा सण सोन्याचा
सुमुहूर्तें शींव लंघून पुढें होण्याचा
ध्वज विजयाचा आंगणांत उभवायाचा. १

झाला महिषासुर खल बली
निर्दय दीन गोद्विजां छळी
याच दिनीं त्याचा बली आदि माउली
घेऊन, धरा शांतवी, करी सावली. २

रामें याच मुहूर्तावरी
पडली स्वस्त्री रावणकरीं
बहु पराक्रमें मिळवून धुळीला अरी
निज गृहलक्ष्मी यशवंत आणिली घरीं. ३

सरले आजच दिन वांकडे
पांडव निधडे सरले पुढें
कुरुपुत्रांची रणमखीं आहुती पडे
गत राज्यलाभ पांडवां साहजीं घडे. ४

आजच वीर मराठे गडी
करुनी जीवांची घडी
परधर्माची रगडून सांकडीं खडीं
ध्वज भगवा फडकाविती सिंधुचे थडीं. ५

आम्ही हिरे तयांचे कुळीं;
जसी ज्योतीला काजळी
हारवून सर्वस्वास फाकितों धुळी
स्वर्णभू आमचे करीं राख जाहली ! ६

फिरतें कालचक्र भूवरी
दसरा ये प्रतिसंवत्सरीं
पूर्वज–स्मरण आम्हांस देतसे परी
सोडवें न धाम, ग्राम राहिलें दुरी. ७

झालों आम्ही घरकोंबडे
विणितों शब्दजाल कोरडे
शब्दाचें वादळ कृतीविण फिकें पडे
आमचेंच वर्तन आम्हां नित्यशा नडे. ८

तुज वनराजा काय ग्रहदशा आली। परवशता प्राप्त जहाली ॥
तूं विपिनींचा सार्वभौम अधिकारी। मृगकुलें प्रजा तव सारी ॥
तव आज्ञा ही वेदवाक्य कांतारीं। तूं राजा थोर विचारी ॥
गर्जना तुझी धैर्या कांपविणारी। चपलेची दृष्टि भरारी ॥

मदभरें नाग जो नाचे।
मस्तकीं चढून तयाचे।
भक्षिसी कवळ मोत्यांचे।

ऐश्वर्य असे असें तुझें जयकालीं। परि आलें काय कपाळीं ! ॥ १ ॥

दुर्दैव तुझें पडलास कसा रे आतां। कपट्यांच्या निर्दय हाता ॥
ते थाटानें मिरवितात; तव माथां। हाणिती तडातड लाथा ॥
तूं दुबळ्यांच्या साहसी प्रतोदाऽघाता। भीसी श्वासा ! दम्पाता ! ॥

निःशंकपणें नरनारी।
करितात तुझ्यावर स्वारी।
ये अशी तुला लाचारी।

तव कर्णांची निर्भय धरुनी पाळी। लववितो तुज मुलीबाळी ! ॥ २ ॥

स्थिति रुचे कशी तुज ही लाजिरवाणी। कोठें तव दडलें पाणी ?
जीवंतपणीं स्वत्वाची होतां हानी। प्रेतकळा पावे प्राणी ॥
मृदुलता अशी धरितां लोण्यावाणी। खातील तुला ओठांनीं ॥

समज हे मानवी कावे।
कुरवाळित घेती चावे।
मृगजलास या न फसावें।

ही इष्ट नव्हे परवशतेंत बहाली। नाच रंग दीस महालीं॥ ३ ॥

● ●

१

करि चातुर्यें जी बंधमुक्त नाथाला
पद्मिनी असे ती पात्र धन्यवादाला. ध्रु०

मेवाडपती भीमसिंग याची राणी,
पद्मिनी गुणाची, लावण्याची खाणी;
यद्रूपगुणांचीं गातां गातां गाणीं,
विख्यात कवी भाटांची शिणली वाणी;
तो सौंदर्याचा महिमा पडतां कानीं,
वदनाला सुटलें दिल्लीशाच्या पाणी,
 तिजवीण सुचेना कांहीं त्याजला,
 ध्यास त्या चारुगात्रीचा लागला,
 चिंतनीं तिच्या रूपाच्या रंगला,
केवळ ती सुंदर पुतळी मिळवायाला,
घातला तयानें चितुरावरती घाला.

२

जो परनारीचा मनीं धरी अभिलाष,
होईल यशाचा लाभ कुठुनि तयास ?
सोत्साह वेढिलें अल्लानें चितुरास,
तत्रापि लागलें व्हावें त्यास हताश.
पावलें तयाचें सैन्य बरेंच विनाश,
पद्मिनीप्राप्तिची सोडी न परी आस.
 पद्मिनीवदनचंद्राच्या दर्शनें,
 मज फेडूं द्या नयनांचें पारणें,
 याशिवाय दुसरें नाहीं मागणें,
प्रार्थिलें तयानें असें भीमसिंगाला,
तो सजला त्याचें अभीष्ट पुरवायाला !

३

प्रत्यक्ष पद्मिनी दाखविली त्या नाहीं,
आदर्शे प्रतिबिंबित स्वरूपानेंही,
तो चकित होय; जावया निघे लवलाही,
मन गढे पद्मिनीप्राप्तीच्याच उपायीं
पद्मिनीविना त्याजला दिसेना कांहीं,
पद्मिनीस्वरूपें दिशा व्यापिल्या दाही.
विश्वास ठेविला भीमें त्यावर,
पोंचवावयास निघाला सादर,
कुटिलतापूर्ण यवनाचें अंतर,
जातांच तयाच्या भीमसिंग गोटाला,
शृंखलाबद्ध यवनानें केलें त्याला !

४

यवनानें केला विश्वासाचा घात,
गोंविला यापरी भीमसिंग पाशांत;
संदेश धाडिला 'भीम व्हावया मुक्त,
झालीच पाहिजे मला पद्मिनी प्राप्त.'
हळहळले जन जाहला एक आकांत,
परि न विझाली पद्मिनी धिराची ज्योत
ती म्हणे 'असे पति माझें दैवत,
त्यावरी आणिलें दुष्टें संकट,
मी दूर करीन परी तें निश्चित,
प्राणही बळी देईन आपुले काळा,
लावून न घेइन डाग परी स्वकुलाला.'

५

घेऊन आपल्या मंत्रिजनांस सहाय्या,
चतुरेनें रचिली एक विलक्षण माया;
संदेश गोड धाडविला दिल्लीराया,
‘ पद्मिनी असें वाहिली आपल्या पायां;
आपल्या, तिच्या वैभवास योग्य दिसाया,
सखिसमूह तिजसह असे धाडिला राया ! ’
तळ यवनें दिधला होता ते स्थळीं.
पद्मिनी परिजनसंगें पातली,
टवटवली यवनपतीची मुखकळी.
प्रलयाग्निज्वाला जातिवंत अहिबाला,
पद्मिनी वाटली त्या सुमनांची माला !

६

पद्मिनी लाभली तरी भीमसिंगातें,
सोडूंच नये, यवनांस यापरी वाटे,
पद्मिनीस निज कांतानें भेटायातें,
अवकाश दिला अति अल्प देहलीनाथें;
तो स्वतः कल्पनापटावर स्थिर चित्तें,
रंगवीत बसला भावि सुखाचीं चित्रें !
चतुरेनें सखिवेषानें चांगले,
शूर वीर संगें होते आणिले,
वेळेवर सैन्य तयांचें थाटलें,
घातला अरीवर अवचित त्यांनीं घाला,
झडपिती जसे हरि करीस, गरुड व्याला.

७

पद्मिनीरवाची तृषा ज्यास अनिवार,
शिरले यवनाच्या श्रवणीं त्या टंकार;
दर्शनें तिच्या जे न्हावे लोचन गार,
त्यापुढें राहिला उभा सज्ज दलभार;
कंठांत पहावें हात तिचे सुकुमार,
थाटली मिठी त्या घालाया तरवार.
  घनघोर यापरी वेळा पातली,
  येऊन जिवावर त्याच्या बेतली,
  तेधवां तयाची गुंगी उतरली,
वितुळलें सुखाचें अभ्र उघडला डोळा,
युद्धास तत्क्षणीं तोही सज्ज जहाला.

८

लगटले वीर माजला घोर संग्राम,
लागले असंख्य म्हणाया राम ! रहीम;
रजपूत रणीं पडले रक्षाया धर्म,
त्या योगें ते पावले स्वर्गसुखधाम,
अल्लास जरी लाधले जयश्रीदाम,
झाला न तरी परिपूर्ण तयाचा काम.
  कीं त्यास पद्मिनी नाहीं लाधली,
  गर्दीत पतीसंगें ती निसटली,
  येऊन सुखें स्वपुराला राहिली,
यापरी अरिस जी दिपवी रजपुतबाला,
गाऊन तिच्या चरितास विनायक धाला.

# राणी दुर्गावती



वीरशालिनी धन्य धन्य ती राणी दुर्गावती,
सत्कीर्तिध्वज जिचा फडकतो आजवरी भारतीं. ध्रु०

बुंदेलीं जे पराक्रमी नृप थोर थोर जाहले,
महोबाधिपति चंदन त्याचें नांव त्यांत गाजलें,
भगवंताच्या कृपाप्रसादें रायाला चांगलें,
कन्यारत्न प्राप्त जाहलें रूपें जें आगळें.
आनंदाचें भरतें तेणें रायाला लोटलें,
नांव तयें कन्येचें दुर्गावती असें ठेविलें.
चांफ्याची कलिका क्रमें क्रमें ज्यापरी,
खुलतांना दिसते नयनातें साजिरी,
तैशी ती वाढे रम्य सुभगमंजिरी,
प्रफुल्ल सुंदर कमलावरती भृंग उड्या घालिती,
तत्प्राप्तिस्तव झटूं लागले असे थोर भूपती.

२

गढमंडळाचा राजा दलपत निश्चित केला वर,
नृपें तयाच्या करीं ओपिला निज कन्येचा कर;
पदरीं पडतां स्त्रीरत्न असें तेजस्वी सुंदर
विळाससरितेमध्यें लागे पोहाया नृपवर
राज्य विसरला, प्रजा विसरला, नित्य सुखी तो चुर,
त्यायोगें संकट ओढवलें त्याच्या राज्यावर.

स्त्री भूषण-जीवन-संसाराचें खरें,
परि, परिमित सेवन तिचें करावें बरें,
अति लुब्ध न व्हावें तीच्या ठाया नरें,
स्त्रीच्या ठायीं दलपतसम जो होतो लंपटमती,
जीवित्वाला—सर्वस्वाला—मुकतो तो शेवटीं.

३

दिवस सुखाचे सरले; भरली आयुष्याची घडी,
झाली रायावर काळाची दृष्टि पहा, वांकडी;
दुर्गावतिच्या सौभाग्यावर यमें घातली उडी,
दु:खाच्या सागरीं सांपडे अबला ती बापडी;
संकटांतही तिनें उभविली परि धैर्याची गुढी,
बुद्धिमतीनें स्वतां बसविली पतिराज्याची घडी;
नृपपदीं बसविलें बाळ तिनें आपलें,
राज्याचें स्वकरीं सर्व सूत्र घेतलें,
सुखविलें प्रजेला चातुर्याच्या बळें,
अबलेच्या राज्यावर डोळा लोभी नृप ठेविती,
अकीर्तिकारक काय लोभ हा! नीचपणा हा किती!

४

अबुल फाजलें हर्षें ज्याचें यशोगान गायिलें,
त्या अकबर रायाचें झालें लोभें मन आंधळें,
न्याय कळेना—नीति कळेना, स्वार्थ मात्र त्या कळे,
अबलेचेंही राज्य तयाला घ्यावेंसें वाटलें!

तीच्या राज्यावरती त्यानें थोर सैन्य घाडिलें,
निकरें झुंजावया लागलीं समरीं दोन्ही दळें.
शौर्यानें लढली राणी दुर्गावती,
पाहून पराक्रम तिचा, अरी लाजती,
त्या न सुचे कांहीं, झाले कुंठितमती.
पडूं लागल्या भरभर त्यांच्या रणयज्ञीं आहुती;
विजयश्री, वाटलें, घालिते दुर्गावतिला मिठी.

५

परंतु एकाएकीं फिरलें युद्धाचें पारडें,
कुमार आवडता राणीचा धारातीर्थीं पडे;
तीच्या सैन्याच्या धैर्याचें खचलें तेणें कडें,
रणांत हाहाकार पसरुनी गेला चोंहीकडे;
पुत्र हरपला; परि त्या स्त्रीला फुटलें नाहीं रडें,
कमान वीरत्वाची पुत्रप्रेमावरही चढे !
निकरानें होती तशीच ती झुंजत,
तद्गात्रें झालीं अतिश्रमें विगलित,
अंगांतुनि होतें रक्त तिच्या वाहत,
निज राज्ञीची ऐसी दुर्धर पाहूनीयां स्थिती,
एक तिचा स्वामिनिष्ठ सेवक वदे असें तिजप्रती.

६

'यशःप्राप्तिची आशा आतां धरणें नलगे मनीं,
रणत्याग हा उक्त दिसे पथ या समयीं स्वामिनी !

वदे तदा ती क्रोधें ' न चुके मृत्यु कधीं या जनीं,
यशःप्राप्ति मग कां न करावी पडून समरांगणीं;
आमरण मला यवनस्पर्श न व्हावा यालागुनी,
या खड्गें हें शिर उतरीं हा देह पडूं दे रणीं. '
या शब्दें सेवक फार चकित जाहला,
गहिंवरें तयाचा कंठभाग दाटला,
नेत्रांत तयाच्या अश्रुपूर लोटला,
हात जोडिले, पदर पसरिला, तयें विनविलें अती,
परी निश्चयापासुनि ढळली नाहीं ती स्थिरमती.

७

अभिवंदन खड्गास शेवटीं ती प्रेमानें करी,
धैर्यें तें स्वकरेंच खुपसुनी घेइ आपल्या उरीं;
वीर्यशालिनी अबलेचा त्या देह पडे संगरीं,
सद्यश ती मिळवी इहलोकीं—स्वर्गसौख्यही वरी;
एकनिष्ठ सेवक तो समरीं तोच मार्ग आदरी,
क्षुधित कोण मिष्टान्न यशाचें सारील वदा दुरी.
विधिबळें पावला सज्जन निधना जरी,
सत्कृत्य तयाचे चिर बसतें भूवरी,
सामान्य जनमता तें अति उन्नत करी,
सज्जन जे निज देशहिताला तनुमनधन अर्पिती,
यशोगायनी त्यांच्या व्हावी विनायकाला रती.

• •

# संयोगिता

: १२

१

ऐका कैसा ओघ भारतीं यवनांचा लोटला,
देश हा परवशता पावला. ध्रु०

कनोजाधिपति-जयचंद्रसुता सौंदर्याची कळी,
चतुरता अंगीं जिच्या बाणली;
जिच्या मुखावर वीरत्वाची प्रभा दिव्य फांकली;
सदा जी विनयानें वांकली;
नामें संयोगिता सती ती उपवरता पावली,
काळजी नृपहृदया लागली;
लालसा धरूनी त्या स्त्रीची अंतरीं,
मागणी घातली तिला बहूत नृपवरीं,
एकही न आला जयचंद्रमना परी,
यास्तव त्यानें स्वयंवराचा घाट तिच्या घातला,
भूपगण सादर आमंत्रिला.

२

गर्वें अव्हेरिलें मागणें जयचंद्रें आपलें,
वृत्त हें पृथ्वीराजा कळे;
अपमानाचें शल्य तयाचें हृदयाला झोंबलें,
पेटलें चित्त क्रोधानलें.
कनोज नगरा गेला नाहीं स्वयंवरा तो बळें;
न हें जयचंद्राला साहलें.

तच्चित्तीं शिरला अनर्थमूलक कली,
सद्विचारशक्ती दूर तयें हांकिली,
अविचारें केली भूपदृष्टि आंधळी,
पृथ्वीराजवेषानें पुतळा नृपें एक सजविला,
मंडपद्वारीं तो स्थापिला.

३

दूर दूरच्या भूपें केली रंगसभा साजिरी,
जियेला जोड नसे भवरीं,
नवरत्नांची सुंदर माला घेवोनी ती करीं,
पातली स्वयंवरा सुंदरी.
दृष्टीं पडतां लोकोत्तर लावण्यवती ती परी
जाहले भूप दंग अंतरीं.
टाकीत चालली मंदमंद पावलें,
ती; तों तों आशा भूपांची मावळे
तत्प्रयत्न सारे निष्फलता पावले,
येऊन तिनें द्वारीं प्रेमें त्या पुतळ्याच्या गळां,
दिव्य तो रत्नहार घातला.

४

यापरि उल्लंघून अडथळे प्रेमाची निर्झरी,
मिळाली शौर्याच्या सागरीं;
सर्व भूप विस्मयें जाहले तटस्थ चित्रापरी,
निराशा म्लानवदन त्या करी;

कोप जाहला मावेनासा जयचंद्राच्या उरीं
तय्राचें मन निष्ठुरता वरी;
कोपाची संगति जन हो! बरवी नसे,
सुज्ञही नरा तो करितो वेडे पिसे,
किति अनर्थ घडती जगतीं याच्या वशें,
या कोपाच्या पायीं कन्या नव्हे प्राण आपला,
नृपानें काराग़ृहिं लोटिला.

५

क्रोधें चवताळतो ज्यापरी जातिवंत जो फणी,
तयाचा कोणी हरितां मणी;
जयचंद्रावर तैसा गेला पृथ्विराज धांवुनी,
पराभव केला त्याचा रणीं.
वधू आपली बंधविमुक्ता करि दिल्लीचा धनी,
स्वनगरा जाय तिला घेउनी.
मन जयचंद्राचें कोपाग्नीनें जळें,
त्याजला काय तों सूड दिसे; त्यामुळें,
जाऊन भूप तो यवनपतीला मिळे,
राणी संयोगिता हरण हें नव्हे–नव्हे–साधिला,
कलीनें डाव असा आपला!

६

भारत जिंकावयास घोरी आला होता परी,
जाहला पराभूत संगरीं;
त्या समयापासून जयाची मनीं लालसा धरी,
बैसला टपून सीमेवरी;

तो अवचित जयचंद्र तयाच्या गेला असतां घरीं,
कां न तो खुशालेल अंतरीं ?
जयचंद्राच्या सहवर्तमान त्यावर,
घेऊन महंमद निज सेनासागर,
यावया निघाला दिल्ली नगरावर,
पृथ्वीराजाही युद्धाला शीघ्र सज्ज जाहला,
रणीं संग्राम घोर माजला !

७

पुरुषवेष परिधान करूनी राणी संयोगिता,
पातली होता जेथें पिता.
' कन्येच्या सौभाग्यमंदिरा अग्नि कसा लावितां ? '
पित्याला वदे धैर्यदेवता;
' धर्म जनक हा जन्मभूमिका मूर्त मातृदेवता,
तयां कां यवन करीं अर्पितां ?
करण्यास्तव निज देशधर्मसंरक्षण
संगरीं करावें जीवितही अर्पण.
नरजन्मसफलता अन्य नसे याहुन,
वृथा धर्म बुडवाया, तैसा मातृभूमिचा गळा-
चिराया, शत्रु घरा आणिला ! '

८

बुद्धिमती कन्यका पित्याला बोध करी यापरी,
तयें तो वळला नाहीं परी;

लढली, पडली वीरस्त्री ती स्वपतीसह संगरीं,
अरीतें लोळवून भूवरी;
दिल्लीचें साम्राज्य लागलें महंमदाच्या करीं,
लालसा झाली त्याची पुरी.
जयचंद्र नृपाचें दुष्ट कृत्य त्या नडे,
तद्राज्य हारिलें यवनपतीनें पुढें,
तो देशद्रोही दुःखसागरीं बुडे,
चरितामृतरू बोधफलांनीं दिसतां ओथंबला
विनायक कूजाया* लागला !

* गावया.

१

कळी उमलली जों न पावली पूर्ण विकासाला,
अदय कराचा तोंच तिजवरी पडला कीं घाला !
सुनील गगनीं चमकूं लागे सुंदर इंदुकला,
तोंच तिचा निर्घृण राहूनें धरिला हाय ! गळा !
भीम नृपाला प्रियतर बाला कृष्णा वेल्हाळा,
नडली पडली बली अकालीं, त्यायोगें, काळा !
स्वार्थसंस्तृतीलोभपरायण जगताची रीती,
उठे सुतेवर पिता हितास्तव, विसरे नयनीती !

२

उपवर झाली भीमकबाळी रूपवती कृष्णा,
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूपवरां तृष्णा;
जयपुरराजा म्हणे गुणवती व्हावी मज भाजा,
जोधपूरचा भूप म्हणे तो भाग असे माझा !
शिंद्यांच्या जोरावर चढला मारवाडवाला,
वांच्छी व्हावी प्राप्त आपणा कृष्णेची माला;
जयपुरची मागणी तयानें धाकें परतविली,
राजस्थानीं वैराग्नीची ज्वाला भडकविली;
कृष्णेसाठीं सज्ज जाहले खड्गाचे हात,
घोर युद्ध माजलें वाहले रक्ताचे पाट !

३

अमीर नामा पठाण घातक, नीच, अविश्वासी
उदेपुराधिप मानासाठीं ये भीमापाशीं;
वदे ‘ हितास्तव खरा स्वदुहिता अर्पण मानातें,
अपकारक होईल जोडिलें अन्याशीं नातें;
अथवा हें खंडूनच टाका मूळ अनर्थाचें,
कां कारण होतां पाडाया बळी सहस्रांचे ? ’
विचार पडला, कसा पोटचा गोळा तोडावा ?
चुकवावे वा काय उपायें शत्रूंच्या घावा ?
चालक मंत्री अजित नृपाचा तोचि मार्ग दावी;
‘ समर्थींच ’ म्हणे ‘ ही अग्नीची ज्योत मालवावी ! ’

४

आप्त जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी,
कोसळून आकाश गमें त्या पडलें काय शिरीं !
‘ धिक्कार असो ! ’ वदे जीविता तुमच्या धिक्कार,
व्यर्थ जन्म घेऊन जाहलां धरणीला भार !
छत्र शिरीं मिरवितां, म्हणवितां स्वतां लोकपाळ !
एक पोर पोटची तिचाहि न करवे सांभाळ !
ह्याच काय पुरुषार्थ ! कुलाचा ह्याच काय मान ?
पुरुष सजावा कीं अबलेची कापाया मान !
रजपूतांचे छावे आम्ही अबलांचे साथी,
वागवितों तलवार कटीला नित्य तयांसाठीं !
वदा कोण त्या मृणालिनीच्या जीवावर उठला,
तद्रक्ताचा तिच्या कपाळीं लाविन खास टिळा !

पडेल जेथें मृगनयनेचा अश्रुबिंदु एक,
अरिरुधिरानें त्या स्थानावर लिहूं सूड-लेख !
नको बुद्धि ती, नका अमंगल वच ते उच्चारूं,
धीर न सोडा; धर्म आपला रणीं मरूं-मारूं ! '

५

बोध खलास न रुचे, अहिमुखीं दुग्ध होय गरल,
श्वानपुच्छ नलिकेंत घातलें होईना सरल !
दौलत थिजला; परि न खलांचा दुष्ट यत्न विझला,
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला !
करूनिया निर्धार मनाचा, धरून तलवार;
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार !
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी,
जणों करी स्वकरें तरुणांचीं हृदयें बद्ध गुणीं !
हिमधवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती,
धवल फुलें ती धवल करानें धवल गुणीं गांठीं !
कृष्ण हृदय धवलतेजवळ तें झालें धवल पळीं,
नवल न धवलच बिंब शशीचें विलसे नील जलीं !
तिच्या दिव्य तेजानें दिपला भाला, कंप करीं,
उगारलेलें शस्त्र तयाचें गळलें भूमीवरी !
टिकले पुण्यप्रभावापुढें नाही पळ दुरित,
भग्नमनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत !

६

गळून पडलें शस्त्र पुढें तें—निशाण मरणाचें,
धरून जें स्वकरीं भूमिवरी स्वैर मरण नाचे !

परि नाहीं ती धैर्यदेवता तिळभर डगमगली,
मधु स्मिताची खळी कपोलीं उलट तिच्या पडली !
परि मातेनें तिच्या मांडिला एकच आकान्त,
मातृहृदय तें ! करील कैसा सहन सुताघात !
पिटी उरःस्थल, कुंतल तोडी, कर माथां हाणी,
धाय मोकलुनि रडे, धरेला अश्रूंनीं न्हाणी.

७

पाषाणालाही शोकानें त्या पाझर फुटता,
परि न तयानें वळले खळ ते, त्यजी न विष कटुता !
शस्त्र न चाले म्हणुनि विषानें भरलेली वाटी,
आणून दिली जनकाज्ञेनें कृष्णेच्या हातीं.
स्मित वदनानें करीं विषाचा धरून तो प्याला,
पदरें नयन पुशी मातेचे, वदे वीरबालाः—
'कां करिसी हा शोक ? आणिसी कां नयनीं पाणी ?
कवण वांचला सांग, भूवरी आजवरी प्राणी !
मृत्यु सखा सोयरा जिवाचा असे सदा साथी,
मृत्युबलानें तुटे भवाची दुःखाची गांठी !
वाट जिवाला चिर सौख्याची मृत्यु मात्र दावी,
वद मग आली मरणाची का संधि घालवावी ?
जन्म जयानें दिला तोच या जीवाचा स्वामी,
भाग्यवंत ती पडे संकटीं जनकाच्या कामीं !
धिग् जीवित ! ज्याकरितां पडती बळी असंख्यांचे,
मरण यशाचें जर त्यायोगें देश-धर्म वांचे !'

८

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोट,
मोहमूढ मातेस नावरे अश्रूंचा लोट!
एक दोनदां घोट विषाचा नाहीं तिज पचला,
दुष्टांनीं यास्तव नाशाचा बेत नवा रचिला!
हाय! कुसुंबा प्याया धरिला पुढें तिच्या ओठीं,
मालविली या परी खलांनीं ती रत्नज्योती!
केला, अनुमोदिला जयांनीं कृष्णेचा अंत,
त्या शासाया चुकला नाहीं न्यायी भगवंत!
जसें करावें, तसें भरावें; बीज तसे दाणे!
'विनायका' ला करी बोध हा कृष्णेचें गाणें.

• •

पति समर–पराङ्मुख झाला, येतसे घरा माघारा,
ही वार्ता वीरमतीच्या, दूतमुखें पडतां कानीं,
लाल होय रागें जैसी, नागीण चिडावी मानी.
समरास पुरुष जो भ्याला
मळविलें तयें स्वयशाला
न पहावें तद्वदनाला
करविले बंद दरवाजे, या परी करोनि विचारा. १

‘ जन्मलें राजवंशीं मी, विख्यात उदेपूराचे
वंश जो क्षात्र तेजाची, जागती ज्योत जगतांत
वीर किती त्यांत उदेले, गोष्ट ही जगाला ज्ञात
कुल–कीर्ति–रक्षणासाठीं
घेऊन स्वशिरें हातीं
रणयज्ञीं प्राण वहाती
थोडकीच जी वानावी थोरवी तयांची वाचें. २

गोष्ट असो कीं पुरुषांची, सहज अशीं कृत्यें त्यांना
त्यासाठींच तयां केलें, दृढदेही धीर मनाचे
परि तनु ज्यांची सुमनांची, सदय हृदय नवनीताचें,
सुकुमार अशा अबलांनीं
लढुनि रणा वीरावाणी
राखिली कुलाची वाणी
चढविलें स्फुरण पुरुषांना, देऊन आपुल्या माना. ३

वीर पित्यापासुनि लाभे, जन्म अशा वंशीं मातें
अंकावर वीरांचेच्या खेळलें वाढलें धामीं
बाळकडू वीरश्रीचें पाजिलें जिनें मज नामी
टाकूनी अन्य वराला
घातिली आपणा माला
मज गमे पण पुरा झाला–
वीरपती मिळवायाचा—धरिलें चिर हृदयीं ज्यातें. ४

परि फसलें, हाय बुडालें; जाहली जिण्याची माती
वीरपती म्हणुन जयाच्या अंकीं मी निद्रा घ्यावी
वीर नव्हे, पुरुष नव्हे तो, समरांत भीरुता दावी
अबलाच म्हणावें त्याला
मिरवितो मिशांस कशाला
कंकणांस मात्र न ल्याला
जन्मास कासया आला ? ओस काय दुनिया होती ? ५

काय जिणें निजकृत्यांना तुकवीना जग जर मान
वांचला तोच समजावा जगतांत जयाला मान
अपमान जयाचा झाला–गेलाच तयाचा प्राण
त्यागूनि तुम्ही रणमान
वीरांचा मूर्त प्राण
झालांत प्रेतसमान
दूर असो, नलगे येथें ती जळो स्मशानीं घाण. ६

ओवाळूं विजयी नाथा द्वारीं मंगल दीपांनीं
कंठांत तयाच्या घालूं सुमनांची माला मानें
सुप्रसन्न वदनीं देऊं गोविंदविडा प्रेमानें

यापरी मनोरथ केले
अघ पुढें उभें परि ठेलें
त्याहून कां न मी मेलें
पतिरणत्याग दुर्वार्ता जगलें ऐकाया कानीं. ७

समजतें मृत तुम्हांला मी आलें वैधव्य कपाळा
सहगमनपुण्य जोडाया आहें मी सिद्ध जहालें
परि नको नको शव मातें तुमचें जें बोलें चालें
तुमच्या या समरत्यागें
जें वीरकुलव्रत भंगे
होमीन तनु तयासंगें.'
संदेश यापरी धाडी–वीरमती जसवंताला. ८

सहगमन तिचें नवलाचें वेषही तिचा नवलपरी
मस्तकीं वेष पुरुषाचा अंगीं दृढ कवचा ल्याली
चपला नटली वीरश्री जावया रणास निघाली
असुरांते निर्दाळाया
निजभक्तजना सुखवाया
आदिशक्ति अंबामाया
त्यासमयीं भूवर जाणों अवतरून आली दुसरी. ९

घेतलें तिनें जें होतें अल्प सैन्य जोधपुरांत
हटविलें यवन सेनेनें स्वपतीस रणीं जेथून
त्यावर ती आवेशानें पडली तेथेंच तुटून
दीपकीं पडून पतंग
भाजून जसें घे अंग
तिजवरला तोच प्रसंग
टळला; तिज साह्य मिळालें; शत्रूवर केली मात. १०

वीरमतीच्या संदेशें होते मृत जन जीवंत
काय नवल मग जसवन्ता जीवंता चढलें स्फुरण
येऊन अरीवर पडला लेखून तुच्छ तो मरण
केली त्याची धुळधाणी
वृकवोदित हरिणीवाणी
सोडविली मानी राणी
समजूत करून घराला आणिलें तिला यशवंत. ११

● ●

# ध्यास तों भास                                                                 : १५

### १

स्तंभासमीप होता तो त्या समयास एकटा बसला,
नव्हती वृत्ति ठिकाणीं; चिंतेच्या सागरीं दिसे फसला. १

तेज मुखावर नव्हतें, गळली होती उरस्थळीं मान,
हृदय उडे, आंत कढे, चिरडे जैसें पडून पाषाण. २

तंतूच्या वाद्यावर इष्ट सुरास्तव फिरे जसा हात,
भालीं कर तो फिरवी वरचेवर, मग्न निज विचारांत. ३

तेथें एक तयाच्या पडला निःश्वास तेधवां कानीं,
न कळे त्यास उमटला, कैसा, कोठून, कीं तया स्थानीं. ४

हा काय भास झाला, कीं कांहीं खेळ कल्पनाच करी ?
सांदींतून असावी आली कीं काय वायुची लहरी ? ५

शिर वर करून फिरवी दृष्टि तलावाकडे परंतु जल,
स्थिरचि दिसे पडलेला तेजाचा आरसा जसा अचल. ६

तृण वाढलें चळेना—तरूचें हालें न एकही पातें,
दुर्गध्वज न फडफडे—आली कीं झोंप त्याजला वाटे. ७

सर्वत्र दिसे स्थिरता—ऐकूं येई न वायुचें नांव,
निःश्वास मग कशाचा ? कैसा त्याचा कळून ये ठाव ? ८

वर खालीं दृष्टि करी–इकडे तिकडे पुनः पुन्हा पाहे,
चाळा तोच तयाला लागे, त्यांतच तयास सुख लाहे. ९

परि एकदां सहज तो पाहे डावीकडे वळून जसा,
तरुणी रमणी बसली दिसली तो चकित होय त्यासरसा. १०

घेऊन शस्त्र हातीं शत्रु उभा तेथ ठाकला असता,
तत्रापि या परी तो पुरुष भयाभीत जाहला नसता. ११

हें काय चिन्ह ? न कळे स्त्री ही कैशी कुठून अवतरली ?
भरली सौंदर्यानें मूर्तिमती तरुणता पुढें सरली. १२

धन्या रसिकंमन्या हे मंगलदायिनी अमरकन्या ?
अन्यायवर्तिनी कीं स्मशानवासी ? पिशाचिका वन्या ? १३

उकलेना गूढ तया, न फिटे पडली मनास जी भ्रांती,
पाहे, पुन्हां न्यहाळी तें मुख तें रूप, दिव्य ती कांती. १४

ती मोहना तयाची सखी, तिची खूण त्याजला पटली,
प्रीति करी त्याजवरी; आतां परि सर्वथा तया विटली. १५

परिणय त्यांचा झाला असतां तीं नांदलीं सुखें असतीं,
परि यवनधर्म धरिला तयें, तया बुद्धि जाहली असती. १६

## २

होता गुलाब गालीं–ओष्ठावरतीं तशी तिच्या लाली,
चिंतेचा ढग भालीं धरि त्यावर सांवली परी काळी. १७

नेत्रांत तेज होतें, परि निश्चल त्या सरोवरावाणी,
चंचलता मावळली, शून्यपणा काळजी तया आणी. १८

साधेंसुधेंच पातळ, हिरवी अंगांत कंचुकी ल्याली,
कृष्ण कुरळ केश तिचे ते अस्ताव्यस्त विखुरले भाळीं. १९

बोलावयास्तव तिनें कर वर केला तयांतुनी पार,
दिसता चंद्र तुम्हांला—असा तिचा काय दिव्यतासार. २०

३

'भक्ति जयावर करितें आलें मी त्याकडे स्थलीं वन्य,
हेतु मला सुख व्हावें – वाटावें त्याजला जगीं धन्य. २१

उल्लंघिले तटाला—आलें वंचून रक्षका दक्ष,
तुज भेटले सुरक्षित येत करायास सोक्ष कीं मोक्ष. २२

वदती कुमारिकेच्या पवित्रतेचें अपूर्व तेज जनीं,
विजनीं उग्र मृगेंद्रहि तिज दिपती—लागती तिच्या भजनीं. २३

जो श्वापदांत रानीं राखी ईश्वर तिची अशी लाज,
त्यानेंच मज सुरक्षित यवनचमूंतून आणिलें आज. २४

हेतु धरून मनीं मी आलें चालून आपल्या पायीं,
होता तो विफल मला जाण, दिशा शून्य जाहल्या दाही. २५

तूं मुकलास मला; मी अंतरलें तुज अखंड अंतरलें,
ही शेवट भेट समज; येथेंच प्रेम आपलें स्थिरलें. २६

पूज्य स्वधर्म त्याचा नित्य वहावा मनांत अभिमान,
मान तयांतच; धर्मा, न चळावें कापितां कुणी मान. २७

श्रेयस्कर मनुजातें आलें निज धर्मरक्षणीं मरण,
सिंहासनास्तव नको परि, करणें धर्मबाह्य आचरण. २८

निज धर्म त्यजिला त्वां, यवनाचा निंद्य धर्म तुज रुचला,
टाकून अमृतवल्ली आवडिनें घेतला करीं कुचला. २९

कर जोडितें; पसरितें पदर; तुझे चरण मस्तकीं धरितें,
आज्ञापिशील तें तें करितें; परतें; न दुर्जनांत रतें. ३०

हा धर्म नको तुजला, यवनांचाही नको नको छंद,
नलगे कुराण; बरवें पुराण; भज रामकृष्ण गोविंद. ३१

होईन तुझी दासी-त्वत्पदकमलीं विलीन राहीन,
व्हाया सुख उभयाला आड असे यवनधर्म हा हीन. ३२

होऊं उद्यांच आपण एकत्र विवाहबंधनें पुण्य,
राहूं आजन्म सुखीं; घेऊं म्हणवून या जगीं धन्य.’ ३३

४

‘होणार विवाह कुठें ? जिथें चितेवर कलेवरें जळतीं,
मळती धुळींत कोणी – कीं जीवितसंशयांत तळमळती. ३४

कारण हिंदुत्वावर पडणार उद्यांच आमची टोळी,
नलगे विलंब तुमचीं देवघरें व्हावयास वाटोळीं. ३५

बाळ असो, तरुण असो, स्त्री किंवा पुरुष जख्ख म्हातारा,
त्याजवरी असिधारा धरूं, करूं देश शून्य हा सारा. ३६

तूं प्राणप्रिय मजला, तुझे सखे सोयरे कृपापात्र,
समरांतून उद्यांच्या सत्तेनें वांचणार ते मात्र. ३७

तुमच्यांत जन्मलों मी–मजमध्यें हाडमांस तुमचेंच,
तुम्हांस न त्यजावें, परि मज तुमचीच लागली ठेंच. ३८

तुमचा–नव्हेचि–माझा होता जो पूज्य धर्म आजवरी,
त्याजवरी मी उठलों—काय करूं ? हाय ! हृदय लाज वरी. ३९

परि एक देव जाणे याचा माझ्याकडे नसे बोल,
फोल प्रयत्न केले; कळलें माझें न बांधवा मोल. ४०

देशहितास्तव झटलों; धर्माचें वाहिलें शिरीं काज,
माजविला दंभ न मीं, केला न जनांत शुष्क आवाज. ४१

कर्तव्य मनःपूर्वक केलें तें बांधवां न आवडलें,
नडले येऊन मला, ते मम मार्गांत आडवे पडले. ४२

ते नीच मत्सरी ते दुर्व्यसनासक्त दुर्गती कपटी,
नांव नको, गांव नको त्यांचें; त्यांना असो दुरून नती. ४३

विटलों–विटलों त्यांना; झालों मी त्यांजपासुनी दूर,
होईन शांत जेव्हां त्यांचा पाहीन जाहला चूर. ४४

व्हावा जर मी तुजला, माझा सहवास वाटतां गोड,
जोड मला, सोड तयां–हितकर ही सुचविली तुला तोड. ४५

आता मी, भगिनी मी, देव, पिता, माउली तुझी मीच,
माझ्यांत सर्व नातें–मी असतां तुज कशास हे नीच?' ४६

५

स्कंधीं शिर आधारी, त्याच्या ती मृदुल कर गळां घाली,
भ्याली भीरु उसासे, स्फुंदे, अत्युष्ण आसवें ढाळी. ४७

वाहे मंद समीरण; अमृताची वृष्टि तो शशांक करी,
एकान्ति अशा समयीं रमणीची कोण लालसा न धरी? ४८

त्यांतुनि ही अनपेक्षित, सहज अनाहूत भेटली जर ती,
नाहीं येणार कशी पुरुषाच्या हृदयसागरा भरती? ४९

परि सुप्रसंग ऐसा त्या वीरा हेतु जाहला असुखा,
भुजवलय नव्हे, पडला, गमलें नागीणिचा गळां विळखा. ५०

झालें प्रशांत मस्तक, होतें जें सागरापरी क्षुब्ध,
हृदय उडेना; त्याचे सारे व्यापार तेधवां स्तब्ध. ५१

पाहे त्या स्त्रीचें मुख तों पालट केवढा दिसे त्यांत!
ती मोहना प्रियतमा आहे किं नसे अशी पडे भ्रांत! ५२

रूप तिचें तेंच असे; फिकटपणा ये परंतु त्याजवरी,
जीवांश त्यांत न दिसे–प्रकाश जो सकल अवयवां वितरी. ५३

वदन निमीलित झालें–कीं बैसे मृत्युची तयास खिळी,
बोले बोल जरी ती, श्वास उमटतां दिसे तिचा न मुळीं. ५४

हृदय न उडे–पडे तें गार–न नाडींत राहिला त्राण,
नेत्रीं तेज लकाके, परि न दिसे त्यांत जीव कीं प्राण. ५५

चित्रें स्वकल्पनेनें वातावरणीं करून निर्माण,
होती छांदिष्ट कवी त्यांच्या अवलोकनांत रममाण. ५६

नटतीं नवीं नवीं तीं विराटरूपें क्षणोक्षणीं नाना,
तीं कल्पनाविनिर्मित जाणुनिही भय न वाटतें कोणा ? ५७

तैसेंच लाडकीचें स्वरूप एका क्षणांत पालटलें,
अवलोकून भयें त्या तरुणाचें हृदय तेधवां घटलें. ५८

६

'छे, छे नको नको हा अविचार करूं; विवेक कर कांहीं ?'
ती स्त्री वदली ' मम-सत्प्रेमाची क्षिति तुला नसो–नाहीं. ५९

चाड धरी पितरांची स्वकुलाची, पूज्य मातृदेशाची,
धर्माची–ईशाची-अनुकंपा नित्य पाहिजे ज्याची. ६०

मी स्त्री अनाथ, अबला, वृक्षाचा कोणत्या तुला पाला ?
एकाकीच तुझ्यास्तव राहीन करीत चिर विलापाला. ६१

जन्म दिला, वाढविलें, तुजसाठीं नित्य वाहिले कष्ट,
त्या मातापितरांना स्वकरें का पाहसी करूं नष्ट ? ६२

तव वीरकुल, जयाच्या शौर्याची गाजते जगीं ख्याती,
त्यांची स्वनिंद्य कृतिनें करणार जगांत काय तूं माती ? ६३

देश तुझा ज्यासाठीं वीरांनीं वाहिल्या किती माना !
तूं एक मात्र, त्याच्या, जन्मा आलास, हेतु अपमाना ! ६४

तव धर्म लघु मुखानें म्यां त्याची काय थोरवी गावी ?
तो टाकून हिरा त्वां अंधपणें गार काय ही घ्यावी ? ६५

परमेशप्राप्तीची तीच खरी सुलभ एकटी वाट,
असतिल–असोत दुसरे पंथ नसे तथ्य यापरी त्यांत. ६६

हा निंद्य मार्ग तुजला ईशापासून नेतसे दूर,
पडशिल, रडशील तुझ्या जेव्हां फाकेल दृष्टिचा धूर. ६७

होईल ईश्वराचा कोप तुझ्यावर धरून परशील
तरशील कसा तेव्हां ? कवणाचे चरण सांग धरशील ? ६८

स्वजन त्यजून धरिले हृदयीं म्हणवून यवन जे आप्त,
ते धांवतील तुज, का गमतें, पाहून संकटव्याप्त ? ६९

बुडवून तुझ्या धर्मा, तव देशाची करून रांगोळी
आले हे येथ सुखे पिकवाया नित्य आपली पोळी. ७०

तूं आयताच त्यांना नवसाला पावलास कीं देव
तद्धेतु परी पुरतां होशिल पाषाण समजुनी ठेव. ७१

तुज तुच्छतील मग ते करितील पदोपदीं तिरस्कार
तेव्हां नको नको हें होईल जिणें तुला तुझें भार. ७२

स्वजन त्यजून धरिली परकीयांची जयें स्वयें कांस
ते परकीय तयाचा धरिती न; धरूं नयेचि विश्वास. ७३

स्वजना अंतरलासच, परही होतील पारखे तुजला,
भाग तुला मला फिरणें भूवर ढाळीत नित्य अश्रुजला. ७४

कां संकटांत पडसी ? करिशी दुःखास कासयास गडी ?
कां घालितोस कळतां, कळतां प्रक्षुब्ध सागरांत उडी ? ७५

हा चंद्रमा विलसतो निजतेजें व्योममंडळीं नील,
हा कृष्ण घन जवळचा त्याला एका क्षणांत झाकील. ७६

जें अभ्र आड आलें यथावकाशें पडेल तें पार
चंद्रप्रभा पुन्हां या टाकील करून भूतलां गार. ७७

त्या अवधींत तुझें जर मोहापासून या न मन ढळलें
वळलें सुविचारांस न, अक्षय तव समज, [illegible] यश मळलें. ७८

पितरांचें, आप्तांचे, इष्टांचे भोंवतील शाप तुला
ईश्वर कोपून तुझ्या पडतील शिरीं अखंड तप्त शिला. ७९

जागा हो, जागा हो, नको नको हा करूं दुराचार
नाहीं तर दासीचा शेवटचा तुज असो नमस्कार. ८०

८

म्हणती म्हणोत कोणीं, विकार गुरुरूप होय अभिमान,
विस्मरती ते झाली त्याजमुळें जी जगांत धुळधाण. ८१

उदधीनें भूकंपें विद्युत्पातें अनर्थ जे घडले,
अभिमानवश नराच्या कृतीपुढें सर्व ते फिके पडले. ८२

अभिमानें वाहविले रक्ताचे या जगांत पाट किती !
गळले अश्रु तयांची करवेल सरस्वतीसही न मिती. ८३

किति संसार बुडाले, किति पडलीं नांदतीं घरें ओस;
किति मंदिरें मिळालीं धूळीला माजला असंतोष. ८४

विसरे स्वापत्य पिता भाऊ भावावरी उठे रुष्ट,
स्नेह लयाला गेला; उदयाला कलह पावला नष्ट. ८५

चुकलें, कळें, उमजतें चुकणें कवणास या जगीं चुकलें,
' चुकलों ' परीं न म्हणती अहंपणानें सुखास ते मुकले. ८६

होती पुराणकालीं जन म्हणती, स्वर्गभूमि अविभक्त,
भजती परस्परांला भावें देवास ज्यापरी भक्त. ८७

' उभयांत कोण मोठा ' उद्भवला सहज वाद त्यांमाजीं
भूमि म्हणे मी मोठी; स्वर्ग वदे थोरवी असे माझी. ८८

कोणीच हार ने घे, उभयांची दृष्टि मीपणें अंध,
होय कलह वादाचा, कलहानें प्रीतिचा तुटे बंध. ८९

जीं एकरूप होतीं, रोषें जाऊन दूर तीं बसलीं.
फसलीं अहंपणानें; संतोषें परि न आजवर हंसलीं. ९०

स्वर्ग समर्थ बली, तें स्वगुणें वरवरच चाललें आहे,
अबला भू खचत असें परि ताठा केवढा मनीं वाहे ! ९१

जे मातापितरांचें प्राप्त अपत्यांस तेच गुणवान,
वृक्ष तसे पुष्प मिळे; कंठ जसा त्यापरी निघे तान. ९२

माता भू अभिमानी, पुत्र तिचा पुरुष तोहि अभिमानी,
भू स्वर्गा अंतरली; पुरुषाचीही तशीच हो हानी. ९३

बोध प्रियकरिणीचा त्या वीराच्या मनास मानवला,
तूं स्त्री मी पुरुष अशा अहंपणें तो परी न त्या लवला. ९४

'जें झालें तें झालें; आतां हा बोध होय वायफळ,
वदनांतून निघाला कवण करी ग्रहण तो पुन्हां कवळ. ९५

धर्म नको मज तुमचा, देश नको, लोकही नकोत मला,
वाटेल तर रहा वा जा तूं तव पथ नसेचि आडविला.' ९६

सहज वदून असें तो स्मितवदनें प्रियतमेकडेस बघे,
तों ती गुप्त जहाली; न कळे भूमींत वा नभांत रिघे. ९७

चोळी नयन पुन्हां तो पाहे विस्मितपणें सभोंवार,
परि ती कोठेंचि नसे, न दिसे त्या केवढा चमत्कार ! ९८

आसन नसे तयाचें चळलें, नव्हती परिस्थिती फिरली,
होते शांत पहुडले चंद्रकिरण पूर्ववत् तडागजलीं. ९९

नव्हता दुर्ग सरकला स्तंभ जसाच्या तसाच तेथ उभा,
ध्वज आपल्या पटानें होता सप्रेम पालवीत नभा. १००

आश्चर्य थोर, झाली गुप्त कशी तीच एकली रमणी,
ऐसा करीत बसला खिन्नपणें तरुण तो विचार मनीं. १०१

आलें कळून त्याला हा सारा खेळ कल्पना नटली,
ज्याचा ध्यास मना तो भास सदा होय गोष्ट ही पटली. १०२

● ●

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८६० वि: काव्य
क्रमांक १६१५ नों दि: २५।८।६६

# गणिकोद्धार

## १

रुधिरें सिंचित पटासारखें दिसे पश्चिमाऽऽकाश,
सूर्यास्तानें दिसूं लागलें भुवन उदास! उदास! १

पतिनिधनास्तव अशौचदर्शक कृष्णपट दिशा ल्याली,
पति प्रकाश स्त्रीचा त्याविण काळेंच तिच्या भालीं. २

चिता धडकल्या ज्वाळा उठती भरे दशदिशा धूर,
कवट्या फुटती, अग्नीमाजीं होय अस्थिचा चूर. ३

घटिका ती राक्षसी, मृत्युचा, स्मशान तें, दरबार,
स्थल देण्याचें इहलोकींचा मानवास कारभार. ४

ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. १८०५७

उठे दीर्घ रोदन स्मशानीं त्या समयास भयाण,
निराश्रिता कवितेची जैसी उदासवाणी तान. ५

प्रत्येक स्वन त्यांत मधुर, परि आर्त, करुणतापूर्ण,
करील ज्याचें श्रवण निश्चयें पाषाणास विदीर्ण. ६

## २

मथुरापुरची वारयोषिता वासवदत्ता नामें,
सौंदर्यास्तव तारुण्यास्तव जिला भजावें कामें. ७

पुराभरण सुखवैभवशाली गणिकांची जी राणी,
सेवेस जिच्या सिद्ध संपदा जोडून सदा पाणी. ८

सहज तयावर दृष्टि जियेची पडे, धन्य तो मानी,
तिच्या मधुर भाषणीं, न ते सुख तरुणांस सुधापानीं. ९

जन्में गणिका, परि चंद्रिका आचरणें अकलंक;
पर-पुरुषस्पर्शें न जियेचा विटाळला पर्यंक. १०

एकासच मानून देवता करी त्यावरी प्रेम,
तोच जिवाचा सखा तियेचा; ती सीता, तो राम. ११

## ३

मदनमंजिरी, भुवनसुंदरी तीच त्या स्थलीं वन्य,
धुळींत लोळत पडली होती हाय ! छिन्नविछिन्न. १२

मृदुशय्येवर जी पहुडावी ओढुनि तलम दुशाला,
तीच धरेवर पडली उघडी भुज घेऊन उशाला ! १३

अधरस्पर्शें कपोल व्हावे रक्त, असे सुकुमार,
खावा लागे आज त्याजला धूलिकणांचा मार ! १४

सेवेस जिच्या तत्पर होत्या सदनीं अगणित दासी,
ऐकलीच ती त्या समयाला अभागिनी वनवासी ! १५

## ४

इहलोकींचें नश्वर वैभव-हा क्षणभंगुर खेळ,
जल बुद्बुद–भोंपळा भ्रमाचा फुटे न लगतां वेळ. १६

समृद्धिसागर आज असे जो दीनांचा कैवारी,
तोच उद्यां होऊन भिकारी, फिरतो दारोदारीं. १७

प्रकाश झळके आज, उद्यां त्या गृहीं भरे अंधार,
हास्य विनोदस्थळीं क्षणांतच उसळे हाहाकार. १८

घालून मिठी गळां प्रियाच्या निजे जी सुखासीन,
उजाडेल दिन येतां दुःखीं तिज गमलें स्वप्नीं न. १९

नाथ स्तनमंडलीं तिच्या शिर ठेवुनि निद्रामग्न,
असतां, कोणी खड्गें केलें हृदय तयाचें भग्न. २०

विव्हळला, फोडिली तयानें एक दीर्घ किंकाळी,
खडबडून त्यासरशीं शयनीं गणिका जागी झाली. २१

गळां घातला हार फुलांचा व्हावा जैसा व्याळ,
चांदण्यांत मस्तकीं पडावा कीं आगीचा लोळ. २२

तशी तिची जाहली अवस्था, न सुचे तिजला हाय !
कोसळलें आकाश तिच्यावर, रडे मोकलुनि धाय. २३

कुंतल तोडी, कपाळ फोडी, करी थोर आकांत,
कांत विरह तो नव्हे, गमे तिज, सर्वस्वाचा घात. २४

अंकीं घेई नाथाचें शिर, अश्रुजलें त्या न्हाणी,
फुटणें नाहीं जीव मृताला किती घालितां पाणी. २५

शव न द्रवलें नवल न, विरले नाहींत जयें जीव,
लटके म्हणती स्फुंदन रोदन, कवणा न तिची कींव. २६

धनलोभास्तव, म्हणती, केला हिनें प्रियाचा घात,
जिरवूं पाही दुष्ट कृत्य तें करून ही आकांत. २७

न्यायदृष्टिनें दोपी ठरली, अपराध तसा दंड,
पडे स्मशानीं होऊन स्तनयुगलनासिकाखंड. २८

आप्त, इष्टजन, दास, दासिगण धनानुगामी सारे,
मोहर झडतां आम्रतरूवर कवण पांखरूं थारे. २९

बहुत परिजनावरी चालवी जी अप्रतिहत सत्ता,
एकलीच बापडी स्मशानीं पडली वासवदत्ता. ३०

५

भू शय्या, भुज उशी, ओढणी वातावरण उदास,
स्फुंदन कालक्रमण, चितांचा प्रेतांचा सहवास. ३१

स्वभावतां मन असतें स्त्रीचें पुष्पासम सुकुमार,
त्यांत जाहला असा त्यावरी दुःखाचा भडिमार. ३२

अधिकच तें अलवार जाहलें, नवस करी मरणास,
परी थरर कांपवी तयाला सहज निघाला श्वास. ३३

जंबूक हुकी करिती प्रेतें स्वच्छंदें उकरीत,
घूत्कारें दशदिशा घुमविती विक्राळ दिवाभीत. ३४

पाचोळा तरुतळीं सळसळे गमनानें उरगांचे,
झंझावातें अग्नि चितांचा करी गर्जना, नाचे. ३५

नाद भयंकर असे स्मशानीं कांपवितील भयाला !
कां न त्यामुळें सुकून जावी दुःखी अबला बाला ? ३६

वाटे प्रेतें गर्जत आलीं करावयाला ग्रास,
कोरड पडली, धडकी भरली, गुंतत चाले श्वास. ३७

६

चिंतावें त्यापरी कल्पना पुढें आणिते चित्र,
साच पातलें जवळ, वाटलें तिजला, भूत विचित्र. ३८

जीव नकोसा झाला, तरि तो त्यागवे न कोणाही,
विटली जीवा मरणभयानें रडली धायीधायी. ३९

पिशाच दृष्टी–आड कराया घट्ट मिटी नयनांतें,
तळहातें झांकिलें; चिन्ह तरि अदृश्य होई ना तें. ४०

" हाय संकटीं पडलें बुडतें मरतें देवा ! तारी,
कोण तुझ्याविण जगीं दयाळा ! दीनांचा कैवारी ? ४१

निरपराध मी ठावें तुजला कण्हतें मरणद्वारीं,
घात पातकी करून उलटा विहरे सौख्यागारीं ! ४२

न्यायमूर्ति तूं स्वतां म्हणविसी सत्याचा अभिमानी,
तव राज्यीं खल हंसती; न खळे सज्जननयनीं पाणी. ४३

कशी अशानें चालेल जगीं तुवां लाविली रीत ?
सत्याची गत व्हावी कैशी ? कशी टिकावी नीत ? ४४

निरपराध मी मरतें—मेलें—किती पुढें मरतील ?
कसा भरंवसा मग अस्तित्वीं तुझ्या लोक धरितील ? ” ४५

निखंदून यापरी प्रभूला, बघे नेत्र उघडून—
चिन्ह जसेंच्या तसें दिसे तें बसलें जणूं अडून ! ४६

७

भूत म्हणावें तरी करीना माझा हें कां अंत ?
अंत कोठवर बघे असेलच अवतरला भगवंत ? ४७

“ आला समजूं पिशाच आपण घडी भराया माझी ?
दीनेस्तव्र कीं प्रकट जाहलां करुणाघन देवाजी ?—” ४८

“ मजकरवीं भूतपदापुरता घडला न दुराचार,
लालसा, परी देवपणाचा पतितास न अधिकार. ४९

सामान्य कुलीं जन्म पावलों मी मानव उपगुप्त,
संसाराच्या घोर वादळीं नसतों परी सुगुप्त. ५०

बुद्धगुरूच्या कृपाप्रसादें झालों गणिके, जागा,
जगावेगळी, कळलें जीवां असें मिळविणें जागा. ५१

उदर पुढें हें परी लागलें आहे सकलापाठीं,
जुलमी राजा असह्य, त्याहुनि उदररीति उरफाटी ! ५२

अनयशील नृप करें आकळी मात्र जन व्यवहारीं,
विरक्त योग्यांवरही सत्ता उदर करी कांतारीं ! ५३

मी पामर मग उघडच आहे पात्र उदरकरभारा,
माजवून ठेविला नसे परि मीं त्याचा देव्हारा. ५४

यास्तव मजला कधीं करावा लागे ना अपहार,
कामाचा तो काय, मिळविला कपटानें जो हार. ५५

वणिग्वृत्तिनें उपजीवन मम, परि न आचरण खोटें,
दीनांस पदीं तुडवून नको मजला होणें मोटें. ५६

मिळेल त्यावर तुष्ट राहतों विलीन भगवन्नामीं,
पडेल अंतीं तेंच, न ऐहिक धनदौलत, मज कामीं. ५७

स्मरत असेल, तुवां दर्शविली मम भेटीची आस,
क्षमा करावी, केलें तुज मीं त्या समयास निराश. ५८

श्वानासम तुजपुढें नाचले जन विभवी असतील,
मी न त्यांतला; गणिके ! संकटसेवा हे मम शील. ५९

आलों आतां; सेवेस तुझ्या सादर केला काय,
संकोच त्यज; सांग करावी तुझी चाकरी काय." ६०

८

"गोड बोल हे त्या समयीं मी धरिलें असते माथीं,
मरणानंतर अधरीं धरिली व्यर्थ सुधेची वाटी. ६१

खिडकींत उभीं असतां पाहत निज रमणाची वाट,
मदनमनोरम मूर्ति आपली आली दृष्टिपंथांत. ६२

मंद मंद टाकीत पाउलें होतां मार्गी जात,
रोंवीत जणूं ध्वज मदनाचे तरुणींच्या हृदयांत. ६३

जलौघ वाहे सभोंवतींची काय वनश्री त्यास ?
तशी दृष्टि आपली न पाहे तरुणीभृकुटिविलास. ६४

अक्ष अचल राहूनि फिरवितो चक्रास सभोंवार,
स्वतां न ढळतां तसें झुरविलें मीं वहुतां साचार. ६५

दृष्टीं पडतां रूप आपलें हरला तो अभिमान,
शरण रिघाले हृदय; आपणापुढें वांकली मान. ६६

वरून मीं फेंकिलें कराया खूण पुष्प आरक्त,
पुष्प नव्हे तें प्रणयलेख तो वा हृदयच अनुरक्त. ६७

नकळत गमतें, पडे आपला पुष्पावर त्या पाय,
हाय ! केवढा तेणें बसला मम हृदयावर घाय. ६८

हृदय तळमळे तरी न माझी दृष्टि आपणां सोडी,
गेलां, झालां आड, तिला तरि त्याच दिशेची गोडी. ६९

अशनीं, शयनीं मज दिनरजनीं आपला निदिध्यास,
अखंड चिंतन, घडेल कैसा मला सुखद सहवास. ७०

लज्जा हरली, भीति निमाली, झालें अगदी धीट,
मदन काय करविणार नाहीं स्त्रीकरवीं विपरीत ? ७१

पुष्पहार घालून पाहिलें आपणांस बहुमानें,
आपण अव्हेरिलें; हिरकणी त्यजिली अज्ञानानें. ७२

आली चालून घरा लक्ष्मी दिधली तिजला पाठ,
परत फिरविलें स्वयें अंगणीं आलें अमृत वहात. ७३

येतां जर त्या समयीं नव्हती आपल्या सुखा जोड,
प्रीतिबलानें केली असती भू स्वर्गाहुनि गोड. ७४

तारुण्याचा भर मम अंगीं, ओसंडे लावण्य,
सहवासीं मम तुच्छ वाटते विषय आपणां अन्य. ७५

अनुरक्तस्त्रीसहवासीं सुख न तें सुरेशपदांत,
विश्वामित्रें व्यर्थ मारिली काय तपाला लाथ ? ७६

नव्हती सदनीं द्रव्यसंपदासुखास कांहीं वाण,
आपणांस पुष्पांत ठेविलें मानून स्वप्राण. ७७

उरलें आतां काय ? जाहली ऐश्वर्याची होळी,
आशाप्रेत धरुन उराशीं अश्रु येथ मी ढाळी. ७८

क्षणोक्षणीं वाटते विझाया आयुर्दीपक लागे,
यमपाश गळां पडले, निर्दय दूत लागले मागें." ७९

९

"म्हणून आलों आतां गणिके, तुजला साह्य कराया,
अज्ञानाच्या पंकीं रुतली धेनू उद्धाराया. ८०

हेतु तुझा, प्याला विषयाचा लावावा मम ओठीं,
परि तुज कळलें नाहीं यौवन–रूप–संपदा खोटी. ८१

पडलों असतों तेव्हां जर मी तुझ्या मोहपाशांत,
येतां कोण तुला दावाया या अंधारीं वाट ? ८२

तूं पतिता मी पतित जाहलों असतों तव संगानें,
बसतें कंठीं अढळ भवाचें माझ्याही रडगाणें. ८३

दृढ करपाशीं धरिलें ज्यांना गणिके, त्वां हृदयाशीं,
जिवलग ते तव आहेत कुठें ? कवण आज तुजपाशीं ? ८४

यौवन चंचल, चंचल जैसा असतो संध्याराग,
कसा टिकावा चांचल्यावर केलेला अनुराग ? ८५

विकसितकलिकारस चाखाया होय अलींची दाटी,
कोमजतां ती परी बिचारी एकही न तिज साथी. ८६

सुंदरपणही भ्रम नयनाचा; मूढ समज हृदयाची !
देशोदेशीं भिन्न कल्पना प्रचरे सौंदर्याची. ८७

परि समज सामान्य–हसतमुख; विशाल काळे डोळे,
सप्रमाण रचिले मांसाचे अस्थिपंजरीं गोळे. ८८

आच्छादन त्यावरती केलें चर्म गौर सुकुमार,
अधरीं लाली, गुलाब गालीं; शिरीं कृष्ण कचभार. ८९

परिसीमा ही लावण्याची; तया भुलावें काय ?
साच मृत्तिकापिंड म्हणविला कोमल सुंदर काय ! ९०

गर्भी नरकीं काल कंठिला अज्ञानें नवमास,
दुजा नरक आदरिती ज्ञानी बघून गोंडस मांस ! ९१

अमृत नांव देऊन सेविती अधरीं भरली लाला !
रीत जगाची " सोन्या " म्हणणें प्रिय विद्रूप मुलाला ! ९२

आणि संपदा काय ? वसवा फिरणारी बाजारीं !
बऱ्या त्या तरी; नसती इतुक्या मूढ, अंध अविचारी. ९३

त्यांतही निघे ¶ वसंतसेना गुणलुब्धा एखादी,
परी संपदा मूर्ख, दुर्गुणी जनां मात्र आराधी. ९४

परवा न तिची ज्यांस, उधळिती जे तिजला लाथांनीं,
त्यावर ही चामरें ढाळिते गात यशाचीं गाणीं. ९५

आपली जिला समजून मनीं राहिलीस तूं धुंद,
कामीं आली काय शेवटीं ती तुजला स्वच्छंद ! ९६

१०

यौवन सरलें, स्वरूप विरलें, दिला धनानें गोता,
पडून मोहीं ज्यांच्या झाला तुझा सर्वथा तोटा. ९७

विसरलीस गणिके ! शाश्वत तूं भुलुनी अशाश्वताला,
फेकून सुधा वदनीं धरिला भ्रमें विषाचा प्याला.

गेलें जावो; उरलें थोडें आयु सार्थकीं लाव,
स्मर करुणेश्वर, तोच स्वपदीं देईल तुला ठाव. ९९

---

¶ हा दाखला देतांना कांहीं कालातिक्रम घडला असल्यास रसिक क्षमा करोत.

दुर्विकारविष हृदयीं भरलें अश्रुमिषें तें काढी,
सुविचाराची आतां घालीं हृदया दृढतर आढी. १००

पश्चात्तापें पापें जळतीं; निर्मल होय स्वांत,
सहज मिळे फल त्याचें सद्गति पतितांतें निभ्रांत. ” १०१

## ११

उपदेशें ज्या वदती ज्ञाते झाला गणिकोद्धार,
सादर केलें त्याचें रसिका गोड गमो हें सार. १०२

● ●

# सत्य, दिव्य आणि शांत ! : १७

भुलवाया मानवास,
हें अफाट थोर विश्व,
भगवंतें क्षणभंगुर, खेळ सजविला !
हा खेळ नटविला ! १

आनंदें वदन खुले,
दुःखानें अश्रु गळे,
फसवणूक सारी ही; स्वर्ग काय तो !
हो सत्य भास तो ! २

जो सायंमेघावर
रंग दिसे अति सुंदर !
तेथें तो क्षणमात्रचि, विलसतो परी !
हो कीर्ति त्यापरी ! ३

प्रेमाऽशा यौवनभर
थडग्यावरचा मोहर,
हा काढुनि आणियला; स्वर्ग काय तो !
हो दिव्य भास तो ! ४

भवसागर दुःखजळीं,
मनुजकुलें सांपडलीं,
लाटांसरशीं वहात, नित्य चाललीं !
तीं घोर वादळीं ! ५

कल्पनाप्रभा, विचार–
किरण अल्प हीं खडतर,
मार्ग उजळितात मात्र, स्वर्ग काय तो !
हो शांत भास तो ! ६

# गाण्याचें गाणें

: १८

गाण्याचें गाणें – गाऊं गाण्याचें गाणें ध्रु०

अंकावरती घेउनि आई,
तनयातें करिते अंगाई,
प्रेमरसाचें गाणें गाई,
हारपतीं भानें – गाऊं गाण्याचें गाणें ! १

कुटुंबभरणास्तव संसारीं,
कष्ट करी जात्यावर नारी,
स्फूर्त गीत तिचा सहकारी,
श्रम विलयाला ने – गाऊं गाण्याचें गाणें ! २

खवळे जलधी, उडवी गगनीं—
कंदुकापरी सलील तरणी
न भी खलाशी पडला व्यसनीं,
गीत समाधानें – गाऊं गाण्याचें गाणें ! ३

स्वच्छंदें मन सोडी ताना,
त्याच पावती कृति रूपांना,
गानरूप ही सृष्टी जाणा,
आत्मज्ञानानें – गाऊं गाण्याचें गाणें ! ४

विहंग गाती, सरिता गाती,
वारे आलापीत वहाती,
गुंगतात नक्षत्रें रातीं,
कोण तयां जाणें – गाऊं गाण्याचें गाणें ! ५

कृत्रिम हास्य नको जगताचें,
असत्य गीत नरस्तवनाचें,
पुर नलगे जेथें खल नाचे,
सेवावीं रानें – गाऊं गाण्याचें गाणें ! ६

अखंड हासतमुख सारें वन,
वायु गुंजती वेणूवादन,
मयूर करिती प्रेमें नर्तन,
जेथ जोडप्यानें – गाऊं गाण्याचें गाणें ! ७

वास करावा ऐशा स्थानीं,
फलपुष्पांचीं गावीं गाणीं,
यत्न करावा जेणें ध्यानीं,
ईशरूप बाणें – गाऊं गाण्याचें गाणें ! ८

रंग गुलाबी गालांचा, दंत हार कुंदफुलांचा,
ऐशी सुंदर रम्य परी, प्रेमभरें स्मित मधुर करी. १

चढे रंग गालीं गहिरा, विकसित होती ओष्ठ जरा;
झळकुनि सहज रदनपंक्ती, तिची दुणावे मुखकांती. २

गेली विलयाला रात्र, फुटे तांबडें गगनांत;
कोर निघे रविकिरणाची, सादृशता स्त्रीवदनाची ! ३

जशी स्फूर्तिकन्या कविता, सविता पसरी जागृतता,
घेतीं स्वबळें एक परी, वर्तविती जगता स्वकरीं. ४

उडती बागडती पक्षी, तत्परता ठेउनि भक्ष्यीं;
गाती ब्रह्मानंदानें, सृष्टीनें रचिलें गाणें. ५

भाव तयांचे वळखावे, शब्दरूप त्यांला द्यावें;
तोच कवी ज्या ही क्षमता, मीं गणमात्रा वर्तविता. ६

बेफिकीर साधीभोळी, ओसरींत चिमणी आली;
टिपावया लागे दाणे, गुंगत ' चीं चीं चीं ' गाणें. ७

श्रम उदरास्तव करितांना, स्वच्छंदें मारी ताना;
धन्य जिला धरितां आली, व्यवधानें एका कालीं. ८

असें पुण्य गांठीं कोठें ? कुठें भाग्य माझें मोठें !
कीं एके कालीं वाहूं, उदरभार गाणीं गाऊं. ९

एक कराया लागावें, दुज्याकडे तों मन धांवें,
साधेना एकही परी, अपूर्णता मनुजता खरी ! १०

स्वच्छंदें गाणीं गातां, पडते उदराची चिंता,
जातां उदराच्या मागें, शब्द दूर पळती रागें ! ११

सहज आरसा एक तिला, बागडतां दृष्टीं पडला,
उडत तयासन्निध गेली, उभी तेथ विस्मित ठेली. १२

ती चंचलता मूर्तिमती, परी तिची कुंठली गती,
स्वप्रतिबिंबित रूपानें, तिचीं लया नेलीं भानें. १३

भाग आपला ते दाणे, टिपावयाच्या हेतूनें,
आली वाटुनि ही दुसरी, चढे तिच्या संताप शिरीं. १४

मारुनि चोंचीचे घाव करूं सवतिचा पाडाव,
या आवेशें ती भोळी, उडी आरशावर घाली. १५

चोंच दुखावे, रक्त निघे, वेडी परि माघार न घे;
पुनः पुनः आरशावरी, चंचुपुटाचे वार करी. १६

श्रमली, ओशाळली मनीं, आले अश्रु तिच्या नयनीं;
सौम्यपणें दर्पण पाही, बिंब त्याच रूपा लाही. १७

द्वेष ओसरे, प्रेम भरे, वैरी तोचि स्नेहि ठरे,
चुंबी, आलिंगी सखिला, होई तेंच प्राप्त तिला. १८

अजाण तें पांखरूं असे, फसे, यांत आश्चर्य नसे,
आम्ही ज्ञानी, सुज्ञ गडी, तसेंचि चुकतों वडीं घडीं ! १९

दिव्य आरसा जगताचा, ईश्वर-निर्मित नवलाचा,
सदैव आम्हांपुढें उभा, दावी सत्य प्रतिबिंबा. २०

हांसूं आम्ही जगा, तसें, करील जग आमुचें हंसें,
करितां जगताची कींव, देइल तें जीवा जीव ! २१

लोभाचें फल लोभ मिळे, द्वेषानें सद्भाव जळे;
जसें गावया पढवावे, तसे बोल गाती रावे. २२

कळून हें आम्हां सगळें, मूढ भाव मतिचा न गळे,
करून जातों भलतेंच, पदोपदीं खातों ठेंच ! २३

## आर्या

गतजन्म प्रतिबिम्बित झाला इह जन्म दर्पणीं स्पष्ट,
केलें तेंच फळाला आलें देखून, सुष्ट वा दुष्ट. २४

यास्तव मना करावा यत्न तुवां सत्पथास लागाया,
गेले जावोत, पुढें दवडावे दिन न आपुले वायां ! २५

## प्रीति निमाली तर— : २०

नादें मंजुल आपल्या रिझविते जी मन्मना नेहमीं
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मी!
अंगातें जडवून पंख उसने जाईन कीं सत्वर—
मी येथून उडून उंच गगनीं प्रीती निमाली तर! १

माझी कोण करील उत्सुक मनें मार्गप्रतीक्षा घरीं!
प्रेमें बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करीं!
आतां भासतसें मला भवन जें सर्वस्व चेतोहर—
त्या येईल खरोखरीच वनता प्रीती निमाली तर! २

काव्याला अनुरूपसा विषय तो कोठून राहे जनीं?
स्फूर्तीच्या उठतील नित्य लहरी कैशा कवीच्या मनीं?
वाहावी कवणास काव्यसुमनें त्यानें वदा भूवर?
कोठूनी जगतीं उरे रसिकता? प्रीती निमाली तर! ३

अस्ता जाइल सूर्यतेज वितरी विश्वास जें जीवन;
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल हो दुर्धर,
भीतीनें मरतील मानवकुलें, प्रीती निमाली तर! ४

मराठा ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ३६७६० वि: काव्य
: २१

## सुवास

हिंडत असतां निर्जन रानीं
स्वैरगतीनें गुंगत गाणीं
मधुर सुवास घ्राणीं आला,
त्या योगानें आत्मा धाला.
उद्भवला हा परिमल कोठें ?
पडलें मजला कोडें मोठें,
फिरलों–स्थिरलों ठायीं ठायीं,
मूळ तयाचें कळलें नाहीं.
कार्य आणि कारण या जगतीं,
तीच वस्तु नटलेली दिसती,
तैसें माझें मानस आतुर,
शंका काढी—देई उत्तर. १

सुगंध जो का अंगीं दाटे,
पुष्पमिषें प्रकटावें त्यातें,
पुष्पें–ज्यांना नाहीं जोड
रंगें, रूपें, वासें, गोड,
हुंगीना परि कोणी त्यातें,
त्यांच्या आस्वादी न रसातें.
खेळावीं जीं रसिका-हातीं,
होते त्यांची संतत मातीं
ओसाडींतील गुलाबातें
खिन्नपणा याकरितां वाटे.
टाकि उसासे सारा वेळ,
त्याचा हा का गंध असेल ? २

वागविली निज हृदयप्रांतीं
भक्तीनें रमणाची मूर्ती,
भजली अर्पण करुनी त्याला
प्रेमाच्या पुष्पांची माला.
काय होय तें परि पुरुषाला,
नव पुष्पावरच्या भ्रमराला ?
विमुख तिला तो हाय ! जहाला,
अंतरली स्त्री सर्वस्वाला.
बाला भग्नमनोरथ झाली,
मौक्तिकापरी अश्रू ढाळी.
दुःखानें एकान्तीं स्फुंदे;
काय तेच या स्थानीं गंधे ? ३

मात्सर्याचा भरला वारा
अहंपणाचा सर्व पसारा,
अज्ञानाची मिरवे द्वाही,
रसिकत्वाला थारा नाहीं.
काय अशा जनतेंत रहावें ?
काय पहावें ? काय चहावें ?
बरें राहणें निर्जन रानीं,
ओढ्यासंगें गाणें गाणीं.
यापरि वैतागून कवीनें,
ओसाडींत स्वच्छंदानें —
वाजविला जो सुस्वर पावा,
त्याचा का हा वास असावा ? ४

परिमलकारण कळलें नाहीं,
उगमस्थल आढळलें नाहीं,
व्यर्थ हिंडलों झालों वेडा !
वेडा ! वेडा ! वेडा ! वेडा !
परिमलकारण मजला कळतें,
उगमस्थळ किंवा आढळतें—
सांठवितों कवितेंत तयाला
वाग्देवीला सुखवायाला !
स्वानुभूत वासाचें दान
करावयाला जोंवर ये न
तोंवर कवितालतिकेवरतीं
कर्णिकार सुमनांची भरती ! ५

## स्त्री आणि पुरुष : २२

फुललिं फुलें—त्यायोगें उपवन खुललें.
दरवळला—परिमल सुखवाया सकलां.
स्वैरगती—अलिगण उडती–बागडती.
मधुनादें—गाती प्रभुगुण आनंदें.
मंदगती—स्त्री तेथें हिंडत होती.
विचराया—पुरुषहि आला त्या ठायां.
कौतुकला—हंसला, बाग मनीं ठसला.
नव फुललें—पुष्प एक त्या आवडलें.
प्रेमभरें—खुडिलें तेणें तें स्वकरें.
हुंगियलें—चुंबियलें–माथा धरिलें.
क्षणमात्रें—होय नकोसें तें त्यातें.
कुसकारिलें—फेकुनि धरणीवर दिधलें.
सर्व कृती—स्त्री ती अवलोकित होती.
गहिंवरली—टिपें तिचीं टपटप गळलीं.
कां तीं ? तें—काय कथूं मी रसिकातें !

आयुःपथास फुटले, दिसले मज दोन वेगळे फांटे,
समजेना मज जावें आपण निःशंक कोणत्या वाटें. १

एकावर वृक्षांची होती घनदाट पसरली छाया,
होता सडा फुलांचा पडला पांथिक जनास सुखवाया. २

स्फटिकापरी जलाचे होते वाहत तयांत रम्य झरे,
ठायीं ठायीं खुलती स्वागतपर राजमंदिरें रुचिरें. ३

सुंदर पथशाखा ही ज्या स्थानीं पावली दिसे विलय,
होते चमकत तेथें शब्दत्रय–‘ सौख्य-संपदा-विजय ’. ४

मार्गारंभीं होते थवे जनांचे निघावया जमले,
थोडेच भाग्यशाली परि दिसले शेवटास विश्रमले. ५

ते थोडकेच होते परि सेवित शांतिसुख समाधान,
ते मानी, तेच धनी, त्यांनाच जगांत ‘ थोर ’ हा मान. ६

असती कष्ट कसे ते नव्हते माहीत त्यांजला परि ते–
अप्रतिहत अधिकारी–सत्ताधारी तयांस यश वरितें. ७

सत्तेचा, विभवाचा, जगताचा मार्ग एक हाच असे,
आरंभीं एक फलक संबोधी स्पष्ट अक्षरांत असें. ८

❀ ❀ ❀

दुसऱ्या पथीं अरेरे! पथ मी त्याला कशावरून म्हणूं,
पदही नसें उमटलें, गेलें न कुणी तयावरून जणूं! ९

सर्वत्र खांच–खळगे, पाषाणपरंपराच त्या वाटे,
कांटे तिखट विखुरले तिजवर पाहून ज्या हृदय फाटे. १०

आल्या मोडकळीला कुटिका तुरळक कुठेंकुठें असती,
ओसाड भयाण दिसे नांवालाही न त्या स्थलीं वसती. ११

निंदा दुःख पराजय, दारिद्र्य स्वैर तेथ संचरती,
कोण बघून तयांना धजेल टाकावयास पद पुढतीं? १२

क्षितिजावरी दिसेना कोठें तो कष्टमार्ग शेवटला,
असलाच अंत त्याला तर होता तो तमांत गुरफटला.. १३

न धजे कुणी क्रमाया पंथ बिकट हा परोपकाराचा,
त्याजकडेस वळे जन निंदेच्या पात्र होय तो काचा. १४

हा कीं तो पथ घ्यावा न सुचे, मन गोंधळांत सांपडलें,
'कंटक पथच तुझा हा' श्रवणीं मम बोल तेधवां पडले. १५

ने घे मन, तुचले पद, तरि वळवुनि त्या पथाकडे चरण,
रडत कढत धीरानें करावया मार्ग लागलों क्रमण. १६

❀ ❀ ❀

मध्येंच परि पथीं त्या बसलों मी हात लावुनी भाला,
बहु निंदिले स्वतांला विचार हा मन्मनीं कसा आला ? १७

अविचार काय केला ? का या कंटकपथास अनुसरिलें !
दारिद्र्यदुःख दुर्घट जयांत चोहींकडे दिसे भरलें. १८

धिक्कारयुक्त वाणी कानीं मम झणझणूं तदा लागे,
रागे भरे कुणी मज 'बचतोस कसा फिरावया मागें ? १९

पडलास कां विचारीं ? अवघड हा पंथ तुज गमे काय ?
कां हाय हाय करिसी ? येथें कां खिळविले तुवां पाय ! २०

कां टाकिसी उसासे ? कां नयनांतून आसवें गळतीं ?
मूढा भ्याडा पडली ऐसी कैसी तुझी भ्रमांत मती ?' २१

मृदु बोल मग उमटले ' आली कां दुबळिका तुला बाळ ?
आहेत अनंत जगीं होते ज्यांची सदैव आबाळ. २२

अन्नान्न दशा झाली शिर टेकाया नसे जया स्थान,
निर्वाहास्तव फिरती रिक्तोदर सोडिती परि प्राण. २३

कां त्रासलास ? कंठीं बहुतांचे प्राण दाटले असती,
कां करिसी शोक खुळ्या ? भग्नहृदय सर्व येथली वसती. २४

आत्मविचारांत वृथा भ्रमसी, दे दुर्बलांवरी लक्ष,
व्यसनांत गुंतलेले दिसतील तुला धरातलीं लक्ष. २५

दुःखार्तांची भरली आहे एकच जगांत किंकाळी,
अश्रुजलें व्यथितांच्या येईल दिसून तुज धरा न्हाली ! २६

बाप मुलास तुडवितो भाऊ भावावरी उठे रुष्ट,
कलह ! कलह ! कलह ! जगीं आप्तपणा सर्व जाहला नष्ट. २७

सत्ता चिर नांदाया विस्ताराया अखंड जे खपती,
त्यांसच तुडवून करी मत्ता ती नित्य आपुली प्रगती. २८

सुखसदनांच्या द्वारा सोन्याचे घट्ट बसविले डाग,
हव्यासासच उघडीं तीं, अन्याचा नसे तिथें लाग. २९

स्वार्थपरायण अल्पच पाषाणापरि करून घट्ट मना,
सर्वापहार करिती, रडवाया लाविती असंख्य जनां. ३०

न्यायाचे क्रयविक्रय बाजारीं धडक चालले उघडे,
चोर उदास मिरवितो, निर्दोषी व्यर्थ बंधनांत पडे. ३१

स्वातंत्र्य नामशेष, स्वतंत्र म्हणवून घे स्वतांस बळे,
त्यास जड उपाधींची जडलीं दृढ बंधनें किती न कळे ! ३२

कोणाच्या देशांवर स्वबलमदें कोण चालवी सत्ता ?
दुबळ्याच्या नम्र शिरीं निर्दय बलवंत हाणिती लत्ता. ३३

नीतीची सत्याची द्रव्याढ्यांनीं करून रांगोळी,
गरिबांकडे सचोटी हांकलिली देउनी करीं झोळी. ३४

असतीं अमरपुरीचीं अनुपम सौख्यें धरातलीं पिकलीं,
परि मानवभूतांच्या दुष्कृतिनें भूमीसुरलता सुकली. ३५

'दुःखाच्या डोहीं जन सांपडले, लागले बुडू खोल,
आतां तूंच तयाला.' ऐसे मग धीट उमटले बोल. ३६

" आत्मा दिला, दिलें मन परमेशानें जया कळे भेद,
सुखदुःख जया समजे, संस्कारीं ज्यास हर्ष वा खेद. ३७

दुःख पराला झालें, बंधु व्यसनांत गुंतले हाय !
हे समजून जयानें केलें नाहीं तयां कधीं साह्य. ३८

तो नीच, हीन मानवकोटीस कलंक होय जाण मनीं,
तो भार धरेस, तयें कष्टविली व्यर्थ आपली जननी. ३९

अवघड काय पथ गमे अझून झाली न का निरभ्र मती ?
दुःखाच्या भीतीनें आहे त्वां काय रोधिली स्वगतीं ? ४०

दुःखें बहुत चिरडले त्यांजकडे एकवार दे दृष्टी,
घे भार तुझ्या स्वशिरीं, होऊं देऊं नको मना कष्टी. ४१

जो मार्ग तुवां धरिला शेवट त्याचा गड्या मनीं आणी. '
प्रेमभरें मजला ती सुचवूं लागे प्रबोधिनी वाणी. ४२

दृष्टि सहज वर मी जों करुनि पुढें वाट पाहिली माझी,
नवलप्रकार दिसला, मति पडली थोर विस्मयामाजीं. ४३

अरुणाची कांति दिसे विराजली व्योममंडलीं दिव्य,
सिंहासन सत्याचें त्या स्थानीं स्थापिलें असे भव्य. ४४

' लाधेल अंत हा तुज, हें सौख्याचें मिळेल भांडार,
जा, जा पुढें, ' करी ती वाणी मज बोध, ' घे न माघार. ४५

लागो, लागेल तुला दुःखांतच सर्व काल कंठावा,
नाहीं होणार न हो सौख्याचा एक शब्दही ठावा. ४६

न मिळो न मिळेल तुला या लोकीं कीर्ति-मान आमरण,
किंवा न करोत तुझें मरणानंतर जगीं कुणी स्मरण. ४७

कर्तव्यकर्म केलें त्यायोगें होय जें समाधान,
तें पारितोषिक तुझें, त्याजपुढें तुच्छ होय धनमान. ४८

जा तर पुढें पुढें मग न श्रम जातील तव कधीं फुकट,
स्वातंत्र्यास्तव केली झाली निष्फल न आजवर लगट. ४९

रात्र सरे दिन उगवे, ऋतुक्रमें वृक्षवल्लि पालवती,
संस्कृति यथावकाशें फळास येणार त्यापरी जगतीं. ५०

जे कष्ट वाहिले त्वां जगतास्तव सोशिली स्वयें झीज,
धीर न सोड तयांचें बाला होईल शेवटीं चीज. ५१

स्वज्ञाति रक्षिल्याचें, देशा स्वातंत्र्यदान दिधल्याचें,
अंतीं तुझेंचि हें यश, याविण सार्थक न अन्य जन्माचें.' ५२

असो कवीचें कुल अप्रसिद्ध,
  होई कवीच्या कवनें प्रसिद्ध.
तसा नदीच्या उगमस्थलाला,
  नदीमुळें गौरवलाभ झाला. १

काव्यें कवींचीं जगतांत गावीं;
  त्याचें न त्यांच्या परि चोज गांवीं.
नदी सुदूरस्थ जनां पवित्र,
  विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र. २

बाल्यांत उच्छृंखलवृत्ति दोन्ही,
  ठावा नसे आडथळा म्हणोनी;
लागो दरी खोल, उभा पहाड,
  जातात तीं धांवत धाड धाड. ३

जाई जसें अंतर होत खोल,
  गांभीर्य ये वृत्ति निवे विलोल.
रेखून मार्गे क्रमितात संथ.
  करीत कल्याण जगीं अनंत. ४

अभंग त्यांच्या हृदयीं तरंग,
  निःसंग ते त्यांत सदैव दंग.
गाऊन गाणीं भ्रमतात रानीं,
  ते धन्य ज्यांच्या पडतात कानीं. ५

स्वजीवनानें उगवून दाणे,
नदी जिवां दे चिर जीवदानें.
तैसें कवीच्या कविताप्रवाहें,
जीवांत संजीवन दिव्य आहे. ६

राष्ट्रें बुडालीं नृप थोर गेले,
नदी कवी मात्र अनंत ठेले.
भागीरथीला खळ लेश नाहीं,
अखंड रामायण लोक गाई. ७

महाकवी थोर नदाप्रमाणें,
मी बापडा ओघळ अल्प जाणें.
धाकें न ओढा झुळझूळ वाहे,
माझी तशी ही गुणगूण आहे ! ८

## विरही : २५

वदवेना मला लागे हुरहुर जी तुजमुळें ! ध्रु०

चालतों बोलतों घरीं
हांसतों वरी—अंतरीं परी
अश्रु वेल्हाळे ! विरहानें तव गळे. १

तव सहवासीं जे दिन
वाटले क्षण, ते युगाहुन
दीर्घतर झालें. नवल असें वर्तलें. २

नाहींस रूपशालिनी
परी गुणखनी, प्रेमरूपिणी
गुणें प्रिय झालें—रूप तुझें सांवळें. ३

तव अकपट प्रेमळ हंसें
अंतरीं ठसे, बोल गोडसे
श्रुतीचीं पाळें, होउनियां बैसले. ४

तव हालचाल लाडकी
आठवुनि सखी, एकसारखी
जड क्षण झाले—कंठितसे प्रेमळे ! ५

होईल कधीं दर्शन
दृढालिंगन, प्रेमचुंबन
चिंतनीं दोले—मन घेऊं लागलें. ६

अलि असतों तर बैसुनी
वायुवाहनीं, गात येउनी
तुला वनमाले ! असतें मीं चुंबिलें. ७

परि दुबळी मानवकुडी
व्यर्थ बापडी, तियेची उडी
बेत केलेले, सर्व कुणा साधले ? ८

मी हट्टी, मजहूनही अधिक तूं आहेस हट्टी खरी.
केला हट्ट तुवांच, दोष मजला कां लाविशी तूं तरी ?
राहूनी पतिसंगमीं सुख जसें, तें कां वियोगीं असें ?
नाहीं भ्रांति तुझी अजून फिटली, त्याला करूं मी कसें ? १

दुर्दैवें जडलें मला व्यसन जें, तें साहवेना तुला.
होतें दुःसह, तापदायक, तरी हा मार्ग कां चांगला ?
जन्माचा – निधनें तुटेल न असा – संबंध जो जोडला,
घ्यावा गोड करून ह्यांतच भलें हें का कळेना तुला ? २

• •

भाग्याचे समयीं मजा उडविली मत्संगतीनें जिनें;
मातें जी न विसंबिली भटकतां पोटार्थ रानेंवनें;
ऐश्वर्यी व्यसनीं अशी मजसवें जी नांदली सारखी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! १

खालीं मान करून संतत उभी लज्जावती जी असे,
रागेजे न कधीं; सदा मजकडे पाहून गालीं हसे !
नाहीं सोडुन कोपरा सरकली, माझें सदा आयकी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! २

नाहीं माहित डामडौल अगदीं साधीसुधी वागली.
नेसायास दिलें जुनें चिर तरी नाहीं असंतोषली;
ल्याली भूषण एकही न, रिझली सेवून पानें सुकीं,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ३

नाहीं चारजणांसमक्ष तिजला मीं चुंबितां लाजली,
हूं कीं चूं न करी उभी तिज जरी मीं विस्तवें भाजली;
ऐशी भक्ति असे तिची मजवरी ठेवी मला जी सुखी,
हा ! हा ! हारवली चिमा प्रियतमा माझी जिवाची सखी ! ४

• •

कळवितों तुला प्रेमानें
स्वप्नाचा मम वृत्तान्त–मानिनी ! ध्रु०

तव मूर्ति मनीं आणोनी
पडलों मी असतां शयनीं–मानिनी !
तळमळ मम होय जिवाची
येईना निद्रा नयनीं–मानिनी !
क्षणभरी–सहज मज परी–झोंप आदरी– बाहुपाशांत;
अनुभवलें स्वप्न तशांत– मानिनी ! १

वसलों मी रंगमहालीं
सुंदरशा उंच पलंगीं–मानिनी !
पाहिली हात जोडोनी
मजपुढें उभी मृदंगी–मानिनी !
तनुवरी–अनेकापरी–भूषणें धरी–हसे गालांत
प्रेमाचें गाणें गात–मानिनी ! २

घातली उठून जिच्या मीं
कंठांत मिठी स्वकरानें–मानिनी !
अनुरंजित केलें गालीं
प्रेमगीत निज ओष्ठानें–मानिनी !
जागृती–नष्ट–दुर्मती—हाय ! शेवटीं–करी कीं घात
काळजी–दुःख–सौख्यांत–मानिनी ! ३

सुंदरी समीप कशाची
स्तंभ उभा जड लोहाचा—मानिनी !
तें प्रेमालिंगन कसलें
जाहला स्पर्श बांकाचा—मानिनी !
ते झुके—वायुचे फिके—एक सारखे—हांस कानांत
स्वच्छंदें होते गात—मानिनी ! ४

संसार दिसे सुंदरसा
झाकून चालतां डोळे—मानिनी !
प्रेमाच्या लीला गमती
जागृतींत चेष्टा चाले—मानिनी !
संसृती—जगाची स्थिति—स्वप्नरूप ती—मानुनी सत्य;
चाललों पहा आहोंत—मानिनी ! ५

कवि : ' तुझी पांखरा ! गोजिरवाणी मनोहरा आकृती,
विधीची करणी वानूं किती ! ध्रु०

रंग पारवा, पात्र गौरवा सुंदर पाचूपरी
मुलामा सोनेरी, त्यावरी;
चंद्रकोर सांवळी रेखिली गोंडस कंठावरी,
भ्रूधनू रमणीगर्वा हरी;
अधरसाम्यतेस्तव न धुंडितां कवि विद्रुम सागरीं,
प्रथम तव चंचु देखता तरी;
स्वच्छंद बैसुनी पुष्पित वृक्षावरी,
काढिसी मधुर रव, धन्य तुझी वैखरी,
वर्षिसी सुधेतें वाटे जगतावरी,
मनीं लालसा, नित्य घडावी तव सुखकर संगती,
वांच्छिते गाणीं गाया मती. १

इष्ट न, निर्जन वनीं वसावा गुणी तुझ्यासारखा,
मुकावा फुका पुरींच्या सुखा !
कोण चाहता तुला या स्थलीं ? कोण जिवाचा सखा ?
वनीं गुण वृथा दवडतोसि कां ?
गुलाबपुष्पें व्यर्थ विकसतीं नसतां मधुमक्षिका,
न सागरतलीं मोल माणिकां;
चल जाऊं आपण सखया ये ये पुरा,
देईन तुला मी सोन्याचा पिंजरा,
बसवीन सुखाच्या शिखरीं तुज पांखरा !

गाऊं दोघे मिळून लावूं चुकले जन सत्पथीं,
सुघुसां आणूं नव जागृती ! २

पोपट : केला आदर, मला बाहिलें आमिषांस दाउनी,
निरंतर केलें मज तूं ऋणी;
नगर कासया आम्हां व्हावें ? मला वास काननीं,
जळो तीं जगताची कांचणी !
असते गुणभोक्ते जर नगरीं चतुरा, तर का गुणी,
हिंडते अमिष्टांपरी वनीं ?
मज हाल पुराची काय पांखरा कळे !
परि वदती नगरीं अज्ञानचि कोंदलें,
रसिकता सर्व करपली मत्सरानलें,
होईल मुका ऐशा स्थानीं जातां वाचस्पती,
पाड तो मज गरिबाचा किती ! ३

स्वच्छंदानें वनीं विहरतों–गातों स्वीय स्वरीं,
न तें सुख असे राजमंदिरीं;
परवशतेच्या पक्वान्नांस न कंदफलांची सरी,
स्वतांची जीर्ण झोंपडी बरी !
लखलाभ असो तुजलाच तुझी परवशतेची सरी,
तांत ती कंठीं रुतली पुरी;
दुःखाच्या डोहीं खडत असतां स्वतां,
कां अन्यालाहि त्यांत बळें ओढितां ?
पुरुषार्थ वाटतो यांत तुम्हां कोणता ?
आनंदानें तुम्ही मारितां परवशतेला मिठी,
अम्हांला परवशजीवित मृती.

## नागपंचमी

: ३०

मजसि न कळे–मी अथवा हे जन चुकले. ध्रु०

प्रपंच मोठा आपलपोटा
परमार्थाचा पथ वा खोटा
पडलें मज गूढ न उकलें. १

मिथ्या का जो प्रपंच भासे ?
परमार्थास्तव मात्र उसासे
टाकून जीव हे सुकले. २

प्रपंचावरी जग आधारे
भासरूप परमार्थ विचारें
स्वहिताला नादीं मुकले. ३

मी, माझेंपण असतें हरलें
'विश्वच घर' जर हृदयीं ठरलें !
असतें का जग मग टिकलें ! ४

मी–पण ज्यांच्या हृदयीं बाणे
तेच जगाचे बनले राणे
श्री–विभव त्यांकडे झुकलें. ५

परमार्थाच्या पडले पाशीं,
फिरती दारोदार उपाशी;
अश्रुपूर नयनीं न खळे. ६

शत्रु, मित्र समजून उराशीं
धरिले, ते वमले विषराशी
विष अमृततरूवर पिकलें. ७

नागपंचमी सण तरि करिती
आत्मविनाश बळें आदरिती
समजून समंजस चकले. ८

कल्पकतेचा स्वामी–वाग्देवीचा लाल नृपा, मी. ६०

अज्ञेयाचा पूर्णज्ञानी
चैतन्य जडा स्वबलें आणी
प्रवेशतों विश्वाच्या-इच्छामात्रें अंतर्यामीं. १

सहज करीं जी धरितों माती
देतों तिजला सुवर्णकांती
माझ्या कौशल्यानें–वसुंधरा ही नटली नामी. २

मीच नृपांचा नृपपददाता
चिरंतनाचा मीच विधाता
वाल्मीकचि संस्थापी–अजरामरता श्रीरघुरामीं.

• •

## दोन प्रासंगिक पदें : ३२

१

एकी गेली स्वार्थपरायणवर्तन भरलें चोंहिकडे;
त्या योगानें स्वतंत्रतेचे देशाच्या झाले तुकडे !
अन्नाचें भांडार संपलें हातीं भिक्षापात्र पडे,
लोभ माजला परस्परांचें धरावया धजलों नरडें !
देश बुडे सर्वस्व बुडे परि नेत्र आमुचा ना उघडे !

२

स्वातंत्र्यास्तव कोण प्राणी सिद्ध न मरणाला ?
धिक्कार असो परवशतेच्या हीन जीविताला !
आर्यभूमि घायाळ जाहली रक्तानें न्हाली—
उठा करा संरक्षण – जन हो तिचें यथाकालीं.
पारतंत्र्यशृंखला वाजते पायीं खळखळ ते—
कर्कश रव नायकवे तीचा हृदय विद्ध होतें !
अन्नाची रुचि हरी जल पितां जालिम विष गमतें;
नको नको ही स्थिती बहु बरें मरण तयापरतें !
पुत्र खरा जो होय संकटीं जननीचा वाली—
सर त्याची येई न अरीच्या अगणिक सैन्याला,

• • •

# चार स्फुट कविता

## १ : सृष्टिविवाहमंडप

अस्तंगत दिनकरकररंजित । मंडप विलसे वर गगनाचा ध्रु०
मंजुळ वाणी मंगलाष्टकें । गण आलापी द्विजराजांचा. १
वृक्षशिरावर बैसून करी । गंधवाह वर्षाव फुलांचा. २
लग्नघटी हे अनुरूप स्थल । योग जुळाया युवयुवतीचा. ३

## २ : प्रीति

प्रीति खोटी म्हणावी आपलपोटी ध्रु०

प्रीतिमिषानें स्वार्थ मिरवतो, जगताच्या पाठीं
अमृत ओठीं तयाच्या विष वसे पोटीं. १

स्त्रिया भाबड्या जगतीं कपटी पुरुषांची जाती
वर प्रेमी मिळाला धन्य ती मोठी. २

## ३ : अलंकार

वस्त्राभरणीं देह नटविणें काय त्यांत सार ?
तनूस शोभा देती केवळ सुगुणालंकार. १

शीलाचें परिधान करावें पातळ जरतारी
कुलस्त्रियेला खुले कंचुकी लज्जेची भारी. २

संतसत्कथाश्रवण डुलावीं श्रवणीं कर्णफुलें
पतिवचनाचीं शिरीं करावीं धारण नित्य फुलें. ३

सत्कृत्याच्या दिव्य कंकणीं करशोभा लाही
परगृहबंधन ह्याच साखळ्या विलसाव्या पायीं. ४

## ४ : प्रेमलुब्धता

पद्मरजा त्यजि न भृंग साहि बंधना
कंटक परि केतकिला। उरग सोडिना. ॥ ध्रु० ॥

दीपकास दे पतंग। क्षणिं आलिंगना
प्राण जाय परि कुरंग। लुब्ध गायना
व्यंगबलें प्रेम किमपि। न्यून होइना. १

# रसग्रहणात्मक टीपा

## १ : महाराष्ट्रलक्ष्मी

जाती— महाराष्ट्रलक्ष्मी ( किंवा मोहिनी )

कवी विनायकांची ही लोकप्रिय कविता. दिव्य पूर्ववैभवाचे स्मरण करून देणारी व आशामय भावी कालाचा दिलासा देणारी. त्यांच्या प्रतिभेची सर्व वैशिष्ट्ये या कवितेत प्रतिबिंबित झालेली आढळतील आणि मर्यादाही पण. पूर्व वैभवाचे अभिमानयुक्त स्मरण व सद्यःपरिस्थितीबद्दल वाटणारी खंत ह्या विनायकांच्या कवितेतील स्थायी भावना. मात्र इतर कवितांतून सतत व्यक्त होणारे नैराश्य या कवितेत नाही. उज्ज्वल भविष्याची स्वप्ने यात दिसतात. 'पूर्व दिव्य ज्यांचे, त्यांना रम्य भावि काळ' या ओळीतील रम्योदात्त कल्पना, आशयसंपन्नता आणि सुभाषितवजा सहजता ही वैशिष्ट्ये विशेषत्वाने जाणवतात. सुटसुटीत व प्रसादपूर्ण रचना हा विनायकांच्या कवितेत सर्वत्र आढळणारा गुण याही कवितेत आढळेल.

द्वादशाब्द दुष्काळाने... "चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात सर्वत्र भयानक दुष्काळ पडला होता. हा सतत बारा वर्षे चालू होता. 'महाराष्ट्र सारस्वता'त श्री. वि. ल. भावे यांनी या दुष्काळाचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे.

"आकाशाने पाऊस पाडण्याचे बंद केले व जमिनीने पिके टाकली. चांगली नांदती शहरे होती ती उजाड पडली; व प्रांतच्या प्रांत ओसाड झाले. महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या नद्या होत्या त्यांत आचमनालाही पाणी राहिले नाही, आणि बावी व विहिरी तर साफच कोरड्या पडल्या. त्यामुळे वस्ती नाहीशी झाली. हजारो लोक हातापायांना सूज येऊन अन्नान्न करून मरून गेले; व थोडेफार राहिले ते

प्रांत सोडून निघून गेले. ह्यामुळे महाराष्ट्राचे महारण्य झाले." ह्याच दुष्काळाला दुर्गादेवीचा दुष्काळ म्हणतात.

**रात्र सरे... पूर्व वाटे...** If winter comes can spring be far behind? या शेलेच्या व "रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल" या कुसुमाग्रजांच्या समानार्थी वचनांशी या वचनाची तुलना करण्यासारखी आहे.

## २ : गणेशपूजन

जाती — चंद्रकांत

१८९७ त महाराष्ट्रात सर्वत्र प्लेगचा कहर उसळला होता. धुळ्यालाही त्याची झळ लागली होती. त्यामुळे गाव सोडून लोक गावाबाहेर झोपड्यातून राहत होते. त्या वर्षी गणेशोत्सव झोपड्यातूनच साजरे झाले. या प्रसंगी विनायकांनी गणेशपूजन या कवनातून केले. या पूजनातूनही त्यांच्या देशभक्तीचे मोठे रम्योत्कट दर्शन घडते. त्यात दैवी आपत्ती आणि पारतंत्र्याची खंत यामुळे एक प्रकारची आर्तताही जाणवते. कारण या पूजेत गणरायाला अभिषेक आहे तो नेत्रातून स्रवणाऱ्या आसवांचा; कर बसल्याने जीर्ण झालेले वस्त्र गणपतीला अर्पण करण्यात आले आहे. 'तिलक' (लो. टिळक) लावून त्याचे भाल सुशोभित करण्यात आले आहे. तर 'चाफ्याचे' (दामोदर चाफेकर) फूल त्याला वाहण्यात आले आहे. गोऱ्या अधिकाऱ्यांच्या कामवासनेला बळी पडणाऱ्या अबलांचे दीर्घ उसासे हे धूप झाले आहेत तर सर्वग्रासी परसत्तेची ज्योत हीच मंगलार्ती झाली आहे. आणि ब्रिटिश राजसत्तेने सर्व देश धुऊन नेल्यामुळे नैवेद्याला काहीच उरले नाही.

**तिलक आणि चाफा :** या शब्दांची द्व्यर्थी योजना करण्यात विनायकांचे विशेष कौशल्य दिसून येते. तिलक म्हणजे गंधाचा टिळा व लोकमान्य टिळक. चाफा म्हणजे चाफ्याचे फूल व दामोदर चाफेकर. १८९७ त पुण्यात प्लेगचा कहर झाला असताना त्याचा प्रतिबंध करण्यासाठी सरकारने रँड या गोऱ्या अधिकाऱ्यास प्लेग कमिशनर म्हणून नेमले होते. या अधिकाऱ्याने प्लेग-

प्रतिबंधक उपाययोजना करताना जनतेवर अनन्वित जुलूम केले. त्याचे पर्यवसान जनतेच्या प्रक्षोभात झाले व त्यामुळे १८९७ मध्ये रॅंडचा खून झाला. या खुनाच्या आरोपाखाली दामोदर चाफेकर यास फाशी देण्यात आले. चाफ्याच्या फुलाचा उग्र वास आणि या घटनेतील प्रक्षोभाची, संतापाची उग्रता हा संबंध विशेष वाटतो. ‘ केसरी ’ तून सरकारविरुद्ध प्रक्षोभक लेख लिहिल्याबद्दल राजद्रोहाच्या आरोपाखाली याच वर्षी लो. टिळकांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. हे प्रसंग, वातावरण यांचे प्रतिबिंब या कवनात प्रभावी रीतीने पडलेले आढळते.

**कामांधकारी...दिनरात :** पंजाबात एका गोऱ्याने एका हिंदी अबलेवर बलात्कार केला याचा उल्लेख या ओळीत आहे.

## २ : शिवराजदर्शन

जाती — फुलवेल

पूर्ववैभवाचे स्मरण हा विनायकांच्या काव्याचा आत्मा. त्यातही स्वराज्यसंस्थापक श्रीशिवरायांचे स्मरण त्यांना विशेष स्फूर्तिप्रद वाटते. तत्कालीन स्वत्वहीन जीवनाचे चित्र या कवनात रेखाटले आहे. आपण सारे पूर्व वैभव विसरलो आहोत, अंगात नवीन विचारांचे वारे भरले आहे. स्वत्व विसरून आपण पूर्ण पराधीन झालो आहोत. अशा आणीबाणीच्या प्रसंगी शिवरायाला आपण गुरू केले पाहिजे, त्याचे सतत स्मरण केले पाहिजे व त्याचे यश-कर्तृत्व गाऊन पुनरुज्जीवनाची नवी स्फूर्ती घेतली पाहिजे हा या कवितेचा आशय. गतेतिहासाच्या भावविवश गौरवातच विनायकांची प्रतिभा घोटाळत होती. नव्या विचारांचा स्पर्शही त्या प्रतिभेला झाला नव्हता याची साक्ष या कवितेने पटावी.

**अंगी भरले...तारे :** इंग्रजी राजवटीची, इंग्रजी आचारविचारांची व त्यांपासून उचललेल्या नव्या कल्पनांची स्तुती जी अहमहमिकेने करण्यात येत होती त्यावर विनायकांचा हा रोख आहे.

तरी = नाव

घालू लोटांगण...नयनी : " घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यांनी पाहीन रूप तुझे " या ओळीशी तुलना करण्यासारखी आहे. ' चला रायगडा। शिवरायाच दर्शन घेऊ।' हे गिरीशांचे ' मावळ्याचे गाणे ' तुलनेने वाचण्या-सारखे आहे.

## ४ : इतिहासाचे मर्म

वृत्त — आर्या ( गीती )

' इतिहासाची पुनरावृत्ती होते ' ( History repeats itself ) या विचार-सूत्राचे प्रतिपादन करणारी ही कविता. वर्ण, रूप व पोषाख जरी बदलले तरी मानवी मन हे सर्वांभूती एकच असते; सुष्ट आणि दुष्ट घरोघरी व गावोगावी ज्याप्रमाणे पूर्वी होते तसेच आजही आहेत व पुढेही होतील असे सांगून शेवटी सत्त्वांश हा तमोगुणाखाली काही काळ दबलेला दिसला तरी सत्त्व गुणाचाच विजय होईल अशी ग्वाही विनायकांनी आपणांस पुन्हा एकदा दिली आहे.

सत्वी गुण दुसरा...करी : तमोगुणाचा अंधार नाहीसा करून सर्व विश्व प्रकाशमय करण्याचा गुण ज्याप्रमाणे सत्वात आहे त्याचप्रमाणे तमोगुणाचा तमोगुण हरण करून त्याला आपल्याशी एकरूप करण्याचा दुसरा गुणही या सत्वगुणात आहे, ही कल्पना.

अथवा ...... मनी : कौरव–पांडव, राम–रावण, बलि–वामन यांच्या कथा ज्यांना कविकल्पनेची निर्मिती आणि म्हणून केवळ काल्पनिक अशा वाटतात त्यांना शिवाजीमहाराजांच्या चरित्राने या विधानाची सत्यता पटावी.

## ५ : हतभागिनी

पालुपदाची जाती — रेवती.

[अंतऱ्यासह सर्व चाल ' कधि करिसी लग्न माझे ' या पदाची.] विनायकांची ही एक प्रसिद्ध कविता. मातृभूमीवरील या रूपकात विनायकांना पुन्हा पूर्व

वैभवाचे स्मरण होते व वर्तमानकाळातील दुरवस्था, अधोगती विशेष तीव्रतेने जाणवते. पहिल्या तीन कडव्यांत हतभागिनी मायभूमीचे शब्दचित्र रेखीव शब्दांत उभे केले आहे. चवथ्या व पाचव्या कडव्यात तिच्या पूर्ववैभवाचे स्मरण आहे. व सहाव्या आणि सातव्या कडव्यात सद्यःपरिस्थितीबद्दल खंत आहे, उपहास आहे.

स्वकालबद्दलची तीव्र निराशा शेवटच्या कडव्यात व्यक्त झाली आहे. या रूपकाच्या द्वारे विनायक कवींच्या मनोवृत्तीचे चांगले दर्शन होते; पण 'महाराष्ट्र-लक्ष्मी' मधील आशावाद या कवितेत नाही. भविष्यकाळाची निराशामय जाणीवच व्यक्त झाली आहे.

**वायुजलवाली :** वारा आणि पाणी यांवर निर्वाह करणारी.

**गगनाची साउली :** तिला राहावयास घर नाही. आकाशाची साउली तिच्यावर आहे.

**एकाश्रुबिंदु...माउली :** विजयाच्या कालात तिच्या एका अश्रूसाठी लढणाऱ्या अशा पराक्रमी मुलांना तिने जन्म दिला. पाचव्या व सहाव्या कडव्यातील विरोध पाहण्यासारखा आहे.

**कारटी...धावली :** या कडव्यात हिंदू-मुसलमानांचे दंगे आणि मवाळ व जहाल यांच्या भांडणांचा उल्लेख आहे.

## ६ : यापुढे

जाती — नृपममता

भव्य आणि दिव्य अशा पूर्व वैभवाचे स्मरण हे विनायकांच्या प्रतिभेला लागलेले एक विलक्षण वेड. पण ते स्मरण जितके उत्कट, हृदयस्पर्शी व ओजस्वी तितकीच त्यातील आर्तताही तीव्र आणि करुणास्पद. 'महाराष्ट्रलक्ष्मी' या कवितेप्रमाणे याही कवितेत पूर्व वैभवाचे स्मरण आढळेल. पण त्या कविते-

तील आशावाद या कवितेत नाही. शिवाजी, रामदास, धनाजी, बाजीराव, राघोबा इत्यादि पराक्रमी पूर्वजांची आठवण मनाला स्फूर्ती देण्याऐवजी यापुढे असे पराक्रमी पुरुष निर्माण होणार नाहीत याची जाणीवच विनायकांच्या मनाला अधिक खंत देते. 'यापुढे' या पालुपदाने रचना व आशय सौंदर्यात विशेष भर घातली आहे.

'यापुढे' ही बा. भ. बोरकरांची कविता तुलनेने वाचण्यासारखी आहे.

## ७ : शिवसंदेश

**वृत्त —** शार्दूलविक्रीडित

'शिवजयंती' उत्सव सगळीकडे साजरा होत असताना, प्रत्यक्ष शिवाजी-महाराजांना काय वाटते, ते त्यांच्या उद्गारातून या कवितेत मांडलेले आहे.

या जगात राजा या पदवीला कुणीच पात्र नाही. आपल्या इच्छेच्या बळावर अवघे सृष्टिकार्य चालविणारा ईश्वरच खरा राजा आहे असे सांगून स्वार्थी मानव राजपद मिळाले म्हणजे प्रजेला पिळवटून देशोधडीला कसा लावतो याचे वर्णन या कवितेत केलेले आहे. त्यानंतर आपण केवळ परबंधनात पडलेल्या महाराष्ट्रभूला स्वतंत्र करण्यासाठीच रणे केली असे सांगून आज त्याच महाराष्ट्र-भूच्या मुलांची कशी स्थिती झाली आहे याचे वास्तव चित्र सहाव्या, सातव्या, व आठव्या कडव्यांत रेखाटले आहे. विशेषतः

'एकी जाय लया, परस्पर तसे, विश्वास तो राहिला,
कोणाला न पुसे कुणी, निजहिती जो तो असे गुंतला;
वाढे मत्सर, लोभदृष्टि अवघे; साहे परोत्कर्ष न
झाले काय अशा गुणे स्वजनतास्वातंत्र्यसंपादन'

या चार ओळींत तत्कालीन देशस्थितीचे चित्र अतिशय उत्तम रीतीने उमटले आहे.

'वर्षातून एक दिवस शिवाजीचे स्मरण केल्याने का काही साधणार आहे ? सर्व जनता ज्या वेळी स्वातंत्र्यक्षम झाल्याचे परमेश्वर जाणील त्या वेळी महाराष्ट्रभू स्वतंत्र होण्यास काहीच वेळ लागणार नाही ' असा संदेश शिवाजी-महाराजांच्या तोंडी शेवटी घातला आहे. देशप्रीतीचे शिवाजीमहाराजांच्या द्वारे केलेले हे आवाहन विनायक कवींचा पिंड दाखविते यात शंका नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३६७६० वि: काव्य
क्रमांक २६७१५ नों दि: २५।८

## ८ : दसरा

जाती — पंचकल्याणी

दसऱ्यावर विनायकांनी तीन कविता लिहिल्या आहेत. पहिल्या कवितेत 'वर्षातील सणांत मुख्य दसरा तो आज की पातला ' अशी भावना व्यक्त करतात. दुसरी कविता या ठिकाणी दिली आहे. आपले पूर्वज दसरा कोणत्या पद्धतीने साजरा करीत असत हे सांगून आज त्यांच्याच कुळात जन्मलेलो आम्ही कसे घरकोंबडे झालो आहोत आणि केवळ कोरडे शब्दजाल कसे विणत बसलो आहोत हे यात दाखविले आहे.

'दसऱ्याचे सोने ' या तिसऱ्या कवितेत " सुवर्णभूची रक्षा झाली । सोन्याजागी पाने आली । ' सीमोल्लंघन ' घडले दैवा । बघसी अंत किती । " अशी खंत व्यक्त केली आहे. या कवितेतील दसऱ्याच्या वर्णनात पूर्वजांचा पराक्रम व आपली निष्क्रियता यातील विरोध चांगला दाखविला आहे. पूर्वजांनी सीमोल्लंघन करून दसऱ्याच्या दिवशी घरात आणलेली लक्ष्मी आम्ही मात्र सर्वस्वाने हरवून बसलो आहोत. कालचक्रातून संचार करणारा दसरा आम्हांला हे पूर्वस्मरण वारंवार करून देत असतानाही आम्ही गाव काय पण घर सोडायलाही धजत नाही. अशी तीव्र जाणीव विनायकांनी व्यक्त केली आहे.

या कवितेबरोबर गोविंदाग्रजांची ' दसरा ' ही कविता तुलनेने वाचण्यासारखी आहे. दसऱ्याकडे पाहण्याची दोघांची मनोवृत्ती कशी भिन्न आहे याचे उद्बोधक दर्शन त्यातून घडेल.

## ९ : प्रोफेसर छत्र्यांचा केसरी

जाती – अक्रूर

प्रो. छत्र्यांच्या सर्कशीतील सिंहाला उद्देशून लिहिलेली ही कविता खरोखर भारतभूमीलाच उद्देशून केलेली आहे.

' ही इष्ट नव्हे परवशतेत बहाली। नाच रंग दीत महाली '। हे या गीताचे मुख्य सूत्र. अरण्यात स्वतंत्र असताना सिंहाची स्थिती व मानवाच्या हाती पडून परवश झाल्यानंतरची स्थिती यातील विरोध परिणामकारक रीतीने दाखविला आहे. केव्हा वर्तमानकालीन पारतंत्र्य व भूतकालीन स्वातंत्र्य व वैभव यांचे तुलनात्मक चित्र रेखाटून तर केव्हा वर्तमानकालीन स्वातंत्र्याचे चित्र रेखाटून भविष्यकालाचा निर्देश सूचित करून विनायकांनी आपली राष्ट्रीय भावना व्यक्त केलेली आढळते.

× × ×

विनायकांच्या काव्यासंभारातील एक वैशिष्ट्यपूर्ण कवितांचा वर्ग म्हणजे त्यांनी ऐतिहासिक स्त्रियांवर लिहिलेली कथाकाव्ये. 'प्रवाही प्रदीर्घ पद्य' असे साधारण कथाकाव्याचे स्वरूप असते. वेधक कथानक, वेचक प्रसंग, चटकदार कथनशैली, सुबोध व प्रवाही भाषा आणि कलात्मक संयम या वैशिष्ट्यांमुळे विनायकांची ही कथाकाव्ये रसिकांना आकर्षून घेतील यात शंका नाही. विनायकांनी ऐतिहासिक स्त्रियांवर अशी आठ गाणी रचलेली आहेत. ती सारी विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन लिहिली आहेत. त्यांपैकी ' अहल्या ' हे त्यांचे पहिले गाणे जुलै १८९८ च्या ' काव्यारत्नावली ' त ज्या वेळी प्रसिद्ध झाले त्या वेळी त्यांनी ' आपल्या देशास ललामभूत झालेल्या स्त्री-रत्नांचा इतिहास आपल्या मुलीबाळींच्या तोंडी बसावा ' असा आपला हेतू स्पष्ट केला आहे. स्त्रियांच्या समोर ऐतिहासिक, पराक्रमी व धीरोदात्त कर्तृत्वशालिनी स्त्रियांचा आदर्श राहावा अशी या गीतांच्या रचनेमागे त्यांची दृष्टी होती. या आठ गाण्यांपैकी संयोगिता, पद्मिनी, पन्ना व कृष्णाकुमारी या राजस्थानच्या इतिहासातील आहेत. दुर्गावती ही मध्यप्रदेशाच्या इतिहासामधील आहे

आणि तारा काल्पनिक आहे. अहल्या व हिरकणी यांचे दर्शन मराठ्यांच्या इतिहासातून घडते. प्रस्तुत संग्रहात पद्मिनी, राणी दुर्गावती, संयोगिता, कृष्णाकुमारी आणि वीरमती या स्त्रियांवरील गाण्यांची निवड केली आहे.

## १० : पद्मिनी

जाती — भूपती

'पद्मिनी' ची इतिहासप्रसिद्ध अशी ही कथा सांगताना विनायकांचे कथाकथनशैलीचे सर्व गुण उजळून निघालेले दिसतात. कथानकात कुठेही पाल्हाळ न लावता, कथेचे दुवे व्यवस्थित गुंफत त्यांनी या कथाकाव्याची मांडणी फार व्यवस्थित केली आहे. ध्रुवपदातच कथेचे सूत्र दिले असले तरी प्रत्येक भागात कथेतील घटना त्यांनी व्यवस्थित रंगविल्या आहेत. त्यामुळे कथेला गतिमानता आली आहे. निरनिराळे प्रसंग रंगविताना व्यक्तिदर्शनावरील पकडही त्यांनी ढिली होऊ दिली नाही. पद्मिनीचे चातुर्य व तिचा पराक्रम हे या कथेचे मुख्य सूत्र—ते त्यांनी सतत डोळ्यांसमोर ठेवले आहेच, पण अल्लाउद्दीनच्या मनःस्थितीचे वर्णनही चांगले केले आहे. काव्याची भाषाही गतिमान कथानकाला साजेशी प्रवाही आहे. 'जो परनारीचा मनीं धरी अभिलाष । होईल यशाचा लाभ कुठुनि तयास ।' यासारखी सुभाषितवजा बोधवचने शैलीचे सौंदर्य वाढवितात. अलंकारांची पखरणही मधूनमधून केली आहे. सुबोध व रसानुकूल भाषाशैली व कथा रंगविण्याचे कौशल्य यांमुळे 'पद्मिनी' हे कथाकाव्य अतिशय सरस वठले आहे.

## ११ : राणी दुर्गावती

चाल — लक्ष्मी गर्वे निंदा बोलुनि

सरळ व ओघवती निवेदनपद्धती आणि बोधप्रधान दृष्टिकोण हे या कथागीताचे विशेष होत. दुर्गावतीवर वैधव्याचे संकट कोसळल्यानंतर आपल्या अल्पवयी बालकाला गादीवर बसवून राज्याची तिने बसविलेली घडी, तिचे राज्य

मिळविण्याची मनात अभिलाषा धरून अकबराने तिच्या राज्यावर धाडलेले सैन्य, त्या सैन्याशी तिने मोठ्या शौर्याने केलेला मुकाबला, पुत्राच्या मृत्यूनंतर पराजयाची चिन्हे दिसत असतानाही रणत्याग न करता रणभूमीवरच स्वतःचे केलेले बलिदान या घटना विनायकांनी या कवितेत रसपूर्ण रीतीने रंगविल्या आहेत. कथानकाचे निवेदन करीत असता मधूनमधून बोध करण्यासाठी किंवा स्वमतप्रतिपादन करण्यासाठी विनायक काव्यात डोकावतात; पण त्यामुळे रसहानी कुठेच होत नाही. कथानक सरळ गतीने पुढे जाते. पाल्हाळ कुठेच येत नाही. मात्र उत्कट रसाविष्काराच्या काही जागी केवळ निवेदन आल्याने त्या प्रसंगांची उत्कटता कमी झाल्यासारखी वाटते; पण जवळजवळ सर्वच स्त्रीगीतातून हा दोष आला आहे. कथानायिकांच्या जीवनातील प्रमुख प्रसंगांचे फारसे पाल्हाळ न करता सरळ निवेदन करण्याचे धोरणच विनायकांनी स्वीकारलेले आहे. त्यामुळे आटोपशीरपणा व साधेपणा हे गुण ज्याप्रमाणे त्यात आले आहेत त्याप्रमाणे रसाविष्काराला योग्य वाव न मिळाल्याने त्यात मर्यादाही पडल्या आहेत.

## १२ : संयोगिता

जाती — केशवकरणी. त्रिपदी : लीलारतीची

पृथ्वीराज व संयोगिता यांची प्रेमकहाणी अगोदरच अतिशय नाट्यपूर्ण आहे. एखाद्या महाकाव्याचा विषय व्हावा अशा काव्यमय घटना यांच्या प्रेम-कथेतून आल्या आहेत. विनायकांनी या घटनांची गुंफणही अतिशय कुशलतेने केली आहे. एखाद्या चलच्चित्रपटाप्रमाणे यातील प्रसंग एकामागून एक आपल्या कल्पनाचक्षूंसमोरून सरकू लागतात. क्षणात स्वयंवर-मंडपातून मंद मंद पावले टाकीत दाराजवळ ठेवलेल्या पृथ्वीराजाच्या पुतळ्याला माळ घालणारी संयोगिता आपणाला दिसते तर क्षणात पुरुषवेषाने रणांगणावर येऊन 'कन्येच्या सौभाग्य-मंदिरा अग्नि कसा लाविता ? ' म्हणून तेजस्वीपणाने पित्याला जाब विचारणारी विद्युल्लता आपल्या नजरेसमोर तळपते. कथेचा दुःखान्त शेवट जरी हृदयाला चटका लावीत असला तरी संयोगितेच्या तेजस्वी वृत्तीनेच वाचक शेवटपर्यंत

मारून जातो. स्वकीयांविरुद्ध परकीयांची मदत घेऊन स्वतःचा व देशाचा घात करण्याच्या आपल्या आत्मघातकी वृत्तीबद्दल विनायकांना वाटणारी खंत काव्याच्या शेवटी उत्कटत्वाने प्रकट झालेली आढळेल. कथेचे ते जरी मुख्य सूत्र असले तरी कथेचा नाट्यात्मक आविष्कारच मनाची शेवटपर्यंत पकड घेतो.

## १३ : कृष्णाकुमारी

जाती — चंद्रकान्त

अंतःकरणाला चटका लावणारी ही एक अत्यंत श्रेष्ठ काव्यकथा आहे. कृष्णाकुमारीची मूळ कथाच इतिहासातील अश्रूंनी भिजलेली कहाणी आहे. विनायकांनी त्यातील कारुण्य शब्दाशब्दातून प्रकट केले आहे.

> ‘ कळी उमलली जो न पावली पूर्ण विकासाला ।
> अदय करांचा तोच तिजवरी पडला की घाला ! ’

ही अतिशय काव्यपूर्ण सुरवातच वाचकांचे चित्त वेधून घेते. कृष्णाकुमारीचे अलौकिक सौंदर्य व त्यामुळे जगत्सिंह व मानसिंह यांच्यामध्ये तिच्या प्राप्तीसाठी निर्माण झालेली तेढ यातूनच करुण घटना निर्माण होतात. भीमसिंहाच्या भित्र्या स्वभावाला ( अमीरखानच्या सल्ल्यावरून ) हे वैराचे बीज नाहीसे करणेच योग्य वाटते. रक्तपात व संघर्ष टाळण्यासाठी आपल्या कन्येचा बळी द्यावयास निघालेला भीमसिंह व आपल्या पित्यासाठी आणि आपल्या प्रिय देशासाठी आत्मसमर्पणाला हसत हसत सिद्ध होणारी त्यागी कृष्णाकुमारी यांच्यामधील विरोध कवीने चांगलाच रंगविला आहे.

त्याबरोबरच

> ‘ रजपुतांचे छावे आम्ही अबलांचे साथी
> वागवितो तरवार कटीला नित्य तयांसाठी ! ’

असे तेजस्वीपणाने बजाविणारा दौलतसिंग व ‘ हे अनर्थाचे मूळच खंडून टाका ’ असा सल्ला देणारा अमीरखान व भीमसिंहाचा मंत्री अजित यांच्यामधील

विरोधही डोळ्यात भरतो. भीमसिंहाच्या आज्ञेने कृष्णाकुमारीला ठार मारण्यासाठी एक जवान ज्या वेळीं निर्धाराने कृष्णाकुमारीकडे जातो त्या वेळचे वर्णन कवीने अतिशय नाट्यपूर्ण व चित्रमय केले आहे. निष्पाप कृष्णाकुमारी त्या वेळीं फुलांचा हार गुंफीत बसली होती. फुलांच्या रूपाने जणू असंख्य तरुणांची हृदयेच ती गुंफीत होती.

> ' हिमधवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती,
> धवल फुले ती धवल कराने धवल गुणीं गाठी ! '

अशा निष्पाप व निरागस कृष्णेला पाहून तो निर्दय जवानही दिपला आणि त्याच्या हातातून शस्त्र गळून पडले. हे वर्णन आणि शेवटी भीमसिंहाच्या आज्ञेवरून कृष्णेची आई कृष्णेला विषाचा प्याला देते ते वर्णन अतिशय हृदयस्पर्शी वाटते. विनायकाच्या लेखणीचे सारे सामर्थ्य या ठिकाणी उजळून निघाल्यासारखे वाटते.

आटोपशीर रचना, चित्रमय शब्दांचा व कल्पनांचा जागोजागी केलेला उपयोग, उत्कट रसाविष्कार आणि वेधक व्यक्तिचित्रण यांमुळे हे काव्य रसिकांच्या मनाची अतिशय पकड घेते. ' श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरळ ! ' ' मरण यशाचे जर त्या योगें देश-धर्म वाचे ! ' अशी मधूनमधून विखुरलेली सुभाषिते काव्याची शोभा वाढवितात. विनायकांच्या सर्व कथाकाव्यांत हे कथाकाव्य श्रेष्ठ ठरावे.

## १४ : वीरमती

जाती — उद्धव

' वीरमती ' या वीरस्त्रीच्या जीवनातील प्रसंगावर कवी विनायक यांनी दोन काव्ये लिहिली आहेत व दोन्ही काव्ये त्यांतील वीररसाच्या आविष्कारामुळे अतिशय परिणामकारक वठली आहेत. औरंगजेबाचा प्रसिद्ध मांडलिक जोधपूरचा राणा जसवंतसिंग हा एकदा समरास पाठ दाखवून माघारा फिरला. क्षात्र-

बीजास कलंक लावणारे ते कृत्य त्याच्या मानी स्त्रीस खपले नाही. तिने राजधानीचे दरवाजे बंद करून घेतले व राजाची अतिशय तीव्र शब्दांत निर्भर्त्सना केली आणि स्वतः पुरुषवेष धारण करून अल्प सैन्यासह त्वेषाने शत्रुसेनेवर तुटून पडली. तिच्या निर्भर्त्सनेने व कृतीने चेव येऊन जसवंतसिंग पुन्हा शत्रूवर तुटून पडला व त्याने विजय मिळविला. 'वीरमती'चे हे आख्यान 'आर्यावृत्ता'त रंगविले आहे. तेरा खंडांत रंगविलेल्या या कथाकाव्यात रसपरिपोष अतिशय चांगला साधलेला आहे. विशेषतः 'वीरमती' ने जसवंतसिंगाची केलेली निर्भर्त्सना अतिशय ओजस्वी वाटते. पण सुरवातीचा जसवंतसिंगाचा स्त्रैण स्वभाव वर्णन करणारा भाग त्यातील तपशिलामुळे काहीसा उत्तान वाटतो. विनायकांच्या वृत्तीला तो विसंगत वाटतो. त्यामानाने 'वीरमती 'वर उद्धव जातीत लिहिलेले प्रस्तुत काव्य अधिक आटोपशीर व परिणामकारक वाटते. या काव्यातील वीरमतीचे उद्‌गार अधिक तेजस्वी आणि अधिक वीररसपूर्ण वाटतात.

विशेषतः 'तुम्हाला मी मृत समजते आणि त्यामुळे सहगमन करण्यास मी सिद्ध झाले आहे. पण त्यासाठी तुमचे चालते बोलते शव मला नको आहे. तुमच्या समरत्यागाने वीर कुलव्रताचा जो भंग झाला आहे त्याबरोबरच माझ्या तनूची मी आहुती देईन' हे वीरमतीचे उद्‌गार कुणाही पुरुषाला चेव आणतील.

आटोपशीर रचना, परिणामकारक वीररसाचा आविष्कार आणि वीरमतीचे तिच्या उद्‌गारांतून व तिच्या कृतीतून व्यक्त केलेले तिचे तेजस्वी व्यक्तिचित्रण यांमुळे ही कविता विनायकांच्या वीरवृत्तीची साक्ष देणारी झाली आहे. 'वंश जो क्षात्र तेजाची, जागती ज्योत जगतात।' 'परि फसले; हाय बुडाले; जाहली जिण्याची माती।' 'कंठात तयाच्या घालू सुमनांची माला माने' यांसारख्या ओळींतून त्यांच्या शैलीची रमणीयता जशी प्रकट होते त्याप्रमाणे 'चपला नटली वीरश्री जावया रणात निघाली' किंवा 'दीपकी पडून पतंग। भाजून जसे घे अंग। तिजवरला तोच प्रसंग। टळला...' यांसारख्या ओळींतून त्यांचा कल्पनाविलासही जाणवतो. वीरमतीच्या उद्गारांत चीड, उपरोध आणि त्वेष

यांचे चित्रणही किती परिणामकारक केले आहे हे काव्य वाचताना सहज लक्षात येते. हेच 'वीरमती' चे यश.

## १५ : ध्यास तो भास

वृत्त — आर्या

'ध्यास तो भास' या कवितेतील मध्यवर्ती कल्पना जरी बायरनच्या 'आल्प दि रेनिगेड' या कवितेवरून सुचली असली तरी साऱ्या कवितेत त्या कल्पनेचा मागमूसही कोठे दिसत नाही. 'परधर्मातील जिणे जगण्यापेक्षा स्वधर्मातील मरण बरे' हे तत्त्व या काव्यामध्ये गोवले गेले आहे. अकबर बादशहाच्या कारकीर्दीत मोहाला बळी पडून पुष्कळच रजपूत वीरांनी यावनी धर्माची दीक्षा घेतल्याचे इतिहासात प्रसिद्ध आहे. त्यांपैकी एकाचे पश्चात्ताप-चित्र या खंड-काव्यात दिले आहे.

असा हा तरुण स्तंभाजवळ एकटा उभा होता. त्याच्या मुखावर तेज नव्हते, मान खाली गळली होती व हृदय आतल्या आत तडफडत होते. तेवढ्यात त्याला कुणाचातरी निःश्वास ऐकू आला. अशा या एकांतात रात्रीच्या वेळी कोण आले असावे म्हणून तो आजूबाजूस पाहतो तो जवळच त्याची प्रिय सखी मोहना बसलेली त्याला आढळली. त्याचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी ती शत्रूच्या तळात त्याला भेटण्यासाठी आली होती. यवनांचा धर्म सोडून स्वधर्माचा त्याने स्वीकार करावा म्हणून तिने त्याची आर्जवे केली, मनधरणी केली; परंतु त्याच्या हृदयावर त्या विनवणीचा काहीच परिणाम झाला नाही. उलट यवनधर्म स्वीकारण्याला त्याच्याच नीच व दुष्ट बांधवांनी त्याला कसे भाग पाडले हे सांगून त्यांना सोडून तिनेच आपला स्वीकार करावा असे त्याने तिला सांगितले. त्यावर तिने त्याला अनेक रीतींनी स्वदेशाचे व स्वधर्माचे महत्त्व समजावून सांगितले—त्याच्या त्या धर्मद्रोही कृत्यांचा परिणाम काय होईल, त्याचा उपयोग करून घेतल्या-नंतर हे यवन त्याचाच कसा तिरस्कार करतील हेही पुनः पुन्हा त्याला पटवून देण्याचा प्रयत्न केला आणि या दुराचारापासून तो परावृत्त झाला नाही तर

तिलाही त्याचा त्याग करावा लागेल असेही तिने सांगितले. पण त्याचा त्याच्या मनावर काहीच परिणाम झाला नाही.

‘ धर्म नको मज तुमचा, देश नको, लोकही नकोत मला ’

असे म्हणून त्याने तिच्याकडे पाहिले तो ती एकाएकी गुप्त झाल्याचे त्याला आढळले आणि मग त्याला समजले की हा सारा कल्पनेचा खेळ होता. ज्याचा मनाला ध्यास असतो त्याचाच भास होतो हे सत्य त्याला पटले.

‘ ध्यास तो भास ’ या खंडकाव्यात वरील कथानक रंगविताना विनायकांच्या प्रतिभेचे सर्वच गुण उजळून निघाल्यासारखे दिसतात. रेखीव शब्दचित्रे, सुंदर कल्पनाविलास, परिणामकारक वातावरणनिर्मिती व ओघवती शैली यांमुळे हे खंडकाव्य विलक्षणच परिणामकारक वाटते. आपल्या प्रियकराने यवनधर्म सोडावा म्हणून मोहनेने केलेली आर्जवे व केलेला युक्तिवाद तिच्या व्यक्ति-चित्रणात निराळाच रंग भरतो. तर त्या कथानायकाच्या मनोवृत्तीतील रंगविलेला संघर्षही अतिशय परिणामकारक वाटतो. कल्पनाविलासाची स्थळे तर जागोजाग सापडतील. स्वर्ग व भूमी एकमेकापासून दूर का झाली याविषयी केलेली कल्पना खरोखरच अतिशय रम्य आहे. त्याशिवाय

‘ तंतूच्या वाद्यावर इष्ट सुरास्तव फिरे जसा हात ।
भाली कर तो फिरवी वरचेवर, मग्न निज विचारांत ! ’

किंवा

‘ जे मातापितरांचे प्राप्त अपत्यास तेच गुणवान ।
वृक्ष तसे पुष्प मिळे; कंठ जसा त्यापरी निघे तान । ’

यासारख्या ओळीतून आढळणारा कल्पनाविलास काव्याचे सौंदर्य वाढवितो. सुरवातीला निःशब्द वातावरणाचे कवीने काढलेले शब्दचित्र किंवा १७ ते २० आर्यांमध्ये मोहनेचे काढलेले शब्दचित्र हे अतिशय आकर्षक वाटते.

या कवितेतून बोध देण्याचा कवीने प्रयत्न केला असला तरी या कथानकाचे अद्भुतरम्य वातावरण व त्या पार्श्वभूमीवर रंगविलेले मोहनेच्या व तिच्या

प्रियकराच्या भावनांचे चित्र हेच मनाचा अधिक वेध घेते. आणि त्याला जोड मिळाली आहे रम्य कल्पनाविलासाची, व ओघवती आणि डौलदार भाषाशैलीची. विनायकांच्या प्रतिभेचे सर्वच गुण या खंडकाव्यात उजळून निघालेसे वाटतात असे म्हणावेसे वाटते ते याचमुळे.

## १६ : गणिकोद्धार

वृत्त -- साकी

या खंडकाव्याचे कथानक वासुदेव गोविंद आपटे यांच्या 'अशोक चरित्रा-' तील खालील कथेवरून घेतले आहे.

मथुरा नगरीत वासवदत्ता म्हणून एक गणिका होती. ती एकनिष्ठपणे एकाच यजमानाची सेवा करीत असता तेथल्याच उपगुप्त नावाच्या एका बुद्ध उपासकावर तिचे मन गेले. तिने त्याच्या प्राप्तीसाठी हवी तशी खटपट करून पाहिली. परंतु तो विरक्त उपासक तिला वश झाला नाही. एकदा दैवयोगाने आपल्या यजमानाचा धनलोभास्तव खून केल्याचा आरोप तिच्यावर येऊन तिचे स्तन व नाक कापण्यात आले व तिला स्मशानात टाकून देण्यात आले. तेथे ती विव्हळत पडली असताना उपगुप्त तेथे गेला आणि त्याने तिला उपदेश केला. त्याच्या योगाने तिचा उद्धार झाला.

वरील कथेवरच 'गणिकोद्धार' हे खंडकाव्य आधारलेले आहे. मुळातच कथा करुणरम्य आहे आणि त्याचा विकासही कवीने अतिशय भावपूर्ण रीतीने केला आहे. काव्याच्या सुरवातीलाच स्मशानाचे भयानक वातावरण कवीने रंगविले आहे.

'चिता धडकल्या ज्वाळा उठती भरे दशदिशा धूर ।
कवट्या फुटती, अग्नी माजी होय अस्थिचा चूर ॥'

अशा त्या राक्षसी घटिकेच्या वेळी स्मशानाच्या दरबारात नासिका व स्तन छिन्न झालेली व निराश्रित अशी वासवदत्ता धुळीत लोळत पडली होती.

वासवदत्तेचे चित्र कवीने अतिशय करुण रंगविले आहे. एकेकाळी तरुणांना वेड लावणारी, वैभवात लोळणारी आणि अगणित दासदासींकडून सेवा घेणारी वासवदत्ता आज एकाकी धुळीत लोळत पडली होती. तिचे पूर्वजीवन व तिची निराश्रित परिस्थिती यांतील विरोध अतिशय परिणामकारक वाटतो. आणि त्याच वेळी तिला उपगुप्त दिसला. त्यामुळे तिच्या भावना अधिकच अनावर झाल्या. याच उपदत्तावर तिने मनापासून प्रेम केले होते व त्याच्या प्राप्तीसाठी अनेक तऱ्हेने प्रयत्न केले होते. त्या वेळी आला असता तर 'प्रीतिबळाने केली असती भू स्वर्गाहुनि गोड.' पण उपगुप्त आला तो भलत्या वेळी.

'उरले आता काय ? जाहली ऐश्वर्यांची होळी।
आशाप्रेत धरून उराशीं अश्रु येथ मी ढाळीं ॥'

त्यावर उत्तर देताना उपगुप्त सांगतो की त्या वेळीं मी जर मोहपाशात पडलो असतो तर या अंधारात तुला वाट दाखवायला कोण आले असते ? अशाश्वताला भुलून त्या वेळी तू शाश्वताला विसरलीस. त्या शाश्वताची ओळख करून देण्यासाठीच मी आज येथे आलो आहे. वासवदत्ता व उपगुप्त यांचा संवाद रंगविताना भावनांची आंदोलने कवीने अतिशय चांगल्या रीतीने रंगविली आहेत. वासवदत्ताचे करुणरम्य व्यक्तिमत्त्व व उपगुप्ताचा उदात्त स्वभाव कवीने शब्दाशब्दातून प्रतिबिंबित केला आहे.

कथानकाला उठाव येण्यासाठी कवीने वातावरणनिर्मितीचा व विरोधाचा चांगला उपयोग करून घेतला आहे. पहिल्या व पांचव्या भागांतील स्मशानाचे वर्णन आणि तिसऱ्या भागातील विरोध कथानकाला उठाव आणतात. सुभाषितांची पेरणही आशयाच्या सौंदर्यात अधिकच भर घालते. ( उदा. १६, १७ व १८ या साक्या, २९ वी साकी, ५२ वी साकी, ८६ वी साकी–यांतील सुभाषिते विनायकांच्या भाषाप्रभुत्वाची साक्ष पटवितील. ) कल्पनाविलास तर जागोजागी आला आहे. सुरवातीचेच संध्येचे वर्णन पाहा :

‘ पति निधनास्तव अशौचदर्शक कृष्णपट दिशा ल्याली ।
पति प्रकाश स्त्रीचा त्याविण काळेच तिच्या भाली ! ’

ही किंवा

‘ उठे दीर्घ रोदन स्मशानी या समयास भयाण ।
निराश्रिता कवितेची जैशी उदासवाणी तान ॥ ’

ही कल्पना विनायकांच्या कल्पनावैभवाची साक्ष पटविते.

‘ ध्यास तो भास ’ आणि ‘ गणिकोद्धार ’ ही दोन्ही छोटीशी खंडकाव्ये वातावरणनिर्मिती, आशयसंपन्नता, ओघवती भाषाशैली आणि रम्य कल्पनाविलास या गुणांनी नटलेली आहेत. त्यांचा बोधप्रधान दृष्टिकोण या दोन्ही खंडकाव्यांतून दिसत असला तरी त्यांच्यातील कलावंताने त्या दृष्टिकोणावर मात केली आहे हे निश्चित जाणवेल.

## १७ : सत्य, दिव्य आणि शांत !

**राग : भूप. चाल : बँडची.**

विनायकांची ही तात्त्विक कविता. स्वर्ग, पृथ्वी, कीर्ती, प्रेम यांसंबंधीचे परंपरागत विचार यात आले आहेत. विश्वपसारा हा मानवाला भुलविण्यासाठी परमेश्वराने सजविलेला क्षणभंगुर खेळ आहे काय ? मग सत्य काय ? कीर्ती ? ती तर सायंकालीन मेघावर दिसणाऱ्या क्षणभंगुर रंगाप्रमाणे आहे. प्रेम, आशा आणि यौवन ही तरी सत्य आहेत काय ? की शेवटी स्वर्ग हाच सत्य, का तोही दिव्य भासच ? पण भास असला तर तो दिव्य आहे आणि दिलासा देणारा आहे. आपले मार्ग उजळणारा आहे. शांत आहे. उलट-सुलट विचारांची वळणे घेत कवी कल्पनातरंगावर विहार करीत असल्यासारखे वाटते.

## १८ : गाण्याचे गाणे

चाल : नवुनि सुभद्रेला कसा यति वेडावुनि गेला

जाती — युवतिभूषण

केशवसुतांच्या सहवासात कवी विनायकांना ' गाण्याचे गाणे ' ही कविता सुचली असावी असे प्रा. भ. श्री. पंडित यांचे मत: आहे. इमर्सन हा केशवसुतांचा आवडता ग्रंथकार. त्याचा ' We are lovers of rhyme, period and musical reflection. The babe is lulled to sleep by the nurse's song. Sailors can work better for their yo-heave-ho.' हा उतारा केशवसुतांच्या मुखाने ऐकून विनायकांना हे गाणे लिहिण्याची स्फूर्ती झाली असावी असे त्यांचे मत.

कवितेतील पहिल्या व तिसऱ्या कडव्यांतील आशय वरील उताऱ्याशी अर्थदृष्ट्या समान असला तरी एकंदर या गीताचे स्वरूप वेगळेच वाटते. आईचे अंगाईगीत, नारीचे जात्यावरील गाणे, व खलाशाचे समुद्रावरील नाविक गीत यांचा पहिल्या तीन कडव्यांत उल्लेख केल्यानंतर ते आत्मज्ञानाच्या क्षेत्रात शिरतात. मन स्वच्छंदपणे ज्या ताना सोडते त्याच कृतिरूप पावतात व सृष्टीचे नवे दर्शन घडवितात. विहंग व सरिता यांच्या गायनाने व वाऱ्याच्या आलापाने रात्रीची नक्षत्रे गुंगतात. ते गाणे त्यांना आकृष्ट करते. म्हणूनच त्यांना जगाचे कृत्रिम हास्य नकोसे वाटते. नरस्तवनाचे असत्य गीत नको वाटते आणि दुष्ट राहत असतील ती शहरेही वर्ज्य करावीशी वाटतात. त्या मानाने रानात राहून फल-पुष्पांची गाणी गाऊन ईशस्वरूप ध्यानात बाणेल असा यत्न करावा ही त्यांची इच्छा.

एकंदर या गीताचे स्वरूप भोंगळ वाटते. गाण्याबद्दलच्या निरनिराळ्या कल्पना विस्कळितपणे विखुरल्यासारख्या वाटतात. त्यांचा परस्परांशी मेळ नाही. जगाची कृत्रिमता आणि रानातील स्वच्छंद वास यांसंबंधीचे शेवटी आलेले विचार एकंदर मध्यवर्ती कल्पनेशी कितपत जुळतात हाही प्रश्नच आहे. आईचे गाणे, श्रमिकाचे गाणे, आत्म्याचे गाणे व निसर्गाचे गाणे या गाण्यांतील उदात्ततेचा चढत्या श्रेणीने परिचय करून देण्याचा त्यांचा हा प्रयत्न असावा असे स्थूलमानाने या कवितेसंबंधी सांगता येईल.

इमर्सनच्या कल्पनेवरून जरी कविता सुचली असली तरी त्या कल्पनेचा विकास सुसंगतपणे झाला नाही एवढे या कवितेसंबंधी म्हणावेसे वाटते.

## १९ : चिमणी

चाल — धिन्ना धिन्नक धिन्ना धी

जाती — 'बालानंद'

'चिमणी' ही कविता अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. केशवसुतांच्या 'भृंग' या कवितेची आठवण जरी या कवितेने होत असली तरी 'भृंग' कवितेपेक्षा या कवितेचे स्वरूप निराळे आहे. 'भृंग' हे सृष्टीचे कवन आहे. जगाविषयी उदासीन असलेल्या व सृष्टीशी तन्मय झालेल्या या 'भृंगा'चे गाणे हे कवीला खरे गाणे वाटते व ते स्वतःला 'मी गणमात्रा जुळणारा' असे म्हणवून घेतात. 'चिमणी' मध्येही कवी स्वतःला 'मी गणमात्रा वर्तविता' असे म्हणवून घेतो. पण 'भृंगा'कडे पाहण्याची केशवसुतांची दृष्टी व 'चिमणी'कडे पाहण्याची विनायकांची दृष्टी अगदी निरनिराळी आहे. 'भृंगा'च्या रूपात केशवसुतांना सृष्टीचे चैतन्य दिसते तर 'चिमणी'च्या क्रीडितात विनायकांना बोध दिसतो.

कवितेचे तीन भाग पडतात. पहिल्या सहा कडव्यांतून प्रभातकालाचे अतिशय काव्यमय वर्णन आहे. सातव्यां कडव्यापासून अठराव्या कडव्यापर्यंत चिमणीच्या क्रीडांचे वर्णन आहे व त्यावरून काढलेला बोध शेवटच्या भागात आहे.

पहिल्या भागातच सृष्टीने रचलेल्या गाण्याचे भाव ओळखून जो त्याला शब्दरूप देईल तोच खरा कवी, मी मात्र गणमात्रा वर्तविता आहे असे कवी म्हणतो. केशवसुतांच्या 'भृंग' या कवितेतील 'अस्मद्गान नव्हे गान। ते गान चिंध्या गान।' या ओळींची येथे आठवण येते. पण पुढे साधीभोळी चिमणी ओसरीवर आली व दाणे टिपू लागली. दाणे टिपता टिपताच ती

' चिव चिव ' करीत गाणे गुंगू लागली. पोटाकरिता श्रम करता करता स्वच्छंदाने ताना मारणाऱ्या चिमणीचे त्यांना कौतुक वाटले. आपले असे भाग्य नाही त्याबद्दल त्यांना खंतही वाटली. ते म्हणतात :

' एक कराया लागावे, दुज्याकडे तो मन धावे।
साधेना एकही परी, अपूर्णता मनुजता खरी ॥
स्वच्छंदे गाणी गाता, पडते उदराची चिंता।
जाता उदराच्या मागे, शब्द दूर पळती रागे ॥ '

[ याही ठिकाणी

' असदीय हृदयी ठरले। की जग हे दुःखे भरले।
म्हणुनी सुंदरतेलाही। कुसे अम्हा दिसती पाही ॥

या ' भृंग ' मधील केशवसुतांच्या उद्‌गारांची आठवण व्हावी. ]

पण त्यानंतर चिमणीला आरसा दिसल्यानंतर तिच्या झालेल्या अवस्थेचे ते वर्णन करतात. प्रथम आपली कुणी सवतच येथे आली आहे असे वाटून ती प्रतिबिंबावर हल्ला करते व नंतर रक्तबंबाळ झाल्यावर द्वेष ओसरून त्या प्रतिबिंबाकडे सखीभावाने ती पाहू लागते. कवीने यावरून सिद्धान्त काढला आहे. ईश्वरनिर्मित जगाचा आरसा आपणांपुढे सदैव उभा आहे. आपण जसे असू तसे आपले प्रतिबिंब दिसेल. आणि शेवटी आर्येत ते सांगतात की गतजन्माचे प्रतिबिंब या जन्माच्या दर्पणात स्पष्ट पडते. म्हणून या जन्मी तरी निदान सत्पथाने वागावे म्हणजे पुढील जन्मीच्या दर्पणात प्रतिबिंब चांगले पडेल.

कवितेचे वरील स्वरूप पाहिले म्हणजे निसर्गदृश्यातून बोध काढण्याची विनायकांची वृत्ती स्पष्ट दिसते. कवीसंबंधाने यात काही विधाने आली आहेत. पण ती ' भृंगा'त आलेल्या कल्पनांशी समांतर वाटतात. काव्य आणि व्यवहार एका वेळी जमत नाही ही विनायकांना वाटणारी खंत कदाचित त्यांच्या जीवनातील असावी.

कवितेतील तीन भाग नीट सांधले न गेल्याने रचना विस्कळित झाल्यासारखी वाटते. पण पहिल्या भागातील सृष्टिवर्णन व दुसऱ्या भागातील

चिमणीच्या क्रीडांचे वर्णन अतिशय चांगले साधले आहे. 'चिमणी 'चे वर्णन तर सुंदर शब्दचित्रच आहे. चिमणीच्या क्रीडितांवरून काढलेला सिद्धान्तही तसा विषयाशी एकजीव झाल्यासारखा वाटतो. पण सूचकतेनेही हा निष्कर्ष वाचकांपर्यंत पोहोचविता आला असता.

## २० : प्रीती निमाली तर—

वृत्त — शार्दूलविक्रीडित

विनायकांनी प्रेमकाव्ये फार थोडी लिहिली. पण 'प्रीती' वर लिहिलेली ही कविता मात्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'प्रीती निमाली तर—' काय होईल ? संगीतातील मोहिनी सगळी संपून जाईल आणि पृथ्वीवर राहणे अशक्य होईल. प्रीती निमाली तर घरी आपली मार्गप्रतीक्षा तरी कोण करील ? नंदन-वनाप्रमाणे असणाऱ्या गृहाला प्रीती निमाली तर अरण्याची कळा आल्या-वाचून राहणार नाही आणि प्रीती निमाली तर काव्यदेवता तरी कुठली आणि काव्य तरी कुठले ?—प्रीती निमाली तर सूर्यतेज अस्ताला जाईल, सारे जग दुःखांधकारात बुडून जाईल आणि मानवकुले भयाने मरून जातील.

प्रीतीचे महत्त्व कवीने निरनिराळ्या स्वरूपांनी पटवून दिले आहे. विशेषतः दुसऱ्या श्लोकातील भाव तर अगदी प्रीतिकल्पनेत आगळेच सौंदर्य आणतो. केशवसुतांनी 'प्रीती' या कवितेत प्रीतीचे जे अलौकिकत्व वर्णन केले आहे त्यातून प्रीतीकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण आधुनिक मराठी कवितेत आला. 'प्रीती निमाली तर–' ही कविता त्याच अलौकिकत्वाची साक्ष देणारी ठरेल.

विशेषतः विनायकांच्या चरित्राबद्दल विचार करताना या कवितेतील भावनांची आठवण ठेवावयास हवी.

रचनेच्या दृष्टीने ही कविता सुनीतप्राय आहे. विनायकांनी सुनीतरचना केली नसली तरी या कवितेची रचना सुनीताच्या जवळपास येईल. 'प्रीती

निमाली तर ' या शब्दाची प्रत्येक कडव्याच्या शेवटी पुनरुक्ती झालेली परिणामकारक वाटते.

## २१ : सुवास

जाती — पादाकुलक

' ओसाडीत सहल करीत असता कवीला मधूनमधून कस्तुरीसारखा वास येई. ( हा वास जुन्या भुजंगाच्या श्वासाचा असतो असे म्हणतात. ) वास कसा आला, कोठून आला म्हणून त्याने पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ ! त्या नादात त्याच्या मनाची जी स्थिती झाली तिचे खालील पद्य हे चित्र होय. ' अशी या कवितेला सुरवातीलाच टीप दिलेली आहे.

ही कविता वाचत असताना केशवसुतांच्या ' सतारीचे बोल ' या कवितेची आठवण होते. केशवसुतांना 'सतारीचे बोल' ऐकून असेच अनामिक आर्त पिसे लागले होते. सतारीचे बोल ऐकत असताना विविध संवेदनांचा त्यांना अनुभव येत होता. विश्वातील सौंदर्याची त्यांना जाणीव होत होती. ' तम अल्प-द्युति बहु ' असा संदेश त्यांना त्यातून मिळत होता व ' की मज गमले विभुती माझी । स्फुरत पसरली विश्वामाजी । ' असाही प्रत्यय त्यांना त्या बोलातून येत होता. संगीताच्या माध्यमातून नवे आशाविश्व त्यांना गवसले होते. ' सुवास– ' मधील भावना अशाच आर्त आहेत. पण त्यांचे स्वरूप निराळे आहे. ' सुवासा– ' च्या माध्यमातून कवी निरनिराळी स्वप्ने साकार करण्याचा प्रयत्न करतो आहे. सुवासाचे उगमस्थळ न कळल्यामुळे सुवासासंबंधी त्यांनी केलेल्या निरनिराळ्या कल्पनांतूनच ही स्वप्नसृष्टी साकार होत असताना दिसेल. ओसाडीतील खिन्न गुलाबाचे उसासे, भ्रमरवृत्तीच्या पुरुषाकडून अव्हेरिल्या गेलेल्या भग्नमनोरथा बालिकेचे स्फुंदन किंवा स्वार्थी जगाला कंटाळून निर्जन रानात राहून स्वच्छंदाने कवीने वाजविलेल्या पाव्याचे सुस्वर यात तर सुवासाचा उगम नाही ना ?— ' परिमल कारण ' न कळल्याने शेवटी कवीची वृत्ती वेडी होते. या सुवासाचे उगमस्थान सापडले असते तर वाग्देवीला सुखविण्यासाठी ते काव्यात साठवून ठेवले असते असे सांगून कवी म्हणतो,

‘स्वानुभूत वासाचे दान । करावयाला जोवर ये न
तोवर कवितालतिकेवरती । कर्णिकार सुमनांची भरती !’

शेवटी काढलेल्या या निष्कर्षांतच कवितेच्या खऱ्या प्रकृतीची ओळख कवीने आपणांस करून दिली आहे. अनुभूतीशिवाय काव्य म्हणजे कण्हेरीच्या फुलासारखे होय आणि अशा कण्हेरीच्या फुलांचीच गर्दी कवितालतेवरती अधिक झाली आहे असे कवीला वाटते.

‘सतारीचे बोल’ आणि ‘सुवास’ या दोन कवितांतून वरवर साम्य दिसत असले तरी त्या दोन्ही कवितांचे स्वरूप भिन्न आहे. ‘सतारीचे बोल–’ मधील आशयांची घनता ‘सुवास’मध्ये नाही. ‘सतारीचे बोल’ या कवितेतील अनुभूतीचे दिव्य व तरल स्वरूपही ‘सुवासात’ नाही किंवा त्यातील शृंखलाबद्ध रचनाही यांत नाही. ‘सतारीचे बोल’ मध्ये एका अनुभवातून दुसरा अनुभव उत्क्रान्त होत असताना आढळतो. तर ‘सुवास’मध्ये कल्पनाविलास अधिक आढळतो. ‘परिमल कारणा’वर केलेल्या तीनही कल्पना रम्य आहेत. पणे ‘सतारीचे बोल’ मधील दिव्य अनुभूतीचा साक्षात्कार यात होत नाही हे तितकेच खरे.

दुसऱ्या कडव्यामधील कल्पना व रेव्ह० टिळक यांचे ‘रानात एकटेच पडलेले फूल’ यातील कल्पना यांची तुलना करण्यासारखी आहे. आपल्या सुवासाचा कोणी आस्वाद घेत नाही म्हणून विनायकांच्या फुलाला खंत वाटते तर टिळकांचे फूल ‘निवडिले । प्रभूने स्थान । रम्य उद्यान । तेच मज झाले’ असा भाव व्यक्त करते. त्यांच्या ‘वनवासी फुला’नेही हाच संदेश दिला आहे.

या कवितेच्या पहिल्या ओळी व ‘रानात एकटेच पडलेले फूल’ या कवितेची सुरवात यांमधील साम्यही पाहण्यासारखे आहे. तिसऱ्या कडव्यात व्यक्त केलेली पुरुषांची चंचल मनोवृत्ती ही कवीने ‘स्त्री आणि पुरुष’ या कवितेत विस्ताराने रंगविली आहे. त्या कवितेचे हेच मूळ असावे असे वाटते.

जगात रसिकतेला थारा नसल्याने रानात निसर्गाच्या सहवासात जाऊन राहण्याची कल्पना अनेक कवींच्या काव्यांतून प्रकट झालेली आढळेल. किंबहुना या काळातील कवींची ही लाडकी कल्पना असेच म्हणावे लागेल. विनायकांच्या या उद्‌गाराच्या पाठीमागे वैयक्तिक अनुभव तर नसेल ना ?

शेवटच्या चार ओळींत कवितेच्या प्रकृतीचे निदान अतिशय चांगले केले आहे. अनुभूतीशिवाय काव्य म्हणजे निव्वळ वास नसलेली कण्हेरीची फुले. कवीच्या या उद्‌गारांत त्याच्या विनीत वृत्तीचेही दर्शन होते.

## २२ : स्त्री आणि पुरुष

चाल — ला बाई ला. नवरंग जातीसारखी रचना

'सुवास' मधील तिसऱ्या कडव्यात ही कविता बीजरूपाने आहे. स्त्री-विषयक काव्यमय आणि कोमल कल्पना या कवितेतून व्यक्त झाली आहे. 'ध्वनि-काव्याचा हा एक उत्तम नमुना आहे' असे श्री. माडखोलकर या कविते-विषयी म्हणतात. या कवितेतील शब्दचित्रे, त्यांत प्रकट झालेला भाव व त्यातून सूचित केला गेलेला आशय यांमुळे या कवितेत आगळेच सौंदर्य निर्माण झाले आहे.

फुले फुललेल्या रमणीय उद्यानात एक युवती हिंडत होती. त्याच उद्यानात मन रमविण्यासाठी एक पुरुष आला. त्याला बाग फार आवडली. त्यातही नुकत्याच उमललेल्या फुलाने त्याचे मन आकृष्ट केले. ते त्याने खुडले, त्याचा वास घेतला, त्याचे चुंबन घेतले व ते मस्तकावरही ठेवले. पण थोड्याच वेळात त्याला ते फूल नकोसे झाले आणि कुसकरून त्याने ते जमिनीवर फेकून दिले. त्याची ती सर्व कृती ती स्त्री पाहत होती. आणि त्या त्याच्या वृत्तीने ती गहि-वरून गेली व नेत्रांतून टप्-टप् अश्रू जमिनीवर ओघळले. का ? कवीने याचे उत्तर रसिकांवरच सोपविले आहे.

एका लहान प्रसंगातून वेचक शब्दांत मोठा आशय प्रकट करण्याचे विनायकांचे सामर्थ्य या कवितेत प्रकट होते. कवीची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टीही यातून व्यक्त झालेली आढळेल.

## २३ : दोन मार्ग

वृत्त — आर्या ( गीती )

या प्रदीर्घ कवितेत विनायकांचा ध्येयवादी दृष्टिकोण स्पष्ट झालेला आढळतो. आयुःपथाला दोन वेगवेगळे फाटे फुटलेले कवीला दिसतात. त्यांपैकी एक अतिशय सुंदर आहे व 'सौख्य, संपदा व विजय' यांकडे नेणारा आहे. दुसऱ्या रस्त्यात सर्वत्र खाचखळगे आणि काटेकुटे भरलेले आहेत. हा पंथ परोपकाराचा आहे. कोणता पंथ स्वीकारावा असा प्रश्न पडला असताना 'कंटक पथच तुझा हा' असे बोल त्याच्या कानी पडतात आणि त्या मार्गाने तो जाऊ लागतो. मध्येच धैर्य खचून तो थांबला असताना तीच वाणी त्याला धीर देते आणि त्याला सांगते की, जगात सर्वत्रच दुःख, दैन्य, अन्याय आणि दारिद्र्य भरले आहे, न्याय आणि नीती यांची जागोजागी पायमल्ली होते आहे, जिकडे तिकडे कलह चालू आहेत, स्वार्थपरायण लोक असंख्य जनांना नाडून त्यांना दुःखाच्या डोहात टाकीत आहेत...अशा वेळी कठिण असला तरी याच मार्गाने तुला जायला पाहिजे, आणि जगातील हे सर्व दैन्य, दुःख व अन्याय दूर करण्याचा तू प्रयत्न केला पाहिजेस. हे करताना तुला कदाचित सर्व काल दुःखातच कंठावा लागेल, या लोकी तुला कीर्ती किंवा मान मिळणार नाही पण कर्तव्यकर्म केल्याचे जे समाधान मिळेल त्यापुढे बाकीच्या सर्व गोष्टी तुच्छ वाटतील. आणि हेच तुझे अंतिम यश.

कवितेतील आशय जरी चांगला असला तरी कवितेची रचना विस्कळीत झाली आहे. त्याच त्या कल्पनांची पुनरुक्ती झाली आहे आणि पहिल्या व दुसऱ्या मार्गातील फरक जरी स्थूल स्वरूपाने दाखविला गेला असला तरी कवीला निश्चित काय सांगावयाचे आहे हे कळत नाही. बहुधा 'सौख्य-संपदा-

विजय ' यांकडे नेणारा मार्ग पारतंत्र्याचा व म्हणून अनिष्ट असे त्यांना सुचवायचे आहे. दुसऱ्या मार्गावर दिसणाऱ्या चित्रात विविधता आहे. त्यातही कवीने नेमके काय करावयास हवे याची कल्पना येत नाही. पण बहुधा वैभवाच्या किंवा सुखाच्या मार्गाने जाण्यापेक्षा ध्येयाच्या व स्वातंत्र्याच्या मार्गाने जाणे कवीला अधिक पसंत आहे व हा दुसरा मार्ग अधिक कंटकमय आहे एवढेच कवीला सुचवायचे असावे. त्यासाठी विस्तार फारच केला आहे हा या कवितेचा दोष.

## २४ : नदी आणि कवी

वृत्त — उपजाती

कवी आणि कविता यांवर केशवसुत व रे. टिळक यांच्याप्रमाणेच विनायकांनीही लिहिले. पण केशवसुत किंवा रे. टिळक यांच्या कवितांतून आढळणारी दर्पोक्ती विनायकांच्या कवितेत आढळत नाही. ' नदी आणि कवी ' या कवितेत नदी व कवी यांच्यामध्ये कवीने दाखविलेले साम्य चमत्कृतिपूर्ण आणि अतिशय मार्मिक आहे.

' राष्ट्रे बुडाली, नृप थोर गेले । नदी कवी मात्र अनंत ठेले ॥ ' या उद्गारांत नदीचे व कवीचे मोठेपण विनायकांनी जरी व्यक्त केले असले तरी ' महाकवी थोर नदाप्रमाणे । मी बापडा ओघळ अल्प जाणे ॥ ' अशी विनीत वृत्तीही काव्यातून प्रकट केली आहे. कवीची विनम्र वृत्ती कवितेच्या आशयात अधिकच सौंदर्य निर्माण करते.

**कडवे २ रे :** कवी ज्या गावी राहत असतो त्या गावात त्याचे फारसे कौतुक कधीच होत नाही हा सर्वसाधारण अनुभव पुष्कळ कवींच्या वाट्याला आला. विनायकांना तोच अनुभव आला नसेल ना ?

**कडवे ३ रे :** नदीचे पात्र जसजसे खोल होत जाते तसतसा तिचा प्रवाह संथ व गंभीर होतो. कवी जसजसा प्रगल्भ होतो तसतशी त्याच्या काव्यातही भावनांची व विचारांची सखोलता येऊ लागते.

**कडवे ४ थे :** नदीच्या प्रवाहावर ज्याप्रमाणे सदैव लाटा असतात व त्या लाटांतच ती दंग होऊन जाते तसेच कवीच्या अंतःकरणात सदैव भावनातरंग व कल्पनातरंग असतात व त्यांतच तो निःसंगपणे दंग होऊन गेलेला असतो.

## २५ : विरही

**पालुपदाची जाती —** रेवती. अंतऱ्यासह सर्व चाल 'कधि करिसी लग्न माझे' या पदाची.

विनायकांच्या ज्या काही थोड्याच कविता प्रणयपर आहेत त्यांपैकी ही एक कविता. भावनेची उत्कटता व तिचा प्रांजळ आविष्कार या दृष्टीने ही कविता उल्लेखनीय आहे. निष्काम प्रीती बहिरंगावर भुलत नाही तर तिची नजर अंतःसौंदर्यावर असते ही तिसऱ्या कडव्यामधील कल्पना अतिशय चांगली आहे.

विरहामुळे प्रियतमेचे स्मरण व तिच्या मीलनाची लागलेली उत्कंठा य प्रेमिकाच्या भावनांचे चित्रण कवितेत चांगले आले आहे.

## २६ : प्रत–

वृत्त — शार्दूलविक्रीडित

विनायकांची व्यक्तिगत ( Personal ) अशी ही एकच कविता. या दृष्टीने या कवितेला विशेष महत्त्व आहे. स्वतःच्या पत्नीला उद्देशून ही कविता लिहिली आहे व तीत विनायकांनी आपल्या व्यसनाचा व हट्टीपणाचा कबुलीजबाब दिला आहे. स्वतःच्या व्यसनाची त्यांना जाणीव होती—त्याबद्दल ते स्वतः अगतिक होते. पत्नीचे समाधान करण्याचा या कवितेत प्रयत्न केला आहे. त्यांच्या सांसारिक जीवनातील व्यथा या आठ ओळींत उत्कटत्वाने व्यक्त होतात.

## २७ : चिमा

वृत्त —– शार्दूलविक्रीडित

विनायकांची ही एकमेव विनोदी कविता. त्यांची चिलीम एकदा हरवली त्यावर ही कविता लिहिली आहे. त्यातही वैयक्तिक जीवनाच्या काही छटा आढळतात. ऐश्वर्यामध्ये किंवा संकटामध्ये जिने त्यांना साथ दिली आणि पोटासाठी रानावनातून हिंडत असतांनाही जी सतत त्यांच्याबरोबर होती त्या चिमाची स्तुती करीत असताना त्यांना कदाचित संकटकाळातील आपला एकाकीपणाच ध्वनित करावयाचा नसेल ना ?

## २८ : स्वप्न

जाती — नृपममता

ही कविताही त्यांच्या विनोदी वृत्तीची साक्ष देते. ‘कवी प्रवासार्थ निघाला होता. एका पथिकाश्रमात ( Station ) वेत्रासनावर ( Bench ) निद्रासुखार्थ पडला असता त्यास एक स्वप्न पडले. दुसरे दिवशी हे स्वप्नगीत कवीने आपल्या प्रियेकडे पाठविले. ’ या कवीनेच दिलेल्या टीपेवरून कवितेची भूमिका स्पष्ट होण्यासारखी आहे. पहिल्या तीन कडव्यांत स्वप्नवर्णन आहे, चवथ्या कडव्यात जागृतीमुळे झालेली निराशा आहे व पाचव्या कडव्यात सामान्य सिद्धान्त आहे. पाचव्या कडव्यातील हा सिद्धान्त विनायकांना एक श्रीमंत एका वारयोषितेच्या काव्याड्डस कन्येवर आसक्त झाले त्यावरून सुचला असे त्यांचे स्नेही ‘काव्यरत्नावली ’कार श्री. फडणीस सांगतात. कदाचित विनायकांच्या मूळच्या सत्प्रवृत्त व विरक्त वृत्तीची ती अस्पष्ट छाया असावी.

## २९ : कवी आणि पोपट

जाती — केशवकरणी

कवी आणि पोपट यांच्या संवादातून कवीला परवशतेबद्दल वाटणारी खंत उत्कट रीतीने प्रकट झाली आहे. पोपटाच्या सौंदर्याने व त्याच्या मधुर वाणीने

कवी त्याच्याकडे आकृष्ट झाला आहे व आपले हे गुण अकारण वनात फुकट दवडण्याऐवजी पोपटाने आपल्याबरोबर नगरात यावे, सुवर्ण पंजरामध्ये वास करावा व आपल्या गायनाने चुकल्या जनांना सन्मार्गावर आणावे अशी कवी त्याला विनंती करीत आहे. त्यावर ' स्वच्छंदाने वनात विहार करण्यात जे सुख आहे ते राजमंदिरात नाही ' असे पोपट त्याला सांगतो आणि ' स्वतः परवशतेची दुःखे भोगत असताना दुसऱ्याला त्या दुःखात का बळेच ओढता ? ' असा सवाल करतो. रे. टिळकांच्या ' वनवासी फुला ' ची आठवण करून देणारी ही कविता त्या कवितेच्या अगोदर एक वर्ष प्रकाशित झाली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. परवशतेचा विनायकांच्या मनाला केवढा ध्यास लागला होता हेही या कवितेवरून स्पष्ट होते. शहरामधील कृत्रिमतेचे, मत्सराचे आणि व्यावहारिक दृष्टीचे पोपटाने केलेले वर्णनही उपरोधपूर्ण आहे व कवीचा शहरी जीवनाबद्दलचा दृष्टिकोणही ते व्यक्त करते. ' गुलाब-पुष्पे व्यर्थ विकसती नसता मधुमक्षिका । न सागरतली मोल माणिका ' या किंवा ' परवशतेच्या पक्वान्नास न कंदफलांची सरी, । स्वतःची जीर्ण झोपडी बरी । ' यासारख्या उक्ती काव्याच्या सौंदर्यात भरच टाकतात. पारंपारिक कल्पनेवर जरी ही कविता आधारलेली असली तरी त्यातील वर्णने, त्यातील उपरोध व त्यात प्रकट होणारा कवीचा दृष्टिकोण यांमुळे ही कविता उल्लेखनीय वाटते.

'बी' कवींची 'यात काय संशय' ही कविता तुलनेने वाचण्यासारखी आहे.

## ३० : नागपंचमी

चाल -- विभव स्वकरे देईन...

प्रवृत्ती आणि निवृत्ती हा या कवितेचा विषय आहे. प्रपंच आणि परमार्थ यांत खरे काय ? जग कशावर आधारलेले आहे ? प्रपंचावर की परमार्थावर ?— मीपणा व माझेपणा नाहीसा होऊन ' हे विश्वचि माझे घर ' हे तत्त्व जर हृदयात बिंबले तर जग टिकणार कसे ?—यांसारख्या प्रश्नांची उलट सुलट चर्चा यात आली आहे.

## ३१ : कवी

चाल -- साध्य नसे मुनिकन्या

कवीच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारे हे गीत केशवसुतांच्या ‘आम्हीं कोण’ व ‘कवी’ या कवितांची आठवण करून देते. ‘सहज करी जी धरितो माती। देतो तिजला सुवर्णकान्ती ॥’ या ओळी केशवसुतांच्या

‘चाले तो धरणीवरी तर पहा ! जेथून तो चालला।
धूली तेथिल होतसे कनकिता; घेऊ नका भ्रान्तिला ॥’

या ओळींची आठवण करून देते.

कवी हा अज्ञेयाचा पूर्णज्ञानी असतो, स्वतःच्या सामर्थ्याने जडालासुद्धा चैतन्य आणतो आणि स्वतःच्या इच्छाशक्तीच्या जोरावर विश्वाच्या अंतर्यामात शिरतो. या कल्पना केशवसुतांच्या काव्यातही थोड्या फार फरकाने आलेल्या आढळतील. तिसऱ्या कडव्यातील कल्पनेचे तांब्यांच्या ‘जय वाल्मिकी’ या कवितेशी असणारे साम्य पाहण्यासारखे आहे.

## ३२ : दोन प्रासंगिक पदे

ही दोन्ही पदे बहुधा मेळ्यासाठी लिहिलेली असावीत. दोन्ही कवितांतून विनायकांच्या राष्ट्रीय भावनेचे दर्शन घडते. पहिल्या कवितेत लोकांच्या स्वार्थ-परायण वृत्तीबद्दल कवीला खंत वाटते तर दुसऱ्या कवितेत परवशतेमुळे व्यथित झालेल्या अंतःकरणाचे प्रतिबिंब आढळते. मोजक्या शब्दांत उत्कट भावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य या दोन्ही पदांत आढळेल.

## ३३ : चार स्फुट कविता

**सृष्टिविवाहमंडप** — निसर्गवर्णन हा विनायकांच्या प्रतिभेचा विषय नव्हे. पण निसर्गाचे कल्पनारम्य चित्र या पदात उभे केलेले आढळेल.

'प्रीती' व 'प्रेमलुब्धता' या चुटक्यांतून प्रेमासंबंधी व्यक्त केलेले विचार तसे मोठे वैशिष्ट्यपूर्ण नाहीत. 'प्रीती' मध्ये स्त्रिया या भाबड्या असतात व पुरुष कपटी असतात हा त्यांचा आवडता सिद्धान्त फिरून एकदा आला आहे. 'प्रेम-लुब्धता' मध्ये व्यंग असले तरी प्रीती कदापि कमी होत नाही हे सांगितले आहे.

'अलंकार' मध्ये खऱ्या अलंकारांपेक्षा सुगुणालंकार हे तनूस अधिक शोभा कसे देतात याचे तपशिलाने वर्णन केले आहे.

चमत्कृती या दृष्टीने हे चारही चुटके आकर्षक वाटतील.

---

## ' विनायकां ' विषयी—

**प्रि. वा. ब. पटवर्धन**

परवशतेमुळे ओढवलेल्या लाजिरवाण्या स्थितीचे चित्र त्यांच्या काव्यात वारंवार रेखाटलेले आढळते. भोवताली दिसणारी आणि स्वतःच्या नित्य प्रत्ययास येणारी अवनतीच विनायकांची दृष्टी वर्तमानावरून भूतकाळाकडे वळण्यास कारण झाली की काय कोण जाणे! त्यांच्या अंगी मराठी साम्राज्याच्या स्वतंत्रतेचे वारे खेळत असावे. निदान त्या संस्मरणीय गतकालासंबंधी त्याला विलक्षण प्रेम वाटत असे यात संशय नाही. ' पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काळ ' हा विश्वास त्यांच्या हृदयात दृढ नसता तर विनायकांची सर्व कविता पारतंत्र्याच्या करकोच्यांनी जर्जर झालेल्या महाराष्ट्रभूच्या आर्त स्वरांनी आणि हुंदक्यांनी गहिवरलेली आढळती, पण तशी ती नाही. त्यांच्या प्रतिभेची दृष्टी महाराष्ट्राच्या दिव्य पूर्वांवर खिळलेली असल्यामुळे महाराष्ट्राचे भवितव्यही त्यांना उज्ज्वलच दिसत असे....त्या वेळच्या जनतेत अस्फुटपणे जे विचार, जे भाव, ज्या मनःप्रवृत्ती जागृत होत होत्या त्यांना विनायकाने तोंड फोडले. विनायक हा तत्कालीन जनतेचा वाचस्पती होता. त्यांच्या काव्याच्या द्वारा त्या वेळची लोकस्थिती गाऊ किंवा बोलू लागली.

**— प्रस्तावना ' विनायकांची कविता '**
**पहिली आवृत्ती**

## ना. के. बेहेरे

त्याचे हृदय भावनाप्रधान असल्यामुळे त्याचे अंतःकरण देशात उत्पन्न झालेल्या नवीन देशाभिमानी लहरींनी भरून आले व त्याच्या कवितेला तेजस्वी व राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आणि म्हणूनच विनायक हा खरा कवी होय असे म्हणावे लागते. विनायकाची कविता तीनशे वर्षांनंतर वाचली, तरी ती एकोणि-

साऱ्या शतकाची कविता म्हणून ओळखता येईल. ... ........ सभोवतालच्या परिस्थितीने आत्मजाणीव झालेला व त्या तल्लीनतेने देशाची अवनती व उद्धाराचा मार्ग यांचे मनोहर शब्दचित्र कवितेच्या सहाय्याने गुंफणारा विनायक हा पहिला जातिवंत देशभक्त कवी होय. आधुनिक राष्ट्रीय व ऐतिहासिक कवितेचा निर्माता हे पद विनायकालाच लावता येईल.

— काव्यचर्चा

## ग. त्र्यं. माडखोलकर

विनायकांचा देशाभिमान जाज्वल्य होता. पूर्व वैभवाचे स्मरण त्यांना अगदी वेडे करीत असे. शतकानुशतके महाराष्ट्राने आपदा सोसल्या आणि अखेर स्वराज्य पाहिले; परंतु पुरते दीड शतकसुद्धा ते वैभव दुर्दैवाने महाराष्ट्राला उपभोगू दिले नाही. दीड शतकाच्या अल्प अवधीत महाराष्ट्रीय लोकांनी जे अभूतपूर्व वैभव भोगले, त्याचा अभिमान विनायकांना निरंतर वाटत होता. दुबळ्यांना पायाखाली तुडवून त्यांच्या रक्ताच्या चिखलाने डागळलेले वैभव महाराष्ट्राने भोगले नाही. मराठे–मुसलमानांना समतेने पाहून, देऊळ-दर्ग्याला समान लेखून महाराष्ट्राने वैभव वाढविले. महाराष्ट्राच्या वैभवाला न्यायाचे, दयेचे आणि धर्मांचे अनुष्ठान होते अशा दिव्य परंपरेचा अभिमान विनायकांना होता आणि म्हणूनच महाराष्ट्राला आज जशी हवी तशी कविता विनायकांची उतरली आहे.

— आधुनिक कविपंचक

## प्रा. रा. श्री. जोग

केवळ पूर्व वैभवस्मरणावर त्यांनी केव्हाच भर दिला नाही. त्यामुळे पुढील कित्येक राष्ट्रीय कवींच्या शब्दांच्या जंजाळातून जी तळमळ व्यक्त होत नाही, ती विनायकांच्या साध्या पण हृदयास जाऊन भिडणाऱ्या शब्दांमधून प्रत्ययास येते. शब्दजंजालाकडे विनायकांचे केव्हाच , लक्ष नव्हते. अर्थशून्य शब्दरचना

करीत राहण्यापेक्षा कविता लहान झालेली पुरवली अशी त्यांची वृत्ती होती. स्फुट कवितांमधील राष्ट्रीय स्वरूपाच्या नसलेल्या कवितांमधूनही हा गुण मोठ्या प्रमाणात व्यक्त होत आहे.

— **अर्वाचीन मराठी काव्य**

## प्रा. भ. श्री. पंडित

सारांश, विनायकांची भावाविष्कृती ही अत्यंत उत्कट आहे. मृत्यूपूर्वी त्यांनी 'भोग भोगिले बरवे झाले ऋण त्यांचे फिटले' या शब्दांनी आपल्या पत्नीचे समाधान केले, त्यातील कारुण्य तीव्र नाही असे कोण म्हणेल? त्यांच्या प्रणयपर कवितांत किंवा स्त्रियांसंबंधीच्या गीतांत कोठेही शृंगाराचा अतिरेक तर राहोच, पण अधिकताही नाही. शिवाय त्यांतील वृत्ती विमल, उदार व पावन आहे. त्यांची कला संयमित व औचित्ययुक्त आहे. तिच्यात कृत्रिमता नावालाही नाही ... त्यांची टीका प्रखर व परिणामकारक आहे. त्यांची राष्ट्रभक्ती कशी अलोट होती आणि स्वदेशबांधवप्रीती कशी उत्कट होती याची

'मी निजदेशयशोगानी । वाहिली असे सदा वाणी ।
माझी प्रोत्साहक गाणी । पडता ओझरती कानी ॥
स्फुरती वीरांचे बाहू । म्हणति स्त्रिया रणी जाऊ ।
त्यजती मुले दिला खाऊ ॥' हे किंवा

'देशभक्ता प्रासाद बंदिशाला । शृंखलांच्या गुंफिल्या त्यास माला ॥'

हे उद्गार देतील. विनायक हे आधुनिक मराठी कवितेतील राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्गाते होत, आणि तिच्या इतिहासात त्यांचे ते स्थान कायम आहे.

-- **प्रस्तावना** 'विनायकांची कविता'
चवथी आवृत्ती

## प्रा. मं. वि. राजाध्यक्ष

केशवसुत, टिळक, विनायक या त्रिकुटाने नव्या कवितेला चालना दिली हे खरे असले तरी त्यांच्या तऱ्हा निरनिराळ्या आहेत व विनायकांचा ' नवेपणा ' मर्यादित स्वरूपाचा आहे हे विसरू नये. हा नवेपणा अंतरंगापेक्षा बहिरंगात आढळेल. जुन्या कवितेची वृत्तबद्ध आणि शब्दजड, म्हणून कृत्रिम भासणारी, रचना टाळून विनायकाने ओघवती जातिरचना केली. शीघ्र कवित्वाचा गुण त्यांच्यात शाळकरी दिवसापासून होता, पण शीघ्र कवित्वाबरोबर बहुशः येणारे अर्थहीनता, शब्दबाजी आणि रचनाशैथिल्य हे अवगुण त्यांच्यात नाहीत. त्यांच्या शैलीत सहजता इतकी आहे की ती आहे हेच चटकन उमगत नाही. जुन्या कवितेतील शैलीचे अवडंबर आठवल्यावर विनायकांची ही आधुनिकता पटते.

— पाच कवी

## डॉ. अ. ना. देशपांडे

विनायक हा उघड उघड बोधवादी कवी आहे. त्यामुळे त्याच्या कवितेत अर्थान्तरन्यासाची प्रवृत्ती फार प्रबळ स्वरूपात आढळते. अर्थात त्याच्या कवितांतून वरचेवर जी बोधवचने आलेली आढळतात, ती सहजगत्या प्रतिपाद्य विषयाच्या विवेचनाच्या स्वाभाविक ओघात आलेली आहेत, ओढूनताणून आणलेली नाहीत, असे आढळून येते. पुन्हा ती सारी बोधवचने, आशयाच्या दृष्टीने सामान्य व सर्वपरिचित स्वरूपाची असली तरी अर्थप्रतीतिसुलभ असतात .....विनायकाच्या बोधवादालाही मर्यादा आहे; कारण तो परंपरेचा पूजक आहे. परंपरागत जीवनमूल्यांचाच त्याने आपल्या कवितांतून पुरस्कार केला आहे.

-- अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास

## डॉ. रा. शं. वाळिंबे

" वर्तमानकाळात स्पृहणीय असे काही न दिसल्यामुळे विनायकांचे मन विस्मृतीच्या धुक्यात गुरफटलेल्या आणि म्हणूनच विशेष आकर्षक भासणाऱ्या भूतकाळातील रोमांचकारी घटनांमध्ये रमले; त्या घटनांमध्ये त्यांना सौंदर्याचा साक्षात्कार झाला; त्या रजपूत रमणींच्या रम्योज्ज्वल जीवितांमध्ये त्यांच्या प्रतिभेला निधान लाभले. अनेक शतकांच्या दूरपणामुळे या साऱ्या घटनांच्या भोवती एक प्रकारचे आकर्षक तेजोवलय निर्माण झालेले असते. त्या तेजोवलयाची विनायकांच्या दृष्टीला भुरळ पडली. गतकाळ दूर राहिल्यामुळे त्यांना केवळ नयनमनोहर हिरवळच दिसली; खाचखळगे आणि दऱ्या या गोष्टी त्यांच्या दृष्टीसमोरून अदृश्य झाल्या...वर्तमानकाळातील उद्ध्वस्त आणि उदासवाण्या जीवनाचा तिरस्कार आल्यामुळेच विनायकांनी आपल्या व्यथित मनाचे समाधान करण्यासाठी गतकाळातील सुखद स्मृतीमध्ये स्वतःच्या मनाला गुरफटून टाकले ......ही एक प्रकारची गुंगीच होती. या गुंगीमुळे भोवतालच्या जगात अगदी समीप घडणाऱ्या विविध घटनांचे विनायकांच्या दृष्टीने अस्तित्वच नष्ट झाले."

'बालकवी' या प्रबंधातून

## कवी 'विनायक' यांस :—

सोडुनि जळत्या उच्छ्वासांना,
जाळित दूषित वातावरणा;
कोण तुझ्याविण रे कविराणा ?
शुद्धिकारका ! कवि विनायका !

तू राष्ट्राचा शाहिर खंदा,
तू राष्ट्रीयत्वाचा बंदा,
परवशतेच्या तोडिसि बन्धा !
बन्धमोचका ! कवि विनायका !

परंपरा जी शाहीरांची
अखंड पुढती चालायाची
प्रेरक तिज तव गीते साची !
स्फूर्तिदायका ! कवि विनायका !

मनही ज्यांचे दास परांचे
ध्वनी तयांना तव गीतांचे
क्षणात करितिल धनी मनाचे !
चित्ततारका ! कवि विनायका !

राष्ट्रद्रोहा खाक करोनी
राष्ट्रहृदी ऊर्जस्वल गाणी
नाचायाची तुझी निशिदिनी !
दिव्यगायका ! कवि विनायका !

जड नीरस ही माझी वाणी !
गाउ कसा मी तुजवर गाणी !
ओळ शुष्क हे घे मानोनी !
कीर्तननायका ! कवि विनायका !

— कवी माधव

(कवी माधव यांची कविता)

REFBK-0014050

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३६७६० ... वि: ...काव्य...
क्रमांक ...३६७१५... नों. दि. ३५।८।६८

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६ | १५ | तत्त्वांश | सत्त्वांश |
| ७ | १ | प्रबंधांत | प्रबंधांत |
| ११ | ११ | खनी | जी खनी |
| ६१ | ३ | वसवा | वेसवा |
| ७२ | १३ | मात्सयाचा | मात्सर्यांचा |

# आमची काही प्रकाशने

| | |
|---|---|
| **विदर्भाचे मानकरी**<br>डॉ. अ. ना. देशपांडे | २=०० |
| **मराठी गद्यगौरव**<br>प्रा. रु. पां. पाजणकर | २=२५ |
| **Art of Autobiography**<br>Dr. D. G. Naik | 15=00 |
| **साहित्यातील विवेक**<br>डॉ. अ. ना. देशपांडे<br>श्री. ग. वा. जोशी | ४=०० |
| **सवाई माधवराव यांचा मृत्यू**<br>[ नाट्यचिकित्सा ]<br>श्री. शं. ना. सहस्रबुद्धे | २=०० |
| **संगीत सौभद्र नाट्यसमीक्षा**<br>डॉ. वि. पां. दांडेकर | १=०० |
| **उर्मिला** [ काव्यसंग्रह ]<br>प्रा. कृ. व. निकुंब | ३=०० |
| **झपूर्झा** [ केशवसुत यांच्या कवितांचा संग्रह ]<br>डॉ. वि. म. कुलकर्णी<br>प्रा. गो. म. कुलकर्णी | ४=०० |
| **गाठ हिमालयाशी आहे** [ कादंबरी ]<br>कृ. मु. उजळंबकर | ६=०० |
| **ग्रंथालयशास्त्राची पाच सूत्रे**<br>कृ. मु. उजळंबकर | १=८० |
| **चीनचे आक्रमण व गांधीवाद**<br>श्रीपाद जोशी | ३=५० |
| **मुस्लिम सण आणि संस्कार**<br>श्रीपाद जोशी | १=८० |

